मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२१ दि. २८/०६/२०२१ रोजीने मा. उपायुक्त परिमंडळ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४९ व ६८(१), ६९(१) व (२) नुसार मा. उपायुक्त परिमंडळ-३ हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११४ मध्ये लागेबंदर-३ येथे फुलार तातीखाव ते बंधारापर्यंतच्या रस्त्याची उंची वाढविणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९७,९५४/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

उपायुक्त परिमंडळ - ३
वसई विरार शहर महानगरपालिका

४१५

वसई-विरारशहरमहानगरपालिका

मुख्यकार्यालय,विरारपूर्व,जि.पालघर,पिननं.४०१३०५

दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६४१ विभाग : बांधकाम
दिनांक : ५/१०/२०२१

---

१)प्रस्तावाचाविषय:-वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यक्षेत्रातील नवघर पुर्व स्मशानभुमीमध्ये गॅस दाहिनी करिता शेड बांधणे, चिमणी करिता चौथरा बांधणे, स्टोर रुम करिता शेड बांधणे तसेच गॅस दाहिनी साठी विविध अत्यावश्यक कामे **करणेकामीप्रशासकीयववित्तीयमान्यतामिळणेबाबत.**

२)अंदाजपत्रकीयरक्कम:- रु २९,८५,१३६ /-

३)प्रस्तावाचीगरज:-देशभरात कोरोना (Covid-१९) या विषाणुच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. वाढत्या प्रादुभार्वामुळे रुग्णांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे मृत्यूचे प्रमाण देखील वाढले आहे. सद्यस्थित वाढत्या मृत्युच्या प्रमाणामुळे स्मशानभुमीतील दहन शेडची संख्या अपुरी पडत आहे. नवघर येथे गॅस दाहिनीचे बांधकाम असुन तेथे नव्याने गॅस दाहिनी मशिन बसविणेचे काम सुरु करावयाचे आहे. सदर गॅस दाहिनीची चिमणी बसविण्याकरिता चौथरा बांधणे, गॅस दाहिनी करिता शेड बांधणे, स्टोर रुम करिता शेड बांधणे काम तातडीने करणे गरजेचे आहे. सदर कामे तातडीने करणेबाबत मा. शहर अभियंता यांनी आदेशित केले आहे.

४)कामाचेस्वरुप:-

अंतर्गतकामे:-आर.सी.सी. चौथरा, जी आय पत्रे, वीट बांधकाम, आतील व बाहेरील प्लास्टर, गेट, खिडकी व रंगकाम

परिमाण:-आर.सी.सी. चौथरा	:	१.८० x १.८० मी.
जी आय पत्रे	:	१८०.४० चौ.मी.
प्लास्टर	:	३१५.२५ चौ.मी.
रंगकाम	:	३१५.२५ चौ.मी.
वीटबांधकाम	:	३६.३८ चौ.मी.

५)यापुर्वीसदरजागेवरझालेल्या

कामाचातपशिल:-

६)जागेचीमालकी:-व.वि.श.म.

७)विकासआराखडयातीलआरक्षण:-स्मशानभुमी

८)अर्थसंकल्पीयतरतुद:-अ)**लेखाशिष:**-एकात्मीक दहन भुमी विकास कार्यक्रमांतर्गत नवीन दहन व दफनभुमीसाठी भुसंपादन व विकासासह अस्तित्वातील दहन व दफन भुमींचा विकास तसेच विद्युत व गॅस दाहिनी व्यवस्था

९)स्थावरमालमतानोंदवहीक्र.१२८पृष्ठक्र.१४अ.क्र.२६११वरनोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

त्यानुसार खालीलप्रमाणे नवघर स्मशानभुमीमध्ये अंतर्गत कामे करणे गरजेचे आहे.

अ. क्र.	प्रभाग समिती	कामाचे नाव	कामाचे स्वरुप/ अंदाजपत्रकीय रक्कम	ठेकेदाराचे नाव
१)	डी आचोळे	वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यक्षेत्रातील नवघर पुर्व स्मशानभुमीमध्ये गॅस दाहिनी करिता शेड बांधणे, चिमणी करिता चौथरा बांधणे, स्टोर रुम करिता शेड बांधणे तसेच गॅस दाहिनी साठी विविध अत्यावश्यक कामे करणे.	आर.सी.सी. चौथरा, सिमेंट पत्रे, जी आय पत्रे, वीट बांधकाम, आतील व बाहेरील प्लास्टर, गेट, खिडकी व रंगकाम र. रू. २९,८५,१३६/-	मे.अे. पी. एटरप्रायझेस

या करीता वर नमुद कक्ष ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामांचे सन २०१८-२०१९ या वित्तिय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुची नुसार कामाचे अंदाजपत्रक बनविण्यांत आली आहेत. त्यानुसार, यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे खर्च अपेक्षित आहे. अंदाजपत्रकानुसार काम करणेस नमूद केलेल्या मे. अे. पी. एटरप्रायझेस हया मान्यता प्राप्त ठेकेदार यांनी तातडीने काम करणेबाबत समर्थता दर्शविलेली आहे.

सबब, उपरोक्त नमुद ठिकाणी तातडीने कामे करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड, प्रकरण-५, संविदा-२ (२) नुसार निविदा न काढता वर नमुद केलेले नोंदणीकृत ठेकेदारांकडून जिल्हा दरसुचीतील दरानुसार तयार

केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेकामी संविदा करण्यास व कार्यादेश देणेस मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेस्तव सादर.

ठराव:-वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यक्षेत्रातील नवघर पुर्व स्मशानभुमीमध्ये गॅस दाहिनी करिता शेड बांधणे, चिमणी करिता चौथरा बांधणे, स्टोर रुम करिता शेड बांधणे तसेच गॅस दाहिनी साठी विविध अत्यावश्यक कामे करणे कामी तयार करण्यात आलेल्या रु. २९,८५,१३६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसूचीप्रमाणे तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण-५ संविदा २(२) नुसार निविदा न काढता नोंदणीकृत ठेकेदार मे. अे. पी. एटरप्रायझेस यांच्याकडून राज्य दरसूचीतील दराने तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार दराने काम करुन घेणेकामी संविदा करुन कार्यादेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्यकार्यालय,विरारपूर्व,जि.पालघर,पिननं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७.
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

३१/५

प्रशासकीय ठराव क्र. ६५२ विभाग : बांधकाम
दिनांक : ५/१०/२०२१

विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यक्षेत्रातील नवघर पुर्व स्मशानभुमीमध्ये गॅस दाहिनी करिता शेड बांधणे, चिमणी करिता चौथरा बांधणे, स्टोर रुम करिता शेड बांधणे तसेच गॅस दाहिनी साठी विविध अत्यावश्यक कामे करणे.

१)प्रस्तावाचाविषय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यक्षेत्रातील नवघर पुर्व स्मशानभुमीमध्ये गॅस दाहिनी करिता शेड बांधणे, चिमणी करिता चौथरा बांधणे, स्टोर रुम करिता शेड बांधणे तसेच गॅस दाहिनी साठी विविध अत्यावश्यक कामे करणे.

२)प्रस्तावाचीगरज:- देशभरात कोरोना (Covid-१९) या विषाणुच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. वाढत्या प्रादुभार्वामुळे रुग्णांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे मृत्यूचे प्रमाण देखील वाढले आहे. सद्यस्थित वाढत्या मृत्युच्या प्रमाणामुळे स्मशानभुमीतील दहन शेडची संख्या अपुरी पडत आहे. नवघर येथे गॅस दाहिनीचे बांधकाम असुन तेथे नव्याने गॅस दाहिनी मशिन बसविणेचे काम सुरु करावयाचे आहे. सदर गॅस दाहिनीची चिमणी बसविण्याकरिता चौथरा बांधणे, गॅस दाहिनी करिता शेड बांधणे, स्टोर रुम करिता शेड बांधणे काम तातडीने करणे गरजेचे आहे. सदर कामे तातडीने करणेबाबत मा. शहर अभियंता यांनी आदेशित केले आहे.

३)अंदाजपत्रकीयरक्कम:- रु.२९,८५,१३६/-

४)कामाचेस्वरुप:-

अंतर्गतकामे :- आर.सी.सी. चौथरा, सिमेंट पत्रे, जी आय पत्रे, वीट बांधकाम, आतील व बाहेरील प्लास्टर, गेट, खिडकी व रंगकाम

परिमाण:-

आर.सी.सी. चौथरा	:	१.८० x १.८०मी.
जी आय पत्रे	:	१८०.४० चौ.मी.
प्लास्टर	:	३१५.२५ चौ.मी.
रंगकाम	:	३१५.२५ चौ.मी.
वीटबांधकाम	:	३६.३८ चौ.मी.

५)यापुर्वीसदरजागेवरझालेल्याकामाचातपशिल:-

६)जागेचीमालकी :- व.वि.श.म

७)विकासआराखडयातीलआरक्षण :- स्मशानभुमी

८)अर्थसंकल्पीयतरतूद:- अ) लेखाशिष :- एकात्मीक दहन भूमी विकास कार्यक्रमांतर्गत नवीन दहन व दफनभुमीसाठी भुसंपादन व विकासासह अस्तित्वातील दहन व दफन भुमींचा विकास तसेच विद्युत व गॅस दाहिनी व्यवस्था

९)स्थावरमालमतानोंदवहीक्रं.नं.पृष्ठक्रंअ.क्रं. **वरनोंद**

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यक्षेत्रातील नवघर पुर्व स्मशानभुमीमध्ये गॅस दाहिनी करिता शेड बांधणे, चिमणी करिता चौथरा बांधणे, स्टोर रुम करिता शेड बांधणे तसेच गॅस दाहिनी साठी विविध अत्यावश्यक कामे करणे. कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.२९,८५,१३६/-इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६४३ **विभाग :** बांधकाम
दिनांक : ५/७/२०२१

१) प्रस्तावाचा विषय:- वसई – विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मधील वॉर्ड क्र. ७९ मध्ये शनीमंदिर ते कोहिनुर अपा., पर्यंत पाईप गटार बांधणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

२. अंदाजपत्रकीय रक्कम :- २,९७,०८२/-

३. प्रस्तावाची गरज :- वसई – विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (डी) मधील वॉर्ड क्र. ७९ मध्ये शनीमंदिर ते कोहिनुर अपा., येथे असलेल्या गटार निमुळते असुन पाण्याचा निचरा सुस्थितीत होत नाही. अशा वेळी रहदरीसाठी अडथळा निर्माण होतो. सदर ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी पाईप गटाराचे बांधकाम करण्यासाठी स्थानिक रहिवाशी मागणी करत आहेत. सदर कामाचे रक्कम रु. २,९७,०८२/- चे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
	वसई – विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मधील वॉर्ड क्र. ७९ मध्ये शनीमंदिर ते कोहिनुर अपा., पर्यंत पाईप गटार बांधणे	२,९७,०८२/-

ठराव :- उपरोक्त् नमुद कामाचा अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत येत असुन सदर कामाची कार्यवाही करणेस प्रशासकीय व वित्तय मान्यता देण्यांत येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ - २
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६४४

विभाग : उद्यान
दिनांक : ५/१० /२०२१

प्रस्तावाचा विषय : वसई -विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुभाजके, उद्याने, तलाव, हरित क्षेत्र, देखभालीकरिता कार्यरत असलेल्या ठेकेदारांना दि. **०१ सप्टेंबर २०२१ ते दि.३१ डिसेंबर २०२१** पर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर : उपरोक्त विषय व संदर्भान्वये सादर करणेत येते कि, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुभाजके, उद्याने, तलाव, हरित क्षेत्र देखभाल व संगोपनकामी खालील नमुद तक्ता क्र.१ नुसार ठेक्याने देण्यात आली असून सदर देण्यात आलेल्या ठेक्याची मुदत दि.३१ मार्च २०२१ रोजी संपुष्टात आली होती. मा.प्रशासकीय ठराव क्र .२११ दि.११/०६/२०२१ अन्वये खालील नमुद उद्याने, दुभाजके, हरित क्षेत्र देखभालीकामी दि.१ एप्रिल २०२१ ते माहे ऑगस्ट २०२१ पर्यंत मुदतवाढ देऊन येणाऱ्या रक्कम रू.९०,५३,५९०/- (अक्षरी नव्वद लक्ष त्रेपन्न हजार पाचशे नव्वद रुपये मात्र/-) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली होती.

तक्ता क्र.१

अ.क्र.	उद्यान /तलावाचे नाव देखभाल	कार्यरत असलेल्या ठेकेदाराचे नाव	रक्कम रू.प्रती महिना
१	चक्रेश्वर तलाव	मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट	1,56,598/-
२	सी.पी.सोलंकी तलाव	मे.प्रणिक एंन्टरप्रायजेस	96,387/-
३	साने गुरुजी गार्डन		
४	शिरगाव तलाव	मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट	1,46,110/-
५	निर्मळ तलाव	मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग	2,49,641/-
६	दुभाजके	मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग	11,61,982/-
		एकूण	18,10,718/-

तरी, सदर ठेकेदारांस खालील तक्ता क्र.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दि.०१ सप्टेंबर २०२१ ते दि.३१ डिसेंबर २०२१ या कालावधीकरीता देखभालीकामी रक्कम रू. ७२,४२,८७२/- (अक्षरी - बहात्तर लक्ष बेचाळीस हजार आठशे बाहत्तर रुपये मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

तक्ता क्र.२

अ.क्र.	उद्यान /तलावाचे नाव देखभाल	अस्तित्वात असलेल्या ठेकेदाराचे नाव	रक्कम रू.प्रती महिना	रक्कम रू. चार महिन्यांकरीता
१	चक्रेश्वर तलाव	मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट	1,56,598/-	6,26,392/-
२	सी.पी.सोलंकी तलाव	मे.प्रणिक एंन्टरप्रायजेस	96,387/-	3,85,548/-
३	साने गुरुजी गार्डन			
४	शिरगाव तलाव	मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट	1,46,110/-	5,84,440/-

५	निर्मळ तलाव	मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग	2,49,641/-	9,98,564/-
६	दुभाजके	मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग	11,61,982/-	46,47,928/-
	एकूण		18,10,718/-	72,42,872/-

वरील सर्व दुभाजके, उद्याने, तलाव, हरित क्षेत्र यांची ई-निविदा मागविणेची कार्यवाही चालू असून पुढील निविदा मंजुर होऊन पुढील कार्यदेश निर्गमित होईपर्यंत वरील सर्व नमुद ठेकेदारांना दि.०१ सप्टेंबर २०२१ ते दि.३१ डिसेंबर २०२१ पर्यंत पुर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देणेस व त्याकामी रक्कम रू. ७२,४२,८७२/- (अक्षरी - बहात्तर लक्ष बेचाळीस हजार आठशे बाहत्तर रूपये मात्र) इतक्या येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकामी मंजुरीस्तव सादर.

ठराव निर्णय : सदर प्रस्तावामधील नमुद दुभाजके, उद्याने, तलाव, हरित क्षेत्र देखभालीकरीता कार्यरत असलेल्या ठेकेदारास दुभाजके व उद्यान देखभाल व संगोपन करणेकरीता वरील सर्व नमुद ठेकेदारांना दि. ०१ सप्टेंबर २०२१ ते दि.३१ डिसेंबर २०२१ पर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देणे तसेच याकामी होणाऱ्या रक्कम रू.७२,४२,८७२/- (अक्षरी - बहात्तर लक्ष बेचाळीस हजार आठशे बाहत्तर रूपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६४५ विभाग : उद्यान

दिनांक : ५ /७१ /२०२१

प्रस्तावाचा विषय : वसई -विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील उद्याने देखभालीकरिता कार्यरत असलेल्या महिला बचत गटांना माहे ऑक्टोबर २०२१ ते माहे मार्च २०२२ पर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर : उपरोक्त विषयांन्वये सादर करणेत येते कि, वसई-विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्याक्षेत्रातील १२८ उद्यानांचे दैनदिंन देखभाल व रखवालीचे काम स्थानिक महिला बचत गटा मार्फत करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात आला होता व सदर प्रस्तावास मा. सर्वसाधारण ठराव क्र.२२ दि.१८/०६/२०१६ अन्वये सर्वानुमते मान्यता दिल्यानुसार व पारीत करणेत आलेल्या ठरावानुसार उद्यान विभाग व महिला बालकल्याण विभाग यांच्या सहकार्याने उद्यान निहाय बचत गटांना वाटप करण्याची कार्यवाही पूर्ण करणेत आली होती.

वरील निर्णयानुसार नमुद महिला बचत गट यांच्याकडून करारनामा करुन उद्यानांच्या प्रतवारीनुसार देखभालीचा मोबदला रक्कम ठरवून खालील प्रमाणे नमुद उद्यानांचे देखभालीचे कामकाज सोपविण्यात आले. सदर देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक ३१/०३/२०१७ रोजी संपुष्टात आल्याने मा. आयुक्त सो., यांना प्रदान करणेत आलेले अधिकारात मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६ दि.१९/०६/२०१७ अन्वयेच्या निर्णयानुसार सदर महिला बचत गटास पुर्वलक्षी प्रभावाने दि. ०१/०४/२०१७ ते दि. ३१/०३/२०१८ पर्यंत एक वर्षापर्यंत मुदतवाढ देणेत आलेली होती. सदरची एक वर्षाची मुदतवाढ दि.३१/०३/२०१८ रोजी संपल्याने मा. महासभा ठराव क्र.२१ दि.२०/०४/२०१८ च्या निर्णयान्वये पूर्वलक्षी प्रभावाने दि.३१/०३/२०१९ पर्यत उद्यान देखभालीचा मुदतवाढीचा कार्यादेश देणेत आलेला होता. सदर कामाकरिता नियुक्त महिला बचत गट यांना मा.सर्वसाधारण सभा दि.२०/०४/२०१८ रोजीच्या मुदतवाढीच्या कार्योत्तर मंजुरीच्या ठराव क्र.२१ निर्णयानुसार काही नव्याने विकसित झालेल्या उद्यानांच्या देखभालीकरिता नविन स्थानिक महिला बचत गट नियूक्त करण्यात आले आहेत. पुर्वी कार्यरत असलेल्या महिला बचत गटांस पूर्वलक्षी प्रभावाने दि.३१/०३/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर उद्यानांपैकी काही उद्यानांमध्ये नविन स्थानिक महिला बचत गट नियुक्त होईपर्यंत पुर्वी कार्यरत असलेल्या महिला बचत गटांस पुर्वलक्षी प्रभावाने दि.३१/०३/२०१९ पर्यंत होणाऱ्या खर्चास मुदतवाढ देण्यात आली होती. तद्नंतर मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१७ दि.२०/०८/२०१९ अन्वये उद्याने देखभाल करणेकामी नव्याने स्वारस्य अभिरूची मागविणेत यावी व सदरची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पूर्व कार्यरत असलेल्या महिला बचत गटांना मुदतवाढ देण्यात यावी या निर्णयान्वये सन २०१९-२० करीता दि.३१/०३/२०२० पर्यंत उद्यान देखभालीकामी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार खालील नमुद उद्यानांची देखभाल नियुक्ती केलेल्या महिला बचत गटांमार्फत करण्यात येत होती. त्यानंतर सदर महिला बचत गटास संदर्भ क्र.५ नुसार पूर्वलक्षी प्रभावाने दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात आली होती. तद्नंतर सदर महिला बचत गटास

दि.०१/०४/२०२१ ते दि.३० सप्टेंबर २०२१ पर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने आलेली आहे. त्यानुसार देखभालीकामी कार्यरत महिला बचत गट व उद्यानांच्या प्रतवारीप्रमाणे देण्यात येणारा देखभालीकामीचा मोबदला रक्कम इत्यादी बाबींचा तपशिल खालील प्रमाणे .

	प्रभाग समिती - ए (बोळिंज)			
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यानांची प्रतवारी	प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना
१	वृक्ष नक्षत्र व वनस्पती उद्यान	युक्ती महिला बचत गट	B	२६,४५०/-
२	मनु तलाव	जय भवानी महिला बचत गट	B	२६,४५०/-
३	रानपाडा तलाव	के.जी.एन. स्वयंसहाय्यता महिला बचत गट,	B	२६,४५०/-
४	विवा उद्यान, एम. बी. इस्टेट	मंगलमूर्ती महिला बचत गट	B	२६,४५०/-
५	लक्ष्मीऋषी उद्यान	नजराणा महिला स्वयंसहाय्यता गट,	C	१३,२२५/-
६	रुणवाल विहार (सम्राट व्हिला) उद्यान	संजीवनी महिला स्वयंसहाय्यता गट	C	१३,२२५/-
७	चाचा नेहरु नारंगी उद्यान	सावित्रीबाई फुले महिला बचत गट	B	२६,४५०/-
८	कोफराड तलाव	परिवार महिला स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	२६,४५०/-
९	कमानवाला कॉम्पलेक्स उद्यान	नंदनवन महिला बचत गट	B	२६,४५०/-
१०	सायन्स विज्ञान उद्यान	स्वकृता महिला बचत गट	B	२६,४५०/-
११	विराट नगर वैकुंठ स्मशान भुमी	समर्थ महिला बचत गट	B	२६,४५०/-
१२	एकदंत बालउद्यान विराट नगर	साईबाबा महिला बचत गट	B	२६,४५०/-
१३	नारंगी गांव तलाव उद्यान	श्री महालक्ष्मी महिला बचत गट	B	२६,४५०/-
१४	कै. कृ.म. उर्फ बापूजी चौधरी परिक्रमा व बाल उद्यान डोंगरपाडा	राधाकृष्ण महिला बचत गट	B	२६,४५०/-
१५	नानभाट तलाव	अस्मिता स्वयंसहाय्यता बचत गट	B	२६,४५०/-

१६	नागरी आरोग्य केंद्र व उद्यान नारिंगी	ओमसाई महिला बचत गट	B	२६,४५०/-
१७	विराट नगर बालउद्यान चाणक्य चौक	शिवसाई महिला बचत गट	C	१३,२२५/-
१८	बालउद्यान नॅशनल स्कूल मागे	संस्कृती महिला बचत गट	C	१३,२२५/-
१९	समर्थ नगर येथिल उद्यान / बोळींज	आदर्श महिला बचत गट	B	२६,४५०/-
२०	चिखलडोंगरी परिक्रमा उद्यान	सर्वेश्वर महिला बचत गट	B	२६,४५०/-
२१	कल्पवृक्ष सोसा., समोरील बालोद्यान	स्वामी समर्थ महिला बचत गट	C	१३,२२५/-
२२	राम मंदिर उद्यान	उमादेवी महिला बचत गट	A	३९,६७५/-
		प्रभाग समिती - बी (विरार पुर्व)		
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यानांची प्रतवारी	प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना
१	रानळे तलाव उद्यान	एकविरा महिला बचत गट	B	२६,४५०/-
२	वासुदेव वालू पाटील मनवेलपाडा उद्यान	सुयश महिला स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	२६,४५०/-
३	तारवाडी रेल्वे ट्रॅक बालोद्यान	कल्पतरु महिला बचत गट	B	२६,४५०/-
४	तारवाडी बाल उद्यान (सुर्यकिरण)	जीवदानी महिला बचत गट	C	१३,२२५/-
५	मातृछाया गार्डन	वज्रेश्वरी महिला बचत गट	C	१३,२२५/-
६	मनवेलपाडा तलाव	गजानन महिला बचत गट	B	२६,४५०/-
७	मोरेगाव तलाव	रिद्धी सिद्धी महिला बचत गट	B	२६,४५०/-
		प्रभाग समिती - सी (चंदनसार)		
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यानांची प्रतवारी	प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना
१	वावटेवाडी बालोद्यान / आर. जे. उद्यान	जय दुर्गा महिला बचत गट	C	१३,२२५/-
२	गोपचरपाडा तलाव उद्यान	चामुंडादेवी महिला बचत गट	B	२६,४५०/-
३	हिंदू स्मशानभूमी उद्यान	वर्धिनी महिला बचत गट	B	२६,४५०/-
४	दुध दर्या फुलपाडा उद्यान / गुलमोहर उद्यान	साईकृपा महिला बचत गट	A	३९,६७५/-
५	खडप्या तलाव उद्यान	महालक्ष्मी प्रसन्न महिला बचत गट	A	३९,६७५/-

६	बर्फेश्वर महादेव उद्यान	धनलक्ष्मी महिला बचत गट	A	३९,६७५/-
प्रभाग समिती - डी (आचोळे)				
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यानांची प्रतवारी	प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना
१	महेश पार्क	हॅलो सखी वैभवलक्ष्मी महिला बचत गट	B	२६,४५०/-
२	आचोळे तलाव	माऊली स्वयंसहाय्यता महिला बचत गट	A	३९,६७५/-
३	नवघर पूर्व पाण्याची टाकी	श्री भवानी महिला बचत गट	C	१३,२२५/-
४	नवघर पूर्व बस डेपोजवळ	सावित्रीबाई महिला बचत गट,	B	२६,४५०/-
५	नागेला तलाव	सावित्रीबाई महिला बचत गट	A	३९,६७५/-
६	स्वागत उद्यान	संतोषी माता महिला बचत गट	B	२६,४५०/-
७	एव्हरशाईन सिटी स्मशानभूमी	जिजाई महिला बचत गट	B	२६,४५०/-
८	सिरॉक उद्यान	शास्वती महिला बचत गट	C	१३,२२५/-
९	पारस उद्यान	रमाई महिला बचत गट	B	२६,४५०/-
१०	नवघर पूर्व मस्जिदजवळील उद्यान	संस्कार महिला बचत गट	B	२६,४५०/-
११	वर्धमान तलाव उद्यान	साई प्रेरणा महिला बचत गट	B	२६,४५०/-
प्रभाग समिती - ई नालासोपारा (प.)				
अ. क्र	उद्यानांचे नाव	महिला बचत गटांचे नाव	उद्यानांची प्रतवारी	प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना
१	लक्ष्मीबेन छेडा नगर	गंगासागर महिला बचत गट	B	२६,४५०/-
२	शनिमंदिर उद्यान	साईनिधी महिला बचत गट	B	२६,४५०/-
३	पाटील हॉस्पिटल	सप्तश्रृंगी महिला बचत गट	B	२६,४५०/-
४	बाटेला तलाव उद्यान	एकविरा महिला बचत गट	B	२६,४५०/-
५	संयुक्त नगर कालिंदी	सखी महिला बचत गट	B	२६,४५०/-
६	महात्मा फुले नगर	सावित्रीबाई फुले महिला स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	२६,४५०/-

७	शांती पार्क	हॅलो सखी श्रावणधारा महिला बचत गट	B	२६,४५०/-
८	झालावाड उद्यान	श्री महालक्ष्मी महिला बचत गट	B	२६,४५०/-
९	वृंदावन उद्यान	हॅलो सखी शुभ महिला बचत गट	A+	५२९००/-
१०	टिंकल उद्यान	जिजामाता महिला बचत गट	B	२६,४५०/-
११	संयुक्त नगर ममता	संतोषी माता महिला बचत गट	B	२६,४५०/-
१२	चंद्रेश कुंज	रिद्धी सिद्धी महिला बचत गट	B	२६,४५०/-
१३	नाना नानी पार्क	प्रगती महिला बचत गट	C	१३,२२५/-
१४	छेडा नगर खुला रंगमंच उद्यान	साथ संगत महिला बचत गट	C	१३,२२५/-
प्रभाग समिती - एफ (पेल्हार)				
अ. क्र	**उद्यानांचे नाव**	**महिला बचत गटांचे नाव**	**उद्यानांची प्रतवारी**	**प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना**
१	धानीव तलाव उद्यान	धनलक्ष्मी महिला बचत गट	A	३९,६७५/-
प्रभाग समिती जी (वालीव)				
अ. क्र	**उद्यानांचे नाव**	**महिला बचत गटांचे नाव**	**उद्यानांची प्रतवारी**	**प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना**
१	परेरा नगर उद्यान	श्री दत्तगुरु महिला बचत गट	A	३९,६७५/-
२	वालीव तलाव	निर्मिती महिला बचत गट	A	३९,६७५/-
३	जूचंद्र तलाव	जय मल्हार महिला बचत गट	A	३९,६७५/-
४	मुरुमपाडा उद्यान	सुखकर्ता महिला बचत गट	C	१३,२२५/-
५	नाईकपाडा उद्यान	मंगलमूर्ती महिला बचत गट	B	२६,४५०/-
६	सिटीझन उद्यान	सुमंगल महिला बचत गट	B	२६,४५०/-
प्रभाग समिती एच (नवघर माणिकपूर)				
अ. क्र	**उद्यानांचे नाव**	**महिला बचत गटांचे नाव**	**उद्यानांची प्रतवारी**	**मोबदला रक्कम प्रती महिना**
१	दिवाणमान स्मशानभूमी	सागरशेत महिला बचत गट	B	२६,४५०/-

२	उमेळमान स्मशानभूमी	पदयात्रा महिला बचत गट	B	२६,४५०/-
३	सुर्या उद्यान	समृद्धी महिला बचत गट	B	२६,४५०/-
४	जॉगर पॉइंट उद्यान		C	१३,२२५/-
५	के. टी. सरमणी उद्यान		C	१३,२२५/-
६	गायत्री मंदिरासमोरील उद्यान		C	१३,२२५/-
७	नरसुळे नाला		C	१३,२२५/-
८	आनंद नगर उद्यान	एकता महिला बचत गट	B	२६,४५०/-
९	स्व. किरण गव्हाणकर		C	१३,२२५/-
१०	सरदार वल्लभभाई पटेल उद्यान		C	१३,२२५/-
११	सागर सरिता उद्यान	प्रगती महिला बचत गट	C	१३,२२५/-
१२	शाहू महाराज उद्यान		C	१३,२२५/-
१३	डी. जी. नगर नाला		C	१३,२२५/-
१४	कै. पद्मण कमळ्या पाटील उद्यान		C	१३,२२५/-
१५	मुक्तीधाम उद्यान		C	१३,२२५/-
१६	नाना नानी पार्क		C	१३,२२५/-
१७	चिमाजी आप्पा उद्यान	स्वरांजली महिला बचत गट	C	१३,२२५/-
१८	मीना नगर उद्यान		C	१३,२२५/-
१९	अष्टविनायक उद्यान		C	१३,२२५/-
२०	वीर जिजामाता उद्यान	गावदेवी महिला बचत गट	B	२६,४५०/-
२१	ओमकारेश्वर उद्यान		B	२६४५०/-
२२	किलबिल उद्यान		C	१३,२२५/-
२३	विघ्नेश्वर उद्यान		B	२६,४५०/-
२४	विद्यामंदिर उद्यान	महालक्ष्मी महिला बचत गट	B	२६,४५०/-
२५	सी कॉलनी उद्यान		C	१३,२२५/-
२६	शांतीवन उद्यान		C	१३,२२५/-
२७	विद्यामंदिर पाण्याची टाकी		C	१३,२२५/-
२८	मैत्री पार्क उद्यान	वैष्णवी महिला बचत गट	C	१३,२२५/-
२९	बालगोपाळ उद्यान		C	१३,२२५/-
३०	अशोक उद्यान	धारावी महिला बचत गट	C	१३,२२५/-
३१	नवयुग नगर उद्यान		C	१३,२२५/-
३२	पूर्वा उद्यान		C	१३,२२५/-
३३	हॅपी कॅसल	गौरीमाता महिला बचत गट	C	१३,२२५/-
३४	साईनगर रंगमंच		B	२६,४५०/-
३५	के. टी. पार्क		C	१३,२२५/-

३६	इंदिरा गांधी उद्यान	ओमसाई महिला बचत गट	B	२६,४५०/-
३७	विशाल नगर उद्यान		C	१३,२२५/-
३८	वसंत उद्यान		C	१३,२२५/-
३९	तुळजादेवी मंदिर उद्यान	वंदन महिला बचत गट	A+	५२,९००/-
४०	तुळजादेवी मंदिर समोरील उद्यान		A+	५२,९००/-
४१	खलाटीपाडा	सप्तश्रृंगी महिला बचत गट	C	१३,२२५/-
४२	माणिकपूर पाण्याची टाकी		C	१३,२२५/-
४३	युनिटी नगर		C	१३,२२५/-
४४	मणिटेपार उद्यान		C	१३,२२५/-
४५	चुळणा बाभोळा रोड स्मशानभूमी	स्वस्तिक महिला बचत गट	C	१३,२२५/-
४६	कृष्णा टाऊनशिप मैदान	ओम साई महिला बचत गट	B	२६,४५०/-
४७	चुळणा तलाव	श्री.राम समर्थ स्वयंसहाय्यता महिला बचत गट	B	२६,४५०/-
४८	अयप्पा मंदिर नाना नानी पार्क	एकता महिला बचत गट	C	१३,२२५/-
प्रभाग समिती आय (वसई)				
अ. क्र	**उद्यानांचे नाव**	**महिला बचत गटांचे नाव**	**उद्यानांची प्रतवारी**	**प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना**
१	लोकमान्य टिळक उद्यान प्रभुआळी	संघर्ष महिला बचत गट	B	२६,४५०/-
२	उमेळा हनुमान मंदिर उद्यान	ओमकार महिला बचत गट	B	२६,४५०/-
३	उमेळा उद्यान		C	१३,२२५/-
४	चिमाजी आप्पा किल्ला गार्डन	जननी महिला बचत गट	B	२६,४५०/-
५	वाल्मिकी मंदिर उद्यान कोळीवाडा	आदर्श महिला बचत गट	B	२६,४५०/-
६	उमेळा विभागीय कार्यालयाजवळील उद्यान	पदयात्रा महिला बचत गट	C	१३,२२५/-
७	पी. कवळी बिल्डर उद्यान कोळीवाडा	संगिनी महिला बचत गट	A	३९,६७५/-
८	वसई कोर्ट नाका जवळील उद्यान	श्री साई महिला बचत गट	C	१३,२२५/-
९	तामतलाव उद्यान	रमाबाई महिला बचत गट	A+	५२,९००/-
१०	हुतात्मा बाळा सावंत उद्यान, पापडी	चाफेबुवा प्रसन्न महिला बचत गट	B	२६,४५०/-
११	नायगांव अमोल नगर उद्यान	मैत्री महिला बचत गट	B	२६,४५०/-

१२	विजय पार्क नायगांव		B	२६,४५०/-
१३	चोबारे तलाव	नवदूर्गा महिला बचत गट	A	३९,६७५/-

वरील तक्ता क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण १२८ उद्यानांची देखभाल महिला बचत गटांमार्फत करणेत येत आहे. तरी, पूर्वकार्यरत असलेल्या महिला बचत गटांना देखभालीकामी देण्यात आलेल्या उद्यानांच्या प्रतवारी प्रमाणे ठरविण्यात आलेल्या मासिक मोबदला रक्कमेनुसार देखभालीकामी खालील नमुद तक्ता क्र.२ नुसार मासिक खर्च रक्कम रू. २९,८८,८५०/- (अक्षरी - एकोणतीस लक्ष अठ्ठयाऐंशी हजार आठशे पन्नास रूपये मात्र/-) इतका खर्च तसेच माहे ऑक्टोबर २०२१ ते माहे मार्च २०२२ या महिन्यांकरीता रक्कम रू.१,७९,३३,१००/- (अक्षरी - एक कोटी एकोणऐंशी लक्ष तेहतीस हजार शंभर रूपये मात्र/-) इतका खर्च अपेक्षित आहे.

तक्ता क्र.२

अ.क्र.	उद्यानांची प्रतवारी	प्रतवारी नुसार मासिक मोबदला रक्कम रु.	प्रतवारी प्रमाणे उद्यानांची संख्या	मासिक खर्च रक्कम रू. (३ x ४)	माहे ऑक्टोबर २०२१ ते माहे मार्च २०२२ पर्यंतचा खर्च (६ महिने)
१	२	३	४	५	६
१	A+	५२,९००	४	२,११,६००/-	१२,६९,६००/-
२	A	३९,६७५	१२	४,७६,१००/-	२८,५६,६००/-
३	B	२६,४५०	६२	१६,३९,९००/-	९८,३९,४००/-
४	C	१३,२२५	५०	६,६१,२५०/-	३९,६७,५००/-
	एकूण		१२८	२९,८८,८५०/-	१,७९,३३,१००/-

सदर कामी होणारा सन २०२१-२२ या वर्षाच्या खर्च लेखाशिर्षक - वृक्षारोपण/उद्यान देखाभाल (लेखा संकेतांक क्रमांक-५५१-२४९०-१) मंजूर तरतुद रक्कम रुपये रु.६००,००,०००/- (अक्षरी - सहा कोटी रूपये मात्र/-) मधुन भागविता येईल. तरी, सदर रू.१,७९,३३,१००/- (अक्षरी - एक कोटी एकोणऐंशी लक्ष तेहतीस हजार शंभर रूपये मात्र/-) इतक्या होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी तसेच सदर कार्यरत महिला बचत गटास माहे ऑक्टोबर २०२१ ते माहे मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ देणेस सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त सो. तथा प्रशासक यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव : सदर प्रस्तावा मधील नमुद एकूण १५० उद्यानांपैकी १२८ उद्याने देखभालीकरीता कार्यरत असलेल्या महिला बचत गटांना उद्यान देखभाल व संगोपन कामाकरीता रू.१,७९,३३,१००/- (अक्षरी - एक कोटी एकोणऐंशी लक्ष तेहतीस हजार शंभर रूपये मात्र/-) इतक्या होणाऱ्या खर्चास तसेच कार्यरत महिला बचत गटांस दि.०१ ऑक्टोबर २०२१ ते दि.३१ मार्च २०२२ पर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

5/10/2021

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६४६

विभाग - सामान्य प्रशासन
दिनांक - ०५/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील सातीवली तलाव, गोडे तलाव जूचंद्र व वणीचा तलाव राजावली मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षाकरीता ठेका पद्धतीने देणेकामी प्राप्त झालेले दरपत्रक मंजूर करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील सातीवली तलाव, गोडे तलाव जूचंद्र व वणीचा तलाव राजावली मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षाकरीता मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी महानगरपालिकेच्या **vvcmc.in** या संकेतस्थळावर तसेच प्रभाग समिती (जी) च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करुन दरपत्रके मागविणेंत आली. मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.क्र.	तलावाचे नाव	दरपत्रकधारकाचे नाव	तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम	दरपत्रकधारकाचे प्राप्त दर
१.	सातीवली तलाव	सत्यदेव सुकई यादव	३१,२१६१/-	३३,३१०/-
		महम्मद रेहमान खाटीक		**३५,२००/-**
		युनुस लुकमान खाटीक		३४,५२५/-

वरील प्राप्त दरापैकी **महम्मद रेहमान खाटीक** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

अ.क्र.	तलावाचे नाव	दरपत्रकधारकाचे नाव	तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम	दरपत्रकधारकाचे प्राप्त दर
२.	गोडे तलाव (जूचंद्र)	**मोहन भालचंद्र म्हात्रे**	२,००,४४४/-	**२,००,५०१/-**
		हितेश अशोक राऊत		२,००,४४५/-
		प्रशांत रामभाऊ म्हात्रे		२,००,४५०/-

वरील प्राप्त दरापैकी **मोहन भालचंद्र म्हात्रे** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

अ.क्र.	तलावाचे नाव	दरपत्रकधारकाचे नाव	तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम	दरपत्रकधारकाचे प्राप्त दर
३.	वनीचा तलाव (राजावली)	**सचिन कन्हैया पाटील**	१,८१,६८३/-	**१,८२,५००/-**
		दिपक पांडुरंग पाटील		१,८२,०००/-
		चेतन केदारनाथ पाटील		१,८२,२००/-

वरील प्राप्त दरापैकी **सचिन कन्हैया पाटील** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे

तरी उपरोक्त तलावांचे प्राप्त झालेले ज्यादा देकाराच्या दरपत्रकातील दरास मान्यता देऊन ज्यादा दराच्या देकार धारकाबरोबर कामाची संविदा, करारनामा व कार्यादेश देणेकामी मान्यतेस्तव सादर.

ठरावाचा निर्णय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती **(जी) वालीव कार्यक्षेत्रातील सातीवली तलाव, गोडे तलाव जूचंद्र व वणीचा तलाव राजावली मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१ ते २०२४ (दि. ०१ जुन २०२१ ते दि. ३१ मे २०२४ पर्यंत)**या तीन वर्षाकरीता मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी मागविणेंत आलेल्या दरपत्रकांतील ज्यादा दराच्या दरपत्रक धारकासोबत कामाची संविदा, करारनामा व कार्यादेश देणेस कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आह

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, **फॅक्स** -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

मुख्यप्रशासकीय ठराव क्र. ६४७ **विभाग :** बांधकाम
दिनांक : ०५/१०/२०२१

मुख्यप्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती 'डी' मधील वॉर्ड क्र. ७८ मध्ये आंबेडकर नगर मेन गेट ते बुध्द विहार पर्यंत आणि आंबेडकर नगर गेट नं. २ पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ६३,८०,०५०/-

प्रशासकीय मंजूरी :- मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांचा ठराव क्र. ३०२ दि. २९/१२/२०२०

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/७१६/२०२०-२१ दि. १०/०५/२०२१

शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- दि. ११/०५/२०२१ (पृष्ठ क्र.प तेप)

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै. लोकसत्ता, दै. नवराष्ट्र, दै. ग्लोबल टाईम्स, दै. खबरे आज तक, दै. प्रातकाळ, दै. इकोनॉमीक टाईस्म, दै. इंडियन एक्सप्रेस

ई-टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख :- दि. १२ /०५ /२०२१ दु. 3.00
(प्रिपरेशन व स्विकारण्याची) पासुन ते १९/०५/२०२१ दु. ३.०० पर्यंत

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा :- ४

ई-टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. २१/०५/२०२१
दु. ३.०० वाजता

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) कार्यकारी अभियंता
२) शहर अभियंता

विहीत मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र. १ मध्ये मागणी प्रमाणे उपलब्ध कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१	मे.एस.एस. एन्टरप्रायजेस	(-) १६.२५ % **कमी**	रक्कम रुपये रु. ५,४२,३०५/- पावती क्र. ३९६४ रक्कम भरल्याची दि. ०९/०७/२०२१	--
२	मे.महेश विजय सातपुते	(-) १५.५०% **कमी**	--	--
३	मे. सुधाकर बी. दातीर	(-) १६% **कमी**	--	--

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. एस.एस.एंटरप्रायजेस व मे सुधाकर बी. दातीर ह्या दोघांचे निविदेतील (-) १६% दर हा तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

सदर कामासाठी एकच कंत्राटदार/अभिकर्ता निश्चित करणे आवश्यक असल्याने दोन्ही कंत्राटदारांना दि. ०१/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे सिलबंद दर दि. ०५/०७/२०२१ रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात सादर करणेबाबत कळविले होते. सदर विषयाबाबत मे. सुधाकर बी.दातीर व मे. एस.एस एंटरप्रायजेस ह्यांनी सादर केलेल्या पत्रा बाबत शहर अभियंता व कार्यकारी अभियंता ह्यांनी मे. एस.एस. एंटरप्रायजेस ह्यांच्या उपस्थितीत चर्चा केली. मे. सुधाकर बी. दातीर ह्यांनी दि. ०५/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे दर (-) १६% कमी असुन सदर दर कमी करण्यास शक्य नाही असे कळवीले आहे. तसेच मे. एस.एस. एंटरप्रायजेस ह्यांनी सादर केलेले (-)१६ % ऐवजी (-) १६.२५ % इतक्या कमी दरास काम करुन देणेस तयार असल्याचे दि. ०५/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तरी मे. एस.एस एंटरप्रायजेस यांच्या (-) १६.२५% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिकेचे कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्याकडे संविदा करणेकरीता मंजूरीस्तव शिफारस असे.

प्रस्तावचा निर्णय :- सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी मे. एस.एस एंटरप्रायजेस ह्यांचा (-)१६.२५ % कमी दर हा सकारात्मक दृष्ट्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, **फॅक्स** -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

मुख्यप्रशासकीय ठराव क्र. ६४८ **विभाग :** बांधकाम
दिनांक : ०५/१०/२०२१

मुख्यप्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती डी मधील वॉर्ड क्र. 87 मध्ये जे.के. टॉवर ते एव्हरशाईन गार्डन पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. १४,८६,२००/-

प्रशासकीय मंजूरी :- मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांचा ठराव क्र. ३०२ दि. २९/१२/२०२०

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/७१६/२०२०-२१ दि. १०/०५/२०२१

शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- दि. ११/०५/२०२१ (पृष्ठ क्र.प ते प)

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै. लोकसत्ता, दै. नवराष्ट्र, दै. ग्लोबल टाईम्स,
दै. खबरे आज तक, दै. प्रातकाळ, दै. इकोनॉमीक टाईस्म,
दै. इंडियन एक्सप्रेस

ई-टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख :- दि. २१/०५/२०२१ दु. ३.०० पासुन ते (प्रिपरेशन व स्विकारण्याची)१९/०५/२०२१ दु. ३.०० पर्यत

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा :- ५

ई-टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. २१/०५/२०२१
दु. ३.०० वाजता

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) कार्यकारी अभियंता
२) शहर अभियंता

विहीत मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र. १ मध्ये मागणी प्रमाणे उपलब्ध कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१	मे. मानसी कंन्स्ट्रक्शन	(-) १३ % **कमी**	--	--
२	मे. राठोड भाग्यजीत ऍन्ड कंपनी	(-) ७ % **कमी**	--	--
३	मे.श्री. सद्गुरु कंन्स्ट्रक्शन	(-) १६.१ % **कमी**	--	--
४	मे. श्री. सुधाकर बी दातीर	(-) १५.००% **कमी**	--	--
५	मे.आतीश मोहिते	(-) १८.३० % **कमी**	F. D. R :- रु. १,९०,०००/-	--

सदर विषयाबाबत निविदा सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर कामी ६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. ६ पैकी ५ निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. प्राप्त ६ पैकी ५ निविदा पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदा धारक मे. आतीश मोहिते ह्यांची (-) १८.३० % कमी दराची निविदा मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर, त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सादर.

प्रस्तावचा निर्णय :- सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी मे. आतीश मोहीते ह्यांचा (-)१८.३०% कमी दर हा सकारात्मक दृष्ट्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६४९ विभाग :- पाणी पुरवठा

दिनांक :- ०५/१०/ २०२१

प्रस्तावाचा विषय :- १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Million Plus Cities गटातील या महापालिकेस प्राप्त झालेल्या अनुदान निधीपैकी ५०% अनुदान निधी मधून पाणी पुरवठा विभागाकडील कामे प्रस्तावित करण्यास तसेच याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यत मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सन २०२०-२१ या वर्षापासून १५ वा वित्त आयोग लागु झाला असून यानुसार १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत राज्यातील नागरी स्वराज्य संस्था Million Plus cities व Non Million Plus cities ना स्वतंत्र निधी मंजूर करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. एफएफसी २०२०/प्र.क्र. ५६/ नवि-४/ मंत्रालय, मुंबई. दि. २८/१०/२०२० अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेचा Million Plus cities या गटात समावेश करण्यात आला आहे. १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेस खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

अ.क्र.	शासन निर्णय	सन	हप्ता	वितरीत निधी (रू.)
१	एफएफसी २०२०/प्र.क्र. ८९/ नवि-४/ मंत्रालय, मुंबई. दि. १०/११/२०२०	२०२०-२१	पहिला	१६,००,००,०००/-
२	एफएफसी २०२१/प्र.क्र. ३३/ नवि-४/ मंत्रालय, मुंबई. दि. १२/०४/२०२१	२०२१-२२	दुसरा	१६,००,००,०००/-
			एकूण	**३२,००,००,०००/-**

वरील प्रमाणे PFMS प्रणाली व्दारे शासनाने बंधनकारक अनुदान निधी महापालिकेस वितरीत केला असून सदर दोन्ही हप्त्यापोटीचा अनुदान निधी महापालिकेस प्राप्त आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. एफएफसी २०२०/प्र.क्र. ५६/ नवि-४/ मंत्रालय, मुंबई. दि. ०३/०५/२०२१ अन्वये १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार राज्यातील Million Plus cities गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून ती पुढील प्रमाणे आहे.

(I) निधी वितरणाचे निकष :-

१. १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Million Plus cities घटकासाठी खालील दोन प्रकारासाठी बंधनकारक अनुदान (Tied Grants) प्राप्त होणार आहे.

अ) वातावरणातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी बंधनकारक अनुदान (Tied Grants for Ambient Air Quality)

ब) पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन यासाठी बंधनकारक अनुदान (Tied Grants for Improving conservation, supply and management of water and efficient solid waste management)

२. Air Quality साठी सन २०२०-२१ साठीच्या अनुदानाचे वितरण नागरी समुहांना करण्यात आलेले असून नागरी समुहात समावीष्ठ नागरी स्थानिक स्वराज्य सं्स्थांनिहाय वितरणाबाबत केंद्र शासनाच्या सुचनेनुसार वितरण व विनीयोगाची कार्यपध्दती यथावकाश स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल.

३. पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन यासाठी बंधनकारक अनुदानाचे नागरी समुहात समावीष्ठ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय वितरण सन २०११ च्या लोकसंख्येच्या निकषानुसार करण्यात येईल.

(II) १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Million Plus Cities गटासाठी पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन यासाठी प्राप्त अनुदानातुन हाती घ्यावयाची कामे :-

अ) पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा (सांडपाणी व मलनिस्सारणासह) (Improving conservation, supply and management of water including waste water & sewerage)

ब) प्रभावी घनकचरा व्यवस्थापन (Efficient solid waste management measures)

क) वरील (अ) व (ब) या दोन्ही घटकासाठी प्रत्येकी ५०% याप्रमाणे निधीचा विनियोग करता येईल.

ड) कोणत्याही एका घटकासाठी गरज पुर्ण झाली असेल तर उर्वरीत निधी दुसऱ्या घटकासाठी वापरता येईल.

इ) वरील (अ) व (ब) या दोन्ही घटकामध्ये पाणी पुरवठा, मलनिस्सारण, घनकचरा प्रकल्पामधील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा हिस्सा उभारण्यासाठी देखील निधीचा वापर करता येईल.

(III) १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Million Plus Cities गटासाठी पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन यासाठी बंधनकारक अनुदानाच्या (Tied Grants for Improving conservation, supply and management of water and efficient solid waste management) प्रशासकीय मंजूरीची कार्यपध्दती :-

१. महानगरपालिका :- १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Million Plus Cities गटातील उपरोक्त अनुदानातून घेण्यात येणाऱ्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित महनगरपालिकेच्या आयुक्तांना असतील.

वरील प्रमाणे रू. ३२ कोटी प्राप्त अनुदान व त्याच्या विनीयोगाबाबत प्राप्त निर्देशानुसार ५०% म्हणजेच रू. १६ कोटी अनुदान निधी पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा (सांडपाणी व मलनिस्सारणासह) या सदराखाली खालील कामे प्रस्तावित करावयाची आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्रशासकीय व वित्तीय मान्यता
१	उसगाव/शिरवली उद्भव २० द.ल.ली पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणे.	रू.९,९८,३८,८२३/-	प्रशासकीय ठराव क्र. ४९७ दि.१६/०२/२०२१
२	सुर्या टप्पा-१ योजनेतील १२०० व १५०० मी.मी. व्यासाची अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची मुख्य जलवाहिनी ढेकाळे व काशीदकोपर या ठिकाणी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणे.	रू.६,१५,२५,३७०/-	-
	एकुण	**रू. १६,१३,६५,८७६/-**	

महानगरपालिकेच्या उसगांव व सुर्या (जूनी) पाणी पुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिन्यांबाबत आय.आय.टी. मुंबई या संस्थेने दि.०५/०१/२०२१ च्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदविले आहेत.

१) उसगाव योजनेतील संपूर्ण PSC मेन लाईन बदलणे.
२) सुर्या टप्पा – १ योजनेतील दिवेकर पाडा ते बाहडोली ब्रीज पर्यंतची PSC १५०० मी.मी व्यासाची २.७० कि.मी लांबीची जलवाहिनी बदलणे.
३) सुर्या टप्पा – १ योजनेतील ढेकाळे सेक्शनची PSC १५०० मी.मी व्यासाची ३५० मीटर लांबीची जलवाहिनी बदलणे.
४) सुर्या टप्पा – १ योजनेतील काशिद कोपर व तानसा सेक्सनची PSC १२०० मी.मी व्यासाची ३५० मीटर लांबीची जलवाहिनी बदलणे.

वरील प्रमाणे आय.आय.टी., मुंबईने नोंदविलेल्या अभिप्रायानूसार PSC जलवाहिन्यांपैकी काही भागातील वरील अ.क्र. १ व २ नुसार जलवाहिन्या बदलण्याची कामे हाती घेतली आहेत.

वसई-विरार शहार महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र. ४९७ दि.१६/०२/२०२१ अन्वये सन २०२०-२१ व २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातील पाणी पुरवठा, भांडवली खर्चामधील "विकास निधी अंतर्गत उसगाव भांडवली कामे" या लेखाशिर्षाअंतर्गत अ.क्र. १ नुसार "उसगाव/शिरवली उद्भव २० द.ल.ली पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणे" कामी रू.९,९८,३८,८२३/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर पारीत ठरावाअनुषंगाने याकामी रू.९,४१,३३,८३६/- किंमतीची निविदा ३ वेळा मागविण्यात आली असून ३ ऱ्या कॉल अंती प्राप्त निविदेस अद्यापपर्यंत

मंजूरी अप्राप्त आहे. सदर काम Million Plus Cities अंतर्गत उपलब्ध अनुदानातून प्रस्तावित करावयाचे असल्याने कामास व खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

अ.क्र. २ मधील काम हे सुर्या टप्पा-१ (जूनी) पाणी पुरवठा योजनेतील असून सदर योजनेची मुख्य जलवाहिनी सुमारे १५ वर्षापुर्वी अंथरल्या आहेत. या मुख्य जलवाहिन्यांपैकी ढेकाळे व काशीदकोपर या ठिकाणी १२०० व १५०० मी.मी. व्यासाच्या पी.एस.सी. प्रकारच्या मुख्य जलवाहिन्या अंदाजे २० ते २५ फुट भुमीगत असून कमकुवत झालेल्या आहेत. सदर जलवाहिनीमध्ये वारंवार गळती लागत असून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगत सदर जलवाहिनी असल्याने गळती दुरूस्त करण्यास अडचणी येत आहेत. आय.आय.टी. मुंबई यांनी त्यांच्या अहवालात सदर जलवाहिन्या बदलण्याबाबत अभिप्राय नोंदविले आहेत त्यामुळे सदर अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. प्रकारची जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे. याकामी महाराष्ट्र जीवन प्राधिरणाच्या सन २०२१-२२ च्या दरसूचीवर आधारीत रू. ६,१५,२५,३७०/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

उपरोक्त प्रमाणे रू. १६,१३,६५,८७६/- ची दोन्ही कामे १५ व्या वित्त अयोगाअंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदान निधी पैकी ५०% रू. १६ कोटी पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा या अनुषंगाने हाती घेण्यास मा. आयुक्त यांनी निर्देश दिले असून सदर खर्च सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील "**१५ व्या वित्त आयोग मिलीयन प्लस सिटी अंतर्गत पाणी पुरवठा व घनकचरा व्यवस्थापन अनुदानासह**" या लेखाशिर्षावरील प्राप्त अनुदान निधी रू.३० कोटी मधून भागविल्यास वरील प्रमाणे बंधनकारक अनुदानाचा विनीयोग होणार आहे. तसेच याकामी महानगरपालिकेच्या खर्चाची देखील बचत होणार आहे. सदर खर्चास व कार्यवाहीस मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. परंतू शासनाने सद्य:स्थितीत महापालिकेवर प्रशासक म्हणून आयुक्त यांची नेमणुक केली असल्याने सदरचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत. तसेच उक्त शासन निर्णयातील निर्णय क्र. (III) नुसार प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

तरी १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Million Plus Cities गटातील या महापालिकेस प्राप्त झालेल्या अनुदान निधीपैकी ५०% अनुदान निधी मधून उसगाव/शिरवली उद्भव २० द.ल.ली तसेच सुर्या टप्पा-१ (जूनी) पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. प्रकारची जलवाहिनी अंथरणे कामी तयार केलेल्या **रू.१६,१३,६५,८७६/-** च्या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे सविनय सादर.

ठराव :-

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. एफएफसी २०२०/ प्र.क्र. ५६/ नवि-४/ मंत्रालय, मुंबई. दि. २८/१०/२०२० अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेचा Million Plus cities या गटात समावेश करून दि. १०/११/२०२० अन्वये रू. १६ कोटीचा पहिला हप्ता व दि.१२/०४/२०२१ अन्वये रू. १६ कोटीचा

दुसरा हप्ता असे एकुण रू. ३२ कोटी बंधनकारक अनुदान महापालिकेस उपलब्ध झाले आहे.

२. दि. ०३/०५/२०२१ अन्वये Million Plus cities गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून निर्णयातील (II) नुसार ५०% पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा तसेच ५०% प्रभावी घनकचरा व्यवस्थापन यासाठी प्राप्त अनुदानातुन कामे हाती घ्यावयाची आहेत.

३. उपरोक्त प्रस्तावात नमुद प्रमाणे प्रशासकीय ठराव क्र. ४९७ दि.१६/०२/२०२१ अन्वये यापुर्वी "उसगाव/शिरवली उद्भव २० द.ल.ली पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणे" कामी रू.९,९८,३८,८२३/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर काम १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार Million Plus cities गटातील या महापालिकेस प्रापत अनुदानातून हाती घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातील पाणी पुरवठा, भांडवली खर्चामधील "विकास निधी अंतर्गत उसगाव भांडवली कामे" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध तरतुदीमधुन घेण्यात आलेल्या सदर कामाचा खर्च सदर लेखाशीर्षावर पुर्नविनोयोजीत करण्यात यावा.

५. प्रस्तावात नमुद नुसार अ.क्र.१ उसगाव/शिरवली उद्भव २० द.ल.ली पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणेकामी अंदाजपत्रकीय रक्कम रू. रू.९,९८,३८,८२३/- व अ.क्र. २ सुर्या टप्पा-१ योजनेतील १२०० व १५०० मी.मी. व्यासाची अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची मुख्य जलवाहिनी ढेकाळे व काशीदकोपर या ठिकाणी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रू.६,१५,२५,३७०/- असा एकुण रू.१६,१३,६५,८७६/- खर्च Million Plus cities अंतर्गत करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

६. पाणी पुरवठा कामांसाठी वापर करावयाचा ५० % बंधनकारक अनुदान निधी रू. १६ कोटी असून त्यावरील होणारा खर्च हा महापालिका स्व:निधीतून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६५० विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १७/ १० /२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तातडीने अंमलबजावणी होत असल्याने या कामकाजासाठी महानगरपालिकेची रुग्णालये,माताबाल संगोपन केंद्रे, कोव्हीड-१९ रुग्णालये, कोव्हीड केअर सेंटर, कोव्हीड हेल्थ सेंटर व क्वारंटाईन सेंटर येथे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाची सेवा दि.०६/१०/२०२१ रोजी समाप्त केल्याने कोव्हीड-१९ ची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता त्यांना १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुढील ६ महिन्यासाठी मुदतवाढ देऊन नियुक्ती आदेश देणे कामी तसेच याकामी येणाऱ्या मानधनापोटीच्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई (प.), विजयनगर- तुळींज रुग्णालय, नालासोपारा (पू.) व सोपारा सामान्य रुग्णालय, नालासोपारा (प.) अशी ३ रुग्णालये कार्यरत आहेत. तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ३ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे व दवाखान्याचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. तसेच शासनाने कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) या आजाराचा संसर्ग रोखण्यासाठी विविध ठिकाणी कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड रुग्णालये स्थापन करण्यांत आली आहे. कोरोना विषाणू या आजारावर नियंत्रण आणणेकामी महानगरपालिकेने विविध उपाययोजना केलेल्या असून कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण, कोव्हीड-१९ फिरते रोग निदान चाचणी केंद्र, फिरते लसीकरण केंद्र, कोरोना कंट्रोल वॉर रुम यासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यंत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत कंत्राटी पध्दतीने आवश्यक असलेला वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग वेळोवेळी दरमहा मानधनावर नियुक्त करण्यांत आलेला आहे. वैद्यकिय अधिकारी बी.एच.एम.एस-८ व ए.एन.एम.-४० हे या कार्यालयात हजर झाले होते. या हजर झालेल्या वैद्यकिय अधिकारी व ए.एन.एम यांची ६ महिन्याची सेवा कालावधी दिनांक ०६/१०/२०२१ रोजी समाप्त करण्यांत आलेला आहे. वैद्यकिय अधिकारी (बी.एच.एम.एस)-८ व ए.एन.एम-४० यांना दि.०७/१०/२०२१ रोजीचा १ दिवसाचा सेवा खंड देणे व याकामी आवश्यकता असल्यास दिनांक ०८/१०/२०२१ रोजी पासुन पुढील ६ महिन्यासाठी किंवा ६ महिन्यापेक्षा कमी कालावधीकरीता असेल इतक्या आवश्यक त्या कालावधीसाठी कंत्राटी सेवेसाठी मुदतवाढ देऊन नियुक्ती आदेश देणे आवश्यक आहे. याकामी वेतनापोटी ६ महिने अंदाजे रु.६६,४८,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात वैद्यकिय अधिकारी वैद्यकिय व्यवस्थापन ठेका या लेखाशिर्षाखाली रु.३१,२१,५०,०००/- या तरतुदीमधून भागविता येईल. डॉ. स्मिता वाघमारे, प्र. साथरोग नियंत्रण अधिकारी यांच्या अभिप्रायानुसार भविष्यात कोव्हीड-१९ रुग्णांची रुग्णांची संख्या वाढल्यास आवश्यकतेनुसार सदर वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची सेवा पुनश्च घेता येईल. तसेच डॉ. अश्विनी माने,

प्र. आर.सी.एच. ऑफिसर यांच्या अभिप्रायानुसार सद्यस्थितीत कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरण केंद्रे- ७ तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये लसीकरण सत्राकरीता ७ डॉक्टर्स व १०३ ए.एन.एम. यांची आवश्यकता आहे. उप-आयुक्त (वैद्यकीय आरोग्य) यांचे अभिप्रायानुसार कोव्हीड-१९ (संभाव्य) तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर आवश्यकतेनुसार आवश्यक त्या वेळी/संख्येत वैद्यकीय अधिकारी व अन्य कर्मचारी सद्याच्या यादीतून घेणेच्या अटीवर उपरोक्त प्रस्ताव मान्य करणेस सादर. याकामी मानधनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) व कलम ५३(३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार वैद्यकीय आरोग्य विभागाचे आवश्यक कामकाजाकरीता ८ वैद्यकीय अधिकारी (बी.एच.एम.एस.) या पदावरील वैद्यकीय अधिकारी यांची सेवा खंडीत करणेस मंजूरी देण्यात येत आहे. सद्यस्थितीत आवश्यक असलेले ४० ए.एन.एम. पदावरील सेवा पुढील ६ महिन्यासाठी किंवा ६ महिन्यापेक्षा कमी असेल इतक्या आवश्यक त्या कालावधीसाठी कंत्राटी सेवा सुरु ठेवणेस मंजूरी देण्यांत येत असून भविष्यात आवश्यक असणारे सर्व पदावरील वैदयकीय अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यकतेप्रमाणे व आवश्यक त्या संख्येने वेळोवेळी नियुक्त करणेस मंजूरी देण्यात येत आहे. याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 651 विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : 08/10/2021

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई येथिल कौलसिटी या रुग्णालया करिता आवश्यक डायलेसिस मशिन्स विनानिविदा खरेदी करणेकामी प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार व जुचंद्र कोवीड रुग्णालय, नायगाव (पू) येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट व म्हाडा संकुलन, बोळींज येथे समर्पित कोविड-केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे.

प्रस्तवाचा मजकूर - वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (ब) अंतर्गत येणाऱ्या तुळींज हॉस्पिटल मध्ये दत्तमंदिर साठवण टाकी येथून पाणीपुरवठा करण्यांत येतो. तुळींज हॉस्पिटल मध्ये महापालिके तर्फे पुरविण्यात येणारे पाणी ६०० लिटर क्षमतेच्या आर.ओ.फिल्टरद्वारे शुद्ध करुन हॉस्पिटलमधील रुग्णांना डायलेसिस उपचारा करिता वापरात येते. सद्यास्थीतीत ६०० लिटर क्षमतेच्या आर.ओ.फिल्टर सलग्न ट्रान्सफर पंप १ एच.पी.क्षमतेचा (सिंगल फेस २० मीटर हेड), यु.व्ही. लॅम्प व पॅनल विद्युतच्या कमी/जास्त दाबाने जळुन बंद पडला आहे. त्यामुळे हॉस्पिटलमधील रुग्णांना डायलेसिस उपचार सुविधा बंद करावी लागली. याबाबत तुळींज हॉस्पीटल प्र. वैद्यकीय अधिक्षक यांनी पत्रान्वये कळविले आहे. याकरीता पाणीपुरवठा विभागा मार्फत तांत्रीक सर्वेक्षण करण्यात आले असुन अहवाल सादर केला आहे. त्याअनुषंगाने सदरचा ट्रान्सफर पंप १ एच.पी.(सिंगल फेस २० मीटर हेड) दुरूस्ती करून पुन्हा आर.ओ.फिल्टर कार्यान्वीत करण्यासाठी बराचा कालावधी लागणार असल्याने नागरीकांच्या आरोग्यच्या सोयीच्या दृष्टीने तातडीने नव्याने ६०० लिटर क्षमतेच्या आर.ओ.फिल्टर सलग्न ट्रान्सफर पंप १ एच.पी.(सिंगल फेस २० मीटर हेड), एम.ऑ.सी - एस.एस ३०४, यु.व्ही. चेंबर, यु.व्ही. लॅम्प, यु. व्ही. पॅनल, केबल, इन-आऊट १" कनेक्शन, १" यु.पी.व्ही.सी पाईप नविन पुरविणे व बसविणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात पंप नादुरूस्त झाल्यास हॉस्पीटल मध्ये तातडीची बाब म्हणून १ पंप स्टॅण्डबाय वापराकरीता उपल्बध करून ठेवणे जेणेकरून आपत्कालीन परिस्थीतीत सदर पंप कार्यान्वीत करून आर.ओ.फिल्टर कार्यान्वीत ठेवता येईल. पाणीपुरवठा अत्याआश्यक बाब असल्याने सदर काम तातडीने करावे लागणार आहे. याकामी निविदा / दरपत्रक मागवून बी-२ प्रकारात काम करावे लागणार आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च
१	प्रभाग समिती (ब) नालासोपारा - पूर्व येथील विजय नगर तुळींज मनपा हॉस्पिटलमधील डायलेसिस विभागाकरिता ६०० लिटर क्षमतेचा आर.ओ. फिल्टर सलग्न ट्रान्सफर पंप १ एच.पी.(सिंगल फेस २० मीटर हेड), एम.ऑ.सी - एस.एस ३०४, यु.व्ही. चेंबर, यु.व्ही. लॅम्प, यु. व्ही. पॅनल, केबल, इन-आऊट १" कनेक्शन, १" यु.पी.व्ही.सी पाईप, नविन पुरविणे व बसविणे	रू.३,००,०००/-

प्रभाग समिती (ब) नालासोपारा - पूर्व येथील विजय नगर तुळींज मनपा हॉस्पिटलमधील डायलेसिस विभागाकरिता ६०० लिटर क्षमतेचा आर.ओ. फिल्टर सलग्न ट्रान्सफर पंप १ एच.पी.(सिंगल फेस २० मीटर हेड), एम.ऑ.सी - एस.एस ३०४, यु.व्ही. चेंबर, यु.व्ही. लॅम्प, यु. व्ही. पॅनल, केबल, इन-आऊट १" कनेक्शन, १" यु.पी.व्ही.सी पाईप, नविन पुरविणे व बसविण कामी होणा-या रक्कम रू.३,००,०००/- इतकया खर्चास प्रशाकिय व वित्तीय मान्यते साठी प्रस्ताव सादर.

ठराव - सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती (ब) नालासोपारा - पूर्व येथील विजय नगर तुळींज मनपा हॉस्पिटलमधील डायलेसिस विभागाकरिता ६०० लिटर क्षमतेचा आर.ओ. फिल्टर सलग्न ट्रान्सफर पंप १ एच.पी.(सिंगल फेस २० मीटर हेड), एम.ऑ.सी - एस.एस ३०४, यु.व्ही. चेंबर, यु.व्ही. लॅम्प, यु. व्ही. पॅनल, केबल, इन-आऊट १" कनेक्शन, १" यु.पी.व्ही.सी पाईप, नविन पुरविणे व बसविणे कामी महानगरपालिका अधिनियमाचे कमल ४९ व ६८(१), ६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
परिमंडळ-१
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६७३ | विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १२/१० /२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये कोरोना विषाणू(कोव्हीड-१९) प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तातडीने अंमलबजावणी होत असल्याने या कामकाजासाठी महानगरपालिकेची रुग्णालये,माताबाल संगोपन केंद्रे, कोव्हीड-१९ रुग्णालये, कोव्हीड केअर सेंटर, कोव्हीड हेल्थ सेंटर व क्वारंटाईन सेंटर येथे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात पुर्वलक्षी प्रभावाने हजर झालेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाची सेवा दि.११/१०/२०२१ रोजी समाप्त केल्याने कोव्हीड-१९ ची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता त्यांना १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुढील ६ महिन्यासाठी अथवा ६ महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी मुदतवाढ देऊन नियुक्ती आदेश देणे कामी तसेच याकामी येणाऱ्या मानधनापोटीच्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई (प.), विजयनगर- तुळींज रुग्णालय, नालासोपारा (पू.) व सोपारा सामान्य रुग्णालय, नालासोपारा (प.) अशी ३ रुग्णालये कार्यरत आहेत. तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ३ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच व दवाखान्याचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. तसेच शासनाने कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) या आजाराचा संसर्ग रोखण्यासाठी विविध ठिकाणी कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड रुग्णालये स्थापन करण्यांत आली आहे. कोरोना विषाणू या आजारावर नियंत्रण आणणेकामी महानगरपालिकेने विविध उपाययोजना केलेल्या असून कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण, कोव्हीड-१९ फिरते रोग निदान चाचणी केंद्र, फिरते लसीकरण केंद्र, कोरोना कंट्रोल वॉर रुम यासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यंत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत कंत्राटी पध्दतीने आवश्यक असलेला वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग दरमहा मानधनावर मा. आयुक्त तथा प्रशासक यांचा ठराव क्र.४६ दि.१९/०४/२०२१ व मा. आयुक्त तथा प्रशासक यांचा ठराव क्र.१३६ दि.३१/०५/२०२१ अन्वये पूर्वलक्षीप्रभावाने हजर होऊन सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेपैकी १) प्रपत्र 'अ' मध्ये दि.११/१०/२०२१ ते दि.३१/१०/२०२१ पर्यंत सेवा समाप्ती होणारे वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस.-१३, बी.एच.एम.एस.-११ व ए.एन.एम.-२८ या एकूण ५२ पदांचा ६ महिन्यांचा सेवा कालावधी हा दि.११/१०/२०२१ पासून दि.३१/१०/२०२१ अशा विविध दिनांकास समाप्त होत आहे. २) प्रपत्र 'ब' मध्ये दि.०१/११/२०२१ ते दि.२७/१२/२०२१ पर्यंत सेवा समाप्ती होणारे वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस.-०१, बी.ए.एम.एस.-१६, बी.एच.एम.एस.-११, जी.एन.एम.-०३ व ए.एन.एम.-४३ या एकूण ७४ पदांचा ६ महिन्यांचा सेवा कालावधी हा दि.०१/११/२०२१ पासून दि.२७/१२/२०२१ अशा विविध दिनांकास समाप्त होत आहे. सबब या सर्व पूर्वलक्षीप्रभावाने हजर होऊन कार्यरत असलेल्या अ.क्र.१ मधील ५२ व अ.क्र.२ मधील ७४ अशा एकूण १२६ पदावरील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाची सेवा कालावधी विविध दिनांकास समाप्त होत असल्याने या सर्वाचा समाप्तीचा कालावधी हा दि.११/१०/२०२१ रोजी समाप्त करण्यांत आलेला आहे.

सबब यानुसार सोबतच्या प्रपत्र 'अ' व 'ब' मधील वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस-०१, बी.ए.एम.एस-२९, बी.एच.एम.एस-२२, जी.एन.एम.-०३ व ए.एन.एम.-७१ यांना दि.१२/१०/२०२१ रोजीचा १ दिवसाचा सेवा खंड देणे व याकामी आवश्यकता असल्यास आवश्यकतेनुसार आवश्यक त्या पदांवर दि.१३/१०/२०२१ रोजी पासुन पुढील ६ महिन्यासाठी अथवा ६ महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी कंत्राटी

पध्दतीने सेवेसाठी मुदतवाढ देऊन अथवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) अन्वये मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा नुसार संकेतस्थळावर प्रसिध्दी देऊन नियुक्ती कामी निवडीकामी पुढील प्रक्रिया करुन नियुक्ती आदेश देणेस मान्यतेची आवश्यकता आहे. याकामी वेतनापोटी ६ महिने अंदाजे रु.२,३४,४८,६००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय व्यवस्थापन ठेका या लेखाशिर्षाखाली रु.३१,२१,५०,०००/- या तरतुदीमधून भागविता येईल. तरी सदरचा विषय प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) व कलम ५३(३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार वैद्यकीय आरोग्य विभागाचे आवश्यक कामकाजाकरीता २२ वैद्यकीय अधिकारी (बी.एच.एम.एस.) या पदावरील वैद्यकीय अधिकारी यांची सेवा खंडीत करणेस मंजूरी देण्यात येत आहे. महानगरपालिका नवीन रुग्णालये सुरळीत चालविणेकरीता आवश्यक पदे नव्याने विहित पध्दतीचा अवलंब करुन भरती प्रक्रियेद्वारे यथाशीघ्र भरावीत. सद्यस्थितीत आवश्यक असलेले एम.बी.बी.एस-०१, बी.ए.एम.एस-२९, जी.एन.एम.-०३ व ए.एन.एम.-७१ पदावरील सेवा सदर पदभरती पूर्ण होईपर्यंत किंवा आवश्यक त्या कालावधीसाठी कंत्राटी सेवा सुरु ठेवणेस मंजूरी देण्यांत येत असुन भविष्यात आवश्यक असणारे सर्व पदावरील वैदयकीय अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यकतेप्रमाणे व आवश्यक त्या संख्येने वेळोवेळी नियुक्त करणेस मंजूरी देण्यात येत आहे. याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

प्रशासकीय ठराव क्र. ६५४ दिनांक : १४/१०/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - ए, बोळींज येथे विरार (प.) प्रभाग क्र.३१ मध्ये विराटनगर स्मशानभूमीमध्ये संरक्षक भिंत व इतर कामे करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२) प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प.) येथे विराटनगर स्मशानभूमी अस्तित्वात आहे.

दि.१७ व १८ मे रोजी वसई विरार शहर महानगरपालिका परिसरात तौक्ते चक्रीवादळाचा फटका बसला. सदर वेळी स्मशानभूमीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सदर स्मशानभूमीमध्ये संरक्षक भिंत बांधणे व सोलिंग व पी.सी.सी. करणे व रंगरंगोटी करणे, ग्रील गेट बसविणे व इतर कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाचे रु.७,७१,२६९/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

तरी सदर ठिकाणी सोलिंग व पी.सी.सी. करणे व रंगरंगोटी करणे, ग्रील गेट बसविणे व इतर कामे करणे आवश्यक आहे. याकरिता बांधकाम संबधीत कामाचे सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दर सुची नुसार अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे.

सदर कामी राज्य दरसुची सन २०१९-२० नुसार पुढीलप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

अंतर्भूत बाब	अंदाजित खर्च
सोलिंग व पी.सी.सी. करणे व रंगरंगोटी करणे, ग्रील गेट बसविणे व इतर कामे करणे	रु.७,७१,२६९/-

४) ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिका विरार (प.) प्रभाग क्र.३१ मध्ये विराटनगर स्मशानभूमीमध्ये संरक्षक भिंत व इतर कामे करणे कामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्यानुसार होणाऱ्या रक्कम रु.७,७१,२६९/- अंदाजित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये प्रदान केलेले अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

अति.आयुक्त
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

प्रशासकीय ठराव क्र. ६७५ दिनांक : १४/१०/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.३१ मध्ये विराटनगर स्मशानभूमीत असलेल्या स्मारकाची दुरुस्ती करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२) प्रस्तावाचां मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प.) येथे विराटनगर स्मशानभूमी अस्तित्वात आहे. सदर स्मशानभूमीच्या बाजूच्या मोकळ्या जागेत कै.अण्णासाहेब वर्तक यांचे स्मारक तत्कालीन नगरपरिषद काळापासून अस्तित्वात आहे. सदर स्मारकात, प्रतिवर्षी १४ जुलै रोजी कै.अण्णासाहेब वर्तक यांचा स्मृतीदिन साजरा केला जातो.

दि.१७ व १८ मे रोजी वसई विरार शहर महानगरपालिका परिसरात तोत्के चक्रीवादळाचा फटका बसला. सदर वेळी स्मारकाचे मोठ्या प्रभागात नुकसान झाले. सदर स्मशानभूमीमधील स्मारक नव्याने बांधणे गरजेचे असून सदर कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन सदर स्मारक बांधणेकरिता व्हाईट मार्बलमध्ये स्मारकाची दुरुस्ती, आर्टिफिशीअल गवत व इ. काम करणे आवश्यक आहे.

तरी सदर ठिकाणी स्मशानभूमीमधील स्मारक नव्याने बांधणे आवश्यक आहे. याकरिता बांधकाम संबधीत कामाचे सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दर सुची नुसार अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे.

सदर कामी राज्य दरसुची सन २०१९-२० नुसार पुढीलप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

अंतर्भूत बाब	अंदाजित खर्च
व्हाईट मार्बलमध्ये स्मारकाची दुरुस्ती, आर्टिफिशीअल गवत	B - २ निविदा (अंदाजे ६.४४ लक्ष)

३) ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.३१ मध्ये विराटनगर स्मशानभूमीत असलेल्या स्मारकाची दुरुस्ती करणे होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम B-२ निविदा (अंदाजे रु.६.४४ लक्ष) या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

अति.आयुक्त
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार पूर्व,जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल

प्रशासकीय ठराव क्र. ६७६ **विभाग – बांधकाम विभाग**

दिनांक-- १४/१०/२०१९

मुख्य प्रस्तावाचा विषय -- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "जी" मधील वॉर्ड नं. ११५ येथील जुचंद्र मध्ये सदगुरु कृपा बंगलो ते प्रेमनाथ शाळेपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर --

अंदाजपत्राकीय रक्कम	--	रु. १,१३,६५,८१२/-
प्रशासकीय मंजूरी	--	मा. सर्वसाधारण सभा वि/ ठराव क्र.०५ दि. १३/१२/२०१९
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्धी	--	जा.क्र. वविशम/शअ/बांध/८५१/ २०१९ दि. २०/१२/२०१९
वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	--	दि. २०/१२/२०१९
वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक	--	दै. आपला महासागर, दै. फ्रि प्रेस जर्नल, दै. नवभारत दै. दै. मिड डे, दै. हिंदमाता मिरर , दै. प्रहार, दै. पुर्णविराम
ई-टेंडरींगव्दारे निवीदा प्रीपेरशनची तारीख	--	दि.०३/०३/२०२०
विहीत मुदतीत ऑनलाईन प्राप्तनिवीदा	--	३
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	--	
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	--	दि.०३/०३/२०२०
प्राप्त निवीदा उघडणारे अधिकारी	--	शहर अभियंता

विहीत मुदतीत खालीलप्रमाणे निवीदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र.२ मध्ये प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटी बाबत धनाकर्ष तपशील	शेरा
१	**मे. एस एम. डेव्हलोपर्स**	**१६.१०% कमी दराने**	--	
२	मे. राठोड भाग्यजीत ऍण्ड कं.	८.९९% कमी दराने	--	
३	मे. व्दारका कंन्स्ट्रक्शन	१६.००% कमी दराने	--	

निर्णय -- सदर विषया बाबत निवीदा सभेत चर्चा करण्यात आली. सदर कामी ३निवीदा प्राप्त झालेल्या आहेत. ३ पैकी सर्व निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. प्राप्त ०३ पैकी सर्व निविदा पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदाधारक मे. एस.एम.डेव्हलपर्स यांच्या १६.१० कमी दराच्या निवीदा मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराच्या निवीदा दरास मान्यता देण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालीका अधिनीयम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणे तसेच त्या अनुषंगाने येणाया इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक,
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व,जि. पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७

ई-मेल

प्रशासकीय ठराव क्र. ६७७ **विभाग – बांधकाम विभाग**

दिनांक -- १४/१०/२०१९

मुख्य प्रस्तावाचा विषय -- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "जी" मधील वॉर्ड नं. १०५ मधील जुचंद्र टिवरी फाटा येथील बाळकृष्ण संकुल ते सेव्हन स्क्वेअर स्कुल पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर --

अंदाजपत्राकीय रक्कम	--	रु. १,१९,८२,१४८/-
प्रशासकीय मंजूरी	--	मा. सर्वसाधारण सभा वि/ ठराव क्र. ०७ दि. १३/१२/२०१९
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्धी	--	जा.क्र. वविशम/शअ/बांध/८५१/ २०१९ दि. २०/१२/२०१९
वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	--	दि. २१/१२/२०१९
वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक	--	दै. आपला महासागर, दै. फ्रि प्रेस जर्नल, दै. नवभारत दै. दै. मिड डे, दै. हिंदमाता मिरर , दै. प्रहार, दै. पुर्णविराम
ई-टेंडरींगव्दारे निवीदा प्रीपेरशनची तारीख	--	दि.०३/०३/२०२०
विहीत मुदतीत ऑनलाईन प्राप्तनिवीदा	--	४
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	--	दि.२१/१२/२०१९
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	--	दि.०३/०३/२०२०
प्राप्त निवीदा उघडणारे अधिकारी	--	शहर अभियंता

विहीत मुदतीत खालीलप्रमाणे निवीदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र.२ मध्ये प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटी बाबत धनाकर्ष तपशील	शेरा
१	**मे.स्कायमॅक्स सिव्हील प्रो.**	**१७.०१% कमी दराने**	--	
२	मे. राठोड भाग्यजीत ऍण्ड कं.	८.९९% कमी दराने	--	
३	मे. व्दारका कंन्स्ट्रक्शन	१६.००% कमी दराने	--	
४	मे. धनेश्वर अनंत भोईर	१६.०० कमी दराने	--	

निर्णय -- सदर विषया बाबत निवीदा सभेत चर्चा करण्यात आली. सदर कामी ४ निवीदा प्राप्त झालेल्या आहेत. ४ पैकी सर्व निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. प्राप्त ०४ पैकी सर्व निविदा पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदाधारक **मे.स्कायमॅक्स सिव्हील प्रो.** यांच्या १७.०१ कमी दराच्या निवीदा मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराच्या निवीदा दरास मान्यता देण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालीका अधिनीयम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणे तसेच त्या अनुषंगाने येणाया इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक,
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल.vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६७८ विभाग :- वैद्यकिय आरोग्य विभाग
दिनांक :- १४ / १० / २०२१

प्रस्तावाचा विषय :- "कोरोना विषाणु (COVID-१९) आपत्तकालीन व्यवस्था"
वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीच्या कोविड रुग्णालयामधील ऑक्सीजन बेडचे Calibration करणे व अहवाल सादर करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह म.म.अ.कलम ५ (२) २ अंतर्गत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. ५,६८,७०१/-

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना (कोविड-१९) विषांणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात अनेक प्रतिबंधात्मक उपाय-योजना केल्या आहेत. या प्रतिबंधात्मक उपाय-योजनाचा भाग म्हणुन कोरोना (कोविड-१९) विषांणुच्या संसर्ग रोखण्यासाठी शासनाने स्थानीक स्तरावर आवश्यकती कार्यवाही पार पाडण्याबाबत निर्देश दिले आहेत. महापालिका क्षेत्रात देखील कोविड-१९ अंतर्गत बाधीत रुग्णांची संख्या दिवसागणीक वाढत असल्याने रुग्णांना ऑक्सीजनचा पुरवठा अपुरा पडत होता. त्याअनुषंगाने चंदनसार, बोळीज, नालासोपारा व वालीव येथील वरूण इंडस्ट्रीज या कोविड रुग्णालयांकरीता ऑक्सिजन जनरेटर प्लान्ट (PSA) उभारण्यात आले आहेत. तसेच लिक्वीड मेडीकल ऑक्सिजन (LMO) प्लान्ट उभारण्याचे नियोजन आहे.

सदर रुग्णालयामध्ये रुग्णांना पुरवठा होणाऱ्या ऑक्सिजनचे Calibration होणे आवश्यक आहे. शासनाच्या निर्देशानुसार NABL कडुन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून (LAB) Calibration करणे कामी मे. गोदरेज कॅलीब्रेशन सर्व्हिसेस यांजकडे विचारणा करण्यात आली होती. सदर ठेकेदार हे नामांकीत असून NABL ची मान्यता प्राप्त आहे. तसेच त्यांना मुंबईतील गोदरेज, फोर्टीस, तुंगा, रिलायन्स अशा नामांकीत रुग्णालयांमधे ऑक्सिजन बेडचे Calibration केल्याचा अनुभव प्राप्त आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महापालिका मालकीच्या रुग्णालयामध्ये एकूण १०७१ ऑक्सिजन बेडची व्यवस्था असून त्याकरीता

मे. गोदरेज कॅलीब्रेशन सर्व्हिसेस यांनी प्रथम वेळी २,०००/- प्रति बेड हा दर सादर केला होता. तद्नंतर मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या समवेत वाटाघाटीअंती ५००/- प्रती बेड असा दर सादर केला होता. पुन:श्च वाटाघाटीअंती ४५०/- प्रती बेड असा अंतिम दर सादर केला आहे. त्याअनुषंगाने रक्कम रू. ५,६८,७०१/- (१८% GST सह) इतका खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेच्या मालकीच्या कोविड रुग्णालयामधील ऑक्सीजन बेडचे Calibration करणे कामी येणारा खर्च हा सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील "नैसर्गिक आपत्ती व इतर" या लेखाशिर्षातून भागविणे शक्य आहे.

सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७-३(क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची-ड, प्रकरण -५ , संविदा २(२) नुसार सदर कामी निविदा न मागविता मे. गोदरेज कॅलीब्रेशन सर्व्हिसेस यांच्या समवेत रू.५,६८,७०१/- (१८% GST सह) संविदा करण्यास सविनय सादर.

ठराव :-

१. महानगरपालिकेच्या मालकीच्या कोविड रुग्णालयामधील ऑक्सीजन बेडचे Calibration करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७-३ (क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त विषयांकित कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची-ड, प्रकरण-५, संविदा २(२) अन्वये निविदा न मागविता **मे. गोदरेज कॅलीब्रेशन सर्व्हिसेस** यांस समवेत संविदा करून कार्यादेश देण्यास व या कामी येणाऱ्या रक्कम **रू.५,६८,७०१/- (१८% GST सह)** खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.) भा.प्र.से.
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६७९ — विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १४/१० /२०२१

प्रस्तावाचा विषय :- केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विरार भागातील प्रभाग समिती अे व सी येथे १८ कि. मी. लांबीची DI पाईप्सची वितरण व्यवस्था अंथरणे तसेच दिवेकर हॉस्पिटल येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा व गोकूळ कॉम्पलेक्स येथे १.५ द.ल.ली क्षमतेचा उंच जलकुंभ उभारणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ५,४६,९६,४९५/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. प्रशासक ठराव क्र. ४८२ दि. १८/०८/२०२१
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्ध	:-	जा.क्र. वविशम/शअ/४५९/२०२१ दि. १८/०८/२०२१
वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी	:-	दै. लोकमत, दै. प्रहार, दै. नवशक्ती; दै. नवभारत, दै. प्रात:काल, दै. द फ्रि प्रेस जर्नल , दै. मिड डे दि. १९/०८/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. २३/०८//२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय वेळ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/शअ/४८९/२०२१ दि. ३०/०८/२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय वेळ जाहिर निविदा प्रसिद्धी	:-	दै. लोकमत, दै. सामना, दै. प्रहार, दै. जागरुक टाईम्स,दै. खबरे आजतक, दै. इंडियन एक्सप्रेस, दै. इकॉनॉमिक्स टाईम्स, दि. ०१/०९/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. ०७/०९/२०२१
वृत्तपत्रातील तृतिय वेळ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/शअ/५२३/२०२१ दि. ०७/०९/२०२१
वृत्तपत्रातील तृतिय वेळ जाहिर निविदा प्रसिद्धी	:-	दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. नवाकाळ, दै. मुबई तरुण भारत, दै. नवभारत, दै. यशोभुमी, दै. फ्रि प्रेस जर्नल, दै. मिड डे दि. ०८/०९/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. २०/०९/२०२१
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. २१/०९/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०१

प्राप्त निविदा उघ डणारे अधिकारी :- मा. शहर अभियंता

ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा) :- दि. २३/०९/२०२१

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार :- ०१

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	**मे. मानस कंन्स्ट्रक्शन**	२९.५६ % जादा दराने **(वाटाघाटी अंती २२.०० % जादा दराने)**

उपरोक्त कामी तृतिय कॉल अंती एकच निविदाकार प्राप्त झाला असून **मे. मानस कंन्स्ट्रक्शन** यांनी निविदेकरीता अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २९.५६% जादा दर सादर केला आहे. सदर दर महापालिकेस जास्त वाटत असल्याने मा. शहर अभियंता यांनी जा. क्र. वविशम / शअ / पापु / ५७२ /२०२१ दि. २८/०९/२०२१ अन्वये मे. मानस कंन्स्ट्रक्शन यांना दि. ०४/०९/२०२१ रोजी वाटाघाटीने दर कमी करण्याच्या चर्चेसाठी निमंत्रित केले होते. त्याअनुषंगाने मे. मानस कंन्स्ट्रक्शन यांनी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या दालनात झालेल्या वाटाघाटी चर्चे अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **२२.०० % जादा दराने** काम करणे शक्य असल्याचे दि. ०४/०९/२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदरच्या दरास निविदा समितीने दि. ११/ १० / २०२१ रोजीच्या बैठकीत दर मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

तरी मे. मानस कंन्स्ट्रक्शन यांच्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **२२.०० % जादा** दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या पुढे प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- १) केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विरार भागातील प्रभाग समिती अे व सी येथे १८ कि. मी. लांबीची DI पाईप्सची वितरण व्यवस्था अंथरणे तसेच दिवेकर हॉस्पिटल येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा व गोकूळ कॉम्पलेक्स येथे १.५ द.ल.ली क्षमतेचा उंच जलकुंभ उभारणे कामी मे. मानस कंन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २२.००% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

३) प्रशासकीय ठराव क्र. ४८२ दि. १८/०८/२०२१ अन्वये उपरोक्त कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली असून वरील मंजूर निविदा दरानुसार येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास सुधारीत वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

४७५५

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६८० विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १४/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वसई भागातील प्रभाग समिती जी, एफ व आय येथे १० कि.मी. लांबीची DI पाईप्सची वितरण व्यवस्था अंथरणे तसेच कारगिल नगर येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा व एव्हरशाईन येथे १.५० द.ल.ली क्षमतेचा उंच जलकुंभ उभारणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	**रु. ४,२४,७८,५४८/-**
प्रशासकीय मान्यता	:-	मा. प्रशासक ठराव क्र. ४८२ दि. १८/०८/२०२१
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्ध	:-	जा.क्र. वविशम/शअ/४५९/२०२१ दि. १८/०८/२०२१
वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी	:-	दै. लोकमत, दै. प्रहार, दै. नवशक्ती, दै. नवभारत, दै. प्रात:काल, दै. द फ्रि प्रेस जर्नल , दै. मिड डे दि. १९/०८/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. २३/०८//२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय वेळ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/शअ/४८९/२०२१ दि. ३०/०८/२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय वेळ जाहिर निविदा प्रसिद्धी	:-	दै. लोकमत, दै. सामना, दै. प्रहार, दै. जागरुक टाईम्स,दै. खबरे आजतक, दै. इंडियन एक्सप्रेस, दै. इकॉनॉमिक्स टाईम्स, दि. ०१/०९/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. ०७/०९/२०२१
वृत्तपत्रातील तृतिय वेळ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/शअ/५२३/२०२१ दि. ०७/०९/२०२१
वृत्तपत्रातील तृतिय वेळ जाहिर निविदा प्रसिद्धी	:-	दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. नवाकाळ, दै. मुबई तरुण भारत, दै. नवभारत, दै. यशोभुमी, दै. फ्रि प्रेस जर्नल, दै. मिड डे दि. ०८/०९/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. २०/०९/२०२१
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. २१/०९/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०१

पा/१५७

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- मा. शहर अभियंता

ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा) :- दि. २३/०९/२०२१

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार :- ०१

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	**मे. आर.जी. कंन्स्ट्रक्शन**	३१.०५ % जादा दराने **(वाटाघाटी अंती २२.०० % जादा दराने)**

उपरोक्त कामी तृतिय कॉल अंती एकच निविदाकार प्राप्त झाला असून **मे. आर.जी. कंन्स्ट्रक्शन** यांनी निविदेकरीता अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३१.०५% जादा दर सादर केला आहे. सदर दर महापालिकेस जास्त वाटत असल्याने मा. शहर अभियंता यांनी जा. क्र. वविशम / शअ / पापु / ५७३ /२०२१ दि. २८/०९/२०२१ अन्वये मे. आर. जी. कंन्स्ट्रक्शन यांना दि. ०४/०९/२०२१ रोजी वाटाघाटीने दर कमी करण्याच्या चर्चेसाठी निमंत्रित केले होते. त्या अनुषंगाने मे. आर. जी. कंन्स्ट्रक्शन यांनी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या दालनात झालेल्या वाटाघाटी चर्चे अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **२२.०० % जादा दराने** काम करणे शक्य असल्याचे दि. ०४/०९/२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदरच्या दरास निविदा समितीने दि. ११/ १० / २०२१ रोजीच्या बैठकीत दर मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

तरी मे. आर. जी. कंन्स्ट्रक्शन यांच्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **२२.०० % जादा** दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- १) केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वसई भागातील प्रभाग समिती जी, एफ व आय येथे १० कि.मी. लांबीची DI पाईप्सची वितरण व्यवस्था अंथरणे तसेच कारगिल नगर येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा व एव्हरशाईन येथे १.५० द.ल.ली क्षमतेचा उंच जलकुंभ उभारणे कामी मे.आर.जी. कंन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २२.००% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

३) प्रशासकीय ठराव क्र. ४८२ दि. १८/०८/२०२१ अन्वये उपरोक्त कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली असून वरील मंजूर निविदा दरानुसार येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास सुधारीत वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६८१ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १४/१० /२०२१

प्रस्तावाचा विषय :- केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नालासोपारा भागातील प्रभाग समिती बी, डी व ई येथे १८ कि. मी. लांबीची DI पाईप्सची वितरण व्यवस्था अंथरणे तसेच जांगीड विरार पुर्व येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा, प्रस्तावित विवा कॉलेज नालासोपारा (पुर्व) येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा व यशवंत गौरव नालासोपारा (प.) येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा उंच जलकुंभ उभारणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	**रु. ८,०६,७५,३७८/-**
प्रशासकीय मान्यता	:-	मा. प्रशासक ठराव क्र. ४८२ . दि. १८/०८/२०२१
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्ध	:-	जा.क्र. वविशम / शअ /४५९/२०२१ . १८/०८/२०२१
वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी	:-	दै. लोकमत, दै. प्रहार, दै. नवशक्ती, . नवभारत, दै. प्रात:काल, दै. द फ्रि प्रेस जर्नल , दै. मिड डे दि. १९/०८/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. २३/०८//२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय वेळ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम / शअ /४८९/२०२१ . ३०/०८/२०२१
वृत्तपत्रातील व्दितीय वेळ जाहिर निविदा प्रसिद्धी	:-	दै. लोकमत, दै. सामना, दै. प्रहार, दै. जागरुक टाईम्स,दै. खबरे आजतक, दै. इंडियन एक्सप्रेस, दै. इकॉनॉमिक्स टाईम्स, दि. ०१/०९/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. ०७/०९/२०२१
वृत्तपत्रातील तृतिय वेळ प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/शअ/५२३/२०२१ दि. ०७/०९/२०२१
वृत्तपत्रातील तृतिय वेळ जाहिर निविदा प्रसिद्धी	:-	दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. नवाकाळ, दै. मुबई तरुण भारत, दै. नवभारत, दै. यशोभुमी, दै. फ्रि प्रेस जर्नल, दै. मिड डे दि. ०८/०९/२०२१
प्रि. बीड मिटींग	:-	दि. २०/०९/२०२१
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. २१/०९/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०१

पा२१५

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- मा. शहर अभियंता

ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा) :- दि. २३/०९/२०२१

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार :- ०१

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	**मे. कपिल एस. ठाकूर**	२७.०० % जादा दराने **(वाटाघाटी अंती २०.०० % जादा दराने)**

उपरोक्त कामी तृतिय कॉल अंती एकच निविदाकार प्राप्त झाला असून **मे. कपिल एस. ठाकूर** यांनी निविदेकरीता अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २०.००% जादा दर सादर केला आहे. सदर दर महापालिकेस जास्त वाटत असल्याने मा. शहर अभियंता यांनी जा. क्र. वविशम / शअ / पापु / ५७४ / २०२१ दि. २८/०९/२०२१ अन्वये मे. कपिल एस. ठाकूर यांना दि. ०४/०९/२०२१ रोजी वाटाघाटीने दर कमी करण्याच्या चर्चेसाठी निमंत्रित केले होते. त्याअनुषंगाने मे. कपिल एस. ठाकूर यांनी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या दालनात झालेल्या वाटाघाटी चर्चे अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **२०.०० % जादा दराने** काम करणे शक्य असल्याचे दि. ०४/०९/२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदरच्या दरास निविदा समितीने दि. ११ / १० / २०२१ रोजीच्या बैठकीत दर मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

तरी मे. कपिल एस. ठाकूर यांच्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **२०.०० % जादा** दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या पुढे प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- १) केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नालासोपारा भागातील प्रभाग समिती बी, डी व ई येथे १८ कि. मी. लांबीची DI पाईप्सची वितरण व्यवस्था अंथरणे तसेच जांगीड विरार पुर्व येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा, प्रस्तावित विवा कॉलेज नालासोपारा (पुर्व) येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा व यशवंत गौरव नालासोपारा (प.) येथे २.०० द.ल.ली क्षमतेचा उंच जलकुंभ उभारणे कामी मे. कपिल एस. ठाकूर यांनी सादर केलेल्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २०.००% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

३) प्रशासकीय ठराव क्र. ४८२ दि. १८/०८/२०२१ अन्वये उपरोक्त कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली असून वरील मंजूर निविदा दरानुसार येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास सुधारीत वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.

14/10

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६८२

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- १४/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालयासह ९ प्रभाग समिती अंतर्गत संगणक जोडणीसाठी नेटवर्कींग (Networking) करणेस एजन्सी निश्चित करणे कामी ई-निविदा करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालयासह ९ प्रभाग समिती अंतर्गत संगणक जोडणीसाठी नेटवर्कींग (Networking) करणे कामी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ६०४ दि. २८/०२/२०१९ रोजीच्या मंजुरी अन्वये दि. ०६/०७/२०१९ ते दि.२९/०८/२०१९ (फेर निविदेसह) या कालावधीत ई-निविदा सादर करण्यात आली होती. दि. ०५/०९/२०१९ रोजी लखोटा क्र. १ उघडण्यात आले असता सदर निविदेत १ निविदाकारानी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली असुन मा. निविदा समितीच्या दि. १३/०९/२०१९ रोजीच्या मंजुरी अन्वये पात्र निविदाधारकाचे क्रं. २ चे वित्तीय बाबींचे लिफाफे दि. १३/०९/२०१९ रोजी उघडण्यात आले.

त्याअनुषंगाने सदर दरांमध्ये वाटाघाटी करुन मा. स्थायी समिती सभा सभा ठराव क्र. ०३ दि. ०२/०५/२०२० रोजी अन्वये दर मंजूर करुन सदर निविदेच्या पुढील कार्यवाहीसाठी मे. Hybrid Infotec यांना सदर कामी सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे कामी दि. ११/०८/२०२० रोजी पत्र देण्यात आले होते. परंतू मे. Hybrid Infotec यांना पत्र देवून त्यांच्या मार्फत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद आला नाही. संदर्भिय टिपणीतील मा.उपायुक्त यांच्या निर्देशान्वये दि.२२/०७/२०२१ रोजी स्मरणपत्र देण्यात आले होते. त्याअनुषंगाने मे. Hybrid Infotec यांच्या मार्फत निविदेतील मंजूर दराने सद्यस्थितीत काम करणे शक्य नाही असे दि.२७ जुलै २०२१ रोजीच्या ई-मेलद्वारे कळविण्यात आले आहे. त्यानुसार मा.उपायुक्त यांनी ई-निविदा करणे कामी निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह ९ प्रभाग समिती अंतर्गत Networking साठी लागणाऱ्या साहित्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

Sr. No.	Item Name	Unit	Estimated Rate	Total
1	CAT-6 Cable (19800 meter)	65 box	6000/-	390000/-
2	Casing Patti	½ inch (1200 patti)	30/-	36000/-
3	Casing Patti	1 inch (2080 patti)	40/-	83200/-
4	Casing Patti	1 ½ inch (3280 patti)	60/-	196800/-
5	24 Port D link switch	10	18500/-	185000/-
6	24 port manageable D link switch	1	19500/-	19500/-
7	16 port D link switch	10	6500/-	65000/-
8	8 port D link switch	20	2000/-	40000/-

9	I/O port box	328	300/-	98400/-
10	RJ 45 Connecters	10	500/-	5000/-
11	Screw (100 per box)	25	80/-	2000/-
12	Rawal Plug (20 per packet)	120	20/-	2400/-
13	Flexible Pipe (in bundle)	5	500/-	2500/-
14	2 U Rack	10	4500/-	45000/-
15	15 U Rack	1	18000/-	18000/-
16	Installation & Labour Charges	19680 mtr	25/-	492000/-
	TOTAL			**1680800/-**

उपरोक्त प्रमाणे वसई-विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालयासह ९ प्रभाग समिती अंतर्गत संगणक जोडणीसाठी नेटवर्कींग (Networking) करणे कामी अंदाजित खर्च रक्कम रु.१६,८०,८००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च लेखा सांकेतांक क्रं.०४१-४१७२-२ 'संगणकीय व्यवस्थापन केंद्र' या लेखाशिर्ष अंतर्गत भागवता यईल. तरी Networking करणेकामी ई- निविदा करुन एजन्सी निश्चीत करणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालयासह ९ प्रभाग समिती अंतर्गत संगणक जोडणीसाठी नेटवर्कींग (Networking) करणेकामी ई-निविदा द्वारे एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(13/10/2024)

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ६८३ **विभाग :- वाहन**
दिनांक :- १४/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- सार्वजनिक दिवाबत्ती देखभाल दुरुस्तीकरिता युटिलिटी वाहनावर हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी मंजूरी मिळणबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सार्वजनिक रस्त्यावरील, उद्यान, तलाव, मैदान, स्मशानभुमी इ. सार्वजनिक ठिकाणी दिवाबत्ती व्यवस्था करणेत आली आहे व त्याची दैनंदिन देखभाल दुरुस्ती महानगरपालिका प्रभाग निहाय विद्युत विभागामार्फत करण्यात येते.

सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेतील शहरातील मनपा मालकिचे विविध उंचीचे विद्युत पोलवरील दिव्यांची देखभाल दुरुस्ती करणेकरीता प्रभाग समिती ए प्रभाग समिती ई, प्रभाग समिती एफ, प्रभाग समिती एच व प्रभाग समिती आय करिता ५ हायड्रोलिक लॅडर वाहन उपलब्ध आहेत व प्रभाग समिती ए करिता १, प्रभाग समिती सी करिता १ , प्रभाग समिती बी ,डी, ई करिता १, प्रभाग समिती एफ करिता १, प्रभाग समिती जी करिता १, प्रभाग समिती एच, आय करिता १, असे एकूण ६ युटिलिटी वाहन उपलब्ध आहेत. त्याचा वापर सार्वजनिक दिवाबत्ती देखभाल दुरुस्ती कामाकरीता होत असतो. प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रात स्वतंत्र हायड्रोलिक लॅडर वाहन उपलब्ध नाही. याकरिता प्रभाग समिती (बी) कडील उपलब्ध असलेल्या एम एच ४८ बी एम ६८९० या युटिलिटी वाहनावर ११ मीटर उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेबाबत मा. आयुक्तांनी निर्देश दिले आहेत.

यापुर्वी प्रभाग समिती ए, प्रभाग समिती डी व प्रभाग समिती जी मधील ३ युटिलिटी वाहनावर ११ मीटर उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेकामाची निविदा प्रक्रिया राबवून कमी दराचे ई-निविदाकार मे. आवटे फॅब्रिकेटर्स अँड ऑटो मोबाईल वर्क्स यांचेसमवेत संदर्भ क्र. २ अन्वये संविदा करण्यात आली असुन संदर्भ क्र. ३ अन्वये ३ युटिलिटी वाहनावर ११ मीटर उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी दि. १५/०६/०२०२१ रोजी कार्यादेश देणेत आलेला आहे.

संदर्भ क्र. ४ अन्वये महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१ डिसेंबर २०१६, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, प्रकरण ३ मधील ३.३.२ नुसार :- पुर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पूनर्प्रत्ययी आदेश सुरुवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्या पुर्वी देता येईल. पूनर्प्रत्ययी आदेश देताना खालील बाबीं विचारात घेण्यात याव्यात.

३.३.२ मधील अ) पूनर्प्रत्ययी आदेश फक्त एकदाच देता येईल आणि त्याचे मूल्य आणि संख्या सुरुवातीच्या आदेशाच्या ५०% किंवा रुपये दहा कोटी (रु. १० कोटी) यापैकी जे कमी असेल, त्यापर्यंतची खरेदी करता येईल. असे नमुद आहे.

३.३.२ मधील क)मुळ आदेशातील खरेदीच्या वस्तुचा पुरवठा पुर्ण झाला असेल तरच पूनर्प्रत्ययी आदेश देता येईल.

३.३.२ मधील ई) पूनर्प्रत्ययी आदेशाव्दारे खरेदी करावयाच्या वस्तुंचा दर्जा मुळ आदेशामध्ये नमुद केलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसावा.

संदर्भ क्र. ३ अन्वये मे. आवटे फॅब्रिकेटर्स अँड ऑटो मोबाईल वर्क्स यांना दि.१५/०६/२०२१ रोजी कार्यादेश दिलेला असल्यामुळे सहा महिन्याचा कालावधी पूर्ण झालेला नाही. तसेच **३.३.२ क)** नुसार मुळ आदेशातील खरेदीच्या वस्तुचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. ३.३.२ मधील ई) नुसार पूनर्प्रत्ययी आदेशाव्दारे खरेदी करावयाच्या वस्तुंचा दर्जा मुळ आदेशामध्ये नमुद केलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नाही.

करिता सदर ठेकेदारास एम एच ४८ बी एम ६८९० या युटिलिटी वाहनावर ११ मीटर उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी कामाचा दर्जा व वस्तुचा पुरवठा समान असल्याकारणाने वेळेचा अपव्यय टाळणेकरिता मागील ठेकेदाराचा कामाचा दर कमी असल्याकारणाने आर्थिक बाबींचा विचार केला असता सदर ठेकेदारास पुनर्प्रत्ययी आदेश बजावणे योग्य होईल.

तरी प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील उपलब्ध असलेल्या युटिलिटी वाहनावर ११ मी. उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी ई-निविदा प्रक्रिया न राबविता महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१ डिसेंबर २०१६, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, प्रकरण ३ मधील ३.३.२ नुसार मागील मंजूर ई-निविदाकार मे. आवटे फॅब्रिकेटर्स अँड ऑटो मोबाईल वर्क्स यांना पुनर्प्रत्ययी आदेश बजावणेस व त्याकामी होणाऱ्या अंदाजित र.रु.१३,००,०००/- पर्यंतच्या खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महापालिका मालकिच्या दिवाबत्ती विभागाकडील ०१ नग युटिलिटी वाहनावर ११ मीटर उंच (जमिनी पासून ११ मीटर उंची पर्यंत) हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी दि. ०१ डिसेंबर २०१६, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, प्रकरण ३ मधील ३.३.२ नुसार मागील मंजूर ई-निविदाकार मे. आवटे फॅब्रिकेटर्स अँड ऑटो मोबाईल वर्क्स यांना पुनर्प्रत्ययी आदेश बजावणेस व त्याकामी होणाऱ्या अंदाजित र.रु.१३,००,०००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता **देणेत येत आहे.**

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६८४

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १८/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०५ व ११५ मधील जुचंद्र परेरा नगर व जुचंद्र गावातील गटारा वरील लोखांडी झाकणे पुरवीणे व बसवीणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०५ व ११५ मधील नायगाव पुर्व परेरानगर तसेच जुचंद्र गावात मोठया प्रमाणात लोकवस्ती असुन सदर ठिकाणच्या सांडपाण्याच निचरा होण्यासाठी महानगरपालिके मार्फत विवीध ठिकाणी गटारांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.यापैकी बरीच गटारे जुनी झालेली असून त्यांवरील लोखंडी झाकणे जिर्ण होऊन मोडकळीस आलेल्याच्या तक्रारी वेळोवेळी स्थनीक नागरीक, लोकप्रतीनीधी व सफाई कर्मचऱ्यांमार्फत ह्या कार्यालयाकडे प्राप्त होत आहेत.

वरील तक्रारींची दखल घेऊन सदर झाकणांची पहाणी करून नवीन लोखंडी झाकणे पुरवीणे व बसवीण्या करीता सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार पुढीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	कामाचा अंदाजित खर्च
१	वॉर्ड क्र.१०५ व ११५ मधील जुचंद्र परेरा नगर व जुचंद्र गावातील गटारा वरील लोखांडी झाकणे पुरवीणे व बसवीणे	रू.४,९१,७१०/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन २०१९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्याअनुषंघीक होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त सो.ह्यांचे कडील दि.२८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र. व.वि.श.म/आका/४८/२०२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ - ०३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६८५ विभाग :- बांधकाम

दिनांक : १८/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११५ मध्ये जुचंद्र मध्ये शिवाजी चौक ते हनुमान मंदिरापर्यंत पाईप गटार बांधणे व कॉक्रीट रोडचे बांधकाम करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११५ मध्ये शिवाजी चौक येथे मोठ्या प्रमाणात रहिवासी आहेत. सदर ठिकाणी सांडपाण्याच्या विल्हेवाट लावण्याकरीता गटार नाही तसेच पावसाळ्यात सदर ठिकाणी पाणी साचून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणी पाईप गटार बांधणे व रस्ता कॉक्रीट करणे आवश्यक आहे. या कामाचे सन २०१९-२० चे वित्तिय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार रू. ४६,४७,६४२/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११५ मध्ये जुचंद्र मध्ये शिवाजी चौक ते हनुमान मंदिरापर्यंत पाईप गटार बांधणे व कॉक्रीट रोडचे बांधकाम करणे कामी अंदाजपत्रकीय रु. ४६,४७,६४२/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६८६

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १८/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधिल भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडमध्ये आर.सी.सी रस्ता बांधणे व इतर विकास कामे करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधिल भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडमध्ये आर.सी.सी रस्ता बांधणे व इतर विकास कामे करणे या प्रस्तावात डंम्पींग ग्राऊंड मधील अंतर्गत कॉक्रीट रस्ता, डंम्पींग ग्राऊंड मधील विविध ठिकाणी अंतर्गत आर.सी.सी गटार, डंम्पींग ग्राऊंड पासून ते मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी गटार, प्रशासकीय/कर्मचाऱ्यांसाठी कार्यालय बांधणे या सर्व बाबींचा समावेश करून रक्कम रू.३,७४,०५,७४३/- चे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले होते. त्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव विभागीय कार्यालया कडून लेखा विभाग व लेखापरिक्षण विभागा मधुन मंजुर करण्यात आला.

तथापी मा.आयुक्त महोदय यांनी डंम्पींग ग्राऊंड मधील इतर सर्व कामे तात्पुर्ती स्थगीत ठेवुन सद्य स्थितीत डंम्पींग ग्राऊंड पासून ते मुख्य नाल्यापर्यंतच्या आर.सी.सी गटाराचे बांधकाम करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने डंम्पींग ग्राऊंड पासून ते मुख्य नाल्यापर्यंतच्या आर.सी.सी गटाराचे रक्कम रू.१,२९,३१,६४२/- चे अंदाजपत्रक व नकाशे तयार करणेत आलेले आहेत.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधिल भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडमध्ये आर.सी.सी रस्ता बांधणे व इतर विकास कामे करणे ह्या कामामधिल डंम्पींग ग्राऊंड पासून ते मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी गटार बांधणे कामी रक्कम रू.१,२९,३१,६४२/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. याकामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहिर निविदा वृतपत्रात प्रसिध्द करून ई-निविदा मागविण्यात यावी.

18/10.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६८७

विभाग: पाणी पुरवठा
दिनांक: १८/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती 'एच' दिवाणमान, युनियन बँकेच्या समोरील,विशालनगर आणि एव्हरशाईन मार्केट येथे असलेल्या व्हॉल्वचे चेबर्स कवर दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे .

प्रस्तावाचा मजकूर: वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नवघर माणिकपूर दिवाणमान, युनियन बँकेच्या समोरील,विशालनगर आणि एव्हरशाईन मार्केट येथे व्हॉल्व आहेत. सद्यास्थितीत सदर व्हॉल्व चेबर्सचे कवर तुटलेले असल्याने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.त्यानुसार सदर काम प्रस्तावित करणेत आलेले आहे. या कामासांठी म.जी.प्रा. दरसुची(सन-२०२१-२२) नुसार एकूण अंदाजित रक्कम रुपये २५६८८४/- खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजीत खर्च
१	प्रभाग समिती 'एच' अंतर्गत दिवाणमान, युनियन बँकेच्या समोरील,विशालनगर आणि एव्हरशाईन मार्केट येथे असलेल्या व्हॉल्वचे चेबर्स कवर दुरुस्ती करणे	२५६८८४/-

ठराव :

उपरोक्त नमुद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक व त्या अनुषंगीक होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त सो. यांच्या कडील दि.२८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म.आका/४८/२०२१ आदेशान्वये मला प्राप्त प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

उप. आयुक्त
परिमंडळ-३
वसई विरार शहर महानगर पालिका

E:\20400/prabhag samiti H

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६८८ विभाग : बांधकाम
दिनांक : १८/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील सर डी. एम. पेटीट रुग्णालयाच्या नविन इमारतीच्या पहिल्या मजल्यावर अतिदक्षता विभागाकरिता फर्निचर व कर्टन (पडदे) बसविणेचे काम करणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. २,८९,९३२/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. उपायुक्त परिमंडळ ३ आ.क्र. २२९ दि. १२/०७/२०२१
तांत्रिक मंजुरी	:-	मा. उप अभियंता पा.क्र. ०१ अ.क्र. ०४ दि. १४/०७/२०२१
निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	:-	वविशम/उ.आ.प.३/१११२/२०२१ दि. ३०/०८/२०२१
निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. २४/०९/२०२१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	उप अभियंता
एकुण निविदा	:-	०३
निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा)	:-	दि. २८/०९/२०२१

<u>प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-</u>

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१.	मे. बाबा कंस्ट्रक्शन	२.६०% जास्त दराने	-
२.	मे. आफताब इंफ्रा.	अंदाजपत्रकीय दराने	
३.	मे. रवि विरभद्र भुसाटे	४.३०% जास्त दराने	-

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता मे. आफताब इंफ्रा यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता मे. आफताब इंफ्रा यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराने हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

दि. २५/०९/२०२१ रोजी अन्वये मा. निविदा समितीने मे. आफताब इंफ्रा यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन मे. आफताब इंफ्रा यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचीत निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. आफताब इंफ्रा हयांची अंदाजपत्रकीय दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२१ दि. २८/०६/२०२१ रोजीने मा. उपायुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

(तानाजी नरळे)
उपायुक्त परिमंडळ-३
वसई विरार शहर महानगरपालिका

G:\New Folder\2. ANIKET\Tharav, Goshwara & Tipni\2 Kame\01 Fernicher\D-Tharav.docx

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६८९ विभाग : बांधकाम
दिनांक : १८/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील सर डी. एम. पेटीट रुग्णालयातील ETP Plant दुरुस्ती करणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ४६,७८२/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. उपायुक्त परिमंडळ ३ आ.क्र. २२८ दि. १२/०७/२०२१
तांत्रिक मंजुरी	:-	मा. उप अभियंता पा.क्र. ०१ अ.क्र. ०५ दि. १४/०७/२०२१
निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	:-	वविशम/उ.आ.प.३/१११२/२०२१ दि. ३०/०८/२०२१
निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. २४/०९/२०२१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	उप अभियंता
एकुण निविदा	:-	०३
निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा)	:-	दि. २८/०९/२०२१

<u>प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-</u>

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१.	मे.आर कॉन इंजि ॲण्ड कॉंट्रक्टर्स	४.९०% जास्त दराने	-
२.	मे. राजकुमार व्ही. ठाकुर	२.४०% जास्त दराने	-
३.	मे. सहारा एंटर	अंदाजपत्रकीय दराने	

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराने हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

दि. २८/०९/२०२१ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी सदर जाहीर निविदा सुचना बी - २ प्रसिध्दी करुन मान्यता मिळावी ही विनंती .

सबब प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (३) क अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव - सबब उपरोक्त नमुद ,प्रभाग समिती एफ पेल्हार विलगीकरण कक्ष वरुण इंडस्ट्री कोव्हीड -१९ येथे पाणी रिव्हर्स ऑसमॉसिस टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\11-1-19 Dar manjuri.docx598

आर.ओ.फिल्टर यंत्र व पाणी पुरवठा संदर्भिय साहीत्य ,दुरुस्ती कामे इत्यादी व इतर विविध कामे करणेसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकरीता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८(१),६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उपायुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर

पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१

फॅक्स : ०२५०-२५२५१०७

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . विभाग :- पाणीपुरवठा

000 दिनांक :-२५/१०/ २०२१

<u>प्रस्तावाचा विषय</u> :- वसई विरार शहरमहानगरपालिका , प्रभाग समिती एफ पेल्हार विलगीकरण कक्ष वरुण इंडस्ट्री कोव्हीड -१९ येथे पाणी रिव्हर्स ऑसमॉसिस (४० लीटर /तास आर .ओ टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण आर.ओ.फिल्टर यंत्र नव्याने पुरविणे व कार्यन्वीत करणे.

<u>प्रस्तावाचा मजकुर</u> -

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव वाढत आहे त्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने वरुण इंडस्ट्री वालीव येथे कोव्हीड - १९ विलगीकरण कक्ष उभारण्यात आले आहे .तरी तेथिल रुग्णाना व आरोग्य अधिकारी व कर्मचारी याना पिण्यासाठी शुध्द पाणी आवश्यक व गरजेचे आहे .

तरी सदर ठीकाणी (४० लीटर /तास आर .ओ टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण आर.ओ.फिल्टर यंत्र हे महानगरपालिके मार्फत नव्याने बसवुन कार्यान्वयीत करणे गरजेचे आहे.

तरी वरुण इंडस्ट्री वालीव येथे कोव्हीड - १९ विलगीकरण कक्ष येथे पाणीशुध्दीककरण करण्यासाठी पाणी

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\11-1-19 Dar m- ·iuri.docx592

रिव्हर्स ऑसमॉसिस (४० मीटर /तास आर .ओ टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण आर.ओ.फिल्टर यंत्राची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करुन सुव्यवस्थित ठेवणे गरजेचे आहे या कामी वार्षिक देखभाल दुरुस्ती करीता बी- २ प्रकारचे निविदेत दर मागवुन काम करावयाचे आहे .

सदर कामांची निविदा सुचना स्थानिक फलकावर प्रसिध्द करुन कामाच्या बी -२ निविदा मागविणे आवश्यक आहे.

सदर कामाचा खर्च " प्रभाग समिती स्तरावरील जल मल निधि विषयक कामे " या लेखाशिर्षक अंतर्गत भागविण्यात येणार आहे .

१.लेखाशिर्ष- प्रभाग समिती स्तरावरील जल मल निधि विषयक कामे

२. मुळ तरतुद -२,००,००,०००/-

३ . उपलब्ध शिल्लक - २,५२ , ०१,९४९/-

या कामी होणारा खर्च सन २०२०-२२ या वित्तीय वर्षातील " प्रभाग समिती स्तरावरील जल मल निधि विषयक कामे या लेखाशिर्षकातील रक्कम रु २,००,००,०००/- तरतुद मधुन भागविण्यात येईल .

तरी सदर जाहीर निविदा सुचना बी - २ प्रसिध्दी करुन मान्यता मिळावी ही विनंती .

सबब प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (३) क अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव - सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती एफ पेल्हार विलगीकरण कक्ष वरुण इंडस्ट्री कोव्हीड -१९ येथे पाणी रिव्हर्स ऑसमॉसिस (४० मीटर /तास आर .ओ टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण आर.ओ.फिल्टर

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\11-1-19 Dar manjuri.docx593

यंत्र बसवुन कार्यन्वीत करुन वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकरीता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८(१),६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उपायुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\11-1-19 Dar m. juri.docx590

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर

पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१

फॅक्स : ०२५०-२५२५१०७

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . विभाग :- पाणीपुरवठा

७०८ दिनांक :-२५/१०/ २०२१

<u>प्रस्तावाचा विषय</u> :- वसई विरार शहरमहानगरपालिका , प्रभाग समिती एफ पेल्हार विलगीकरण कक्ष वरुण इंडस्ट्री कोव्हीड - १९ येथे पाणी रिव्हर्स ऑसमॉसिस (१००० लीटर /तास आर .ओ टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण आर.ओ.फिल्टर यंत्राची (तीन लक्ष)वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.

<u>प्रस्तावाचा मजकुर</u> -

सादर करण्यात येते ,वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव वाढत आहे त्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने वरुण इंडस्ट्री वालीव येथे कोव्हीड - १९ विलगीकरण कक्ष उभारण्यात आले आहे .तरी तेथिल रुग्णाना व आरोग्य अधिकारी व कर्मचारी याना पिण्यासाठी शुध्द पाणी आवश्यक व गरजेचे आहे .

तरी सदर ठीकाणी (१००० लीटर /तास आर .ओ टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण आर.ओ.फिल्टर यंत्र हे महानगरपालिके मार्फत नव्याने बसवुन कार्यान्वयीत करण्यात आलेले आहे .

वरुण इंडस्ट्री वालीव येथे कोव्हीड - १९ विलगीकरण कक्ष येथे पाणीशुध्दीककरण करण्यासाठी पाणी रिव्हर्स ऑसमॉसिस

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\11-1-19 Dar maniuri.docx587

(१००० मीटर /तास आर .ओ टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण आर.ओ.फिल्टर यंत्राची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करुन सुव्यवस्थित ठेवणे गरजेचे आहे या कामी वार्षिक देखभाल दुरुस्ती करीता बी- २ प्रकारचे निविदेत दर मागवुन काम करावयाचे आहे .

सदर कामांची निविदा सुचना स्थानिक फलकावर प्रसिध्द करुन कामाच्या बी -२ निविदा मागविणे आवश्यक आहे.

सदर कामाचा खर्च " प्रभाग समिती स्तरावरील जल मल निधि विषयक कामे " या लेखाशिर्षक अंतर्गत भागविण्यात येणार आहे .

१.लेखाशिर्ष- प्रभाग समिती स्तरावरील जल मल निधि विषयक कामे

२. मुळ तरतुद -२,००,००,०००/-

३. उपलब्ध शिल्लक - २,५२,०१,९४१ /-

या कामी होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील " प्रभाग समिती स्तरावरील जल मल निधि विषयक कामे या लेखाशिर्षकातील रक्कम २,००,००,०००/- तरतुद मधुन भागविण्यात येईल .

तरी सदर जाहीर निविदा सुचना बी - २ प्रसिध्दी करुन मान्यता मिळावी ही विनंती .

सबब प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (३) क अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\11-1-19 Dar manjuri.docx588

ठराव - सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती एफ पेल्हार विलगीकरण कक्ष वरुण इंडस्ट्री कोव्हीड -१९ येथे पाणी रिव्हर्स ऑसमॉसिस (१००० मीटर /तास आर .ओ टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण आर.ओ.फिल्टर यंत्राची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकरीता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८(१),६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उपायुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\11-1-19 Dar ı _uri.docx5t

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार

प्रशासकिय ठराव क्र. ७०९

विभाग :- आस्थापना
दिनांक :-२५/१०/२०२१

विषय :- वसई - विरार शहर महानगपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे कामी विचार विनिमय करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे कडील अधिसुचना क्र.संकिर्ण - २३०६/४१२/ प्र.क्र.२२३/२००९ दिनांक ०३/०७/२००९ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना झालेली असुन ती (क) वर्गात मोडत आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर तत्कालीन नगरपारिषदेतील ८०७ व तत्कालीन ग्रामपंचायती मधील ४०८ अशा एकुण १२१५ कर्मचाऱ्यांची आस्थापना आहे. तसेच महानगरपालिकेचा सुधारीत आकृतीबंध दि.९/९/२०१४ रोजी मंजूर झाला. त्यात २८५२ पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. मंजूर पदांपैकी खालीलप्रमाणे पदांसाठी मागील वर्षी मंजुरीचा प्रशासकिस ठराव क्र. १९३, दिनांक ०३/११/२०२० अन्वये सन २०१९-२० मधील प्रत्यक्ष कामाचे २६५ दिवस विचारात घेऊन रु.४६/- प्रतिदिनप्रमाणे किंवा प्रति कर्मचारी रु.१२,१९०/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी मंजूर करण्यात आली होती व दिपावली सन २०२० मध्ये कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले होते.

अ.क्र.	कर्मचारी तपशिल	कर्मचारी संख्या	सानुग्रह अनुदान प्रति कर्मचारी	एकूण खर्च
१	स्थायी आस्थापना	१०४२	१३४००	१३९६२८००
२	२५६-ई फॉर्म व रोजंदारी कर्मचारी	२६	१३४००	३४८४००
३	NULM	५	१३४००	६७०००
४	क्षयरोग नियंत्रण	१७	१३४००	२२७८००
५	RCH	२४	१३४००	३२१६००
६	NUHM	४३	१३४००	५७६२००
७	महापालिकेमार्फत कंत्राटी (६महिने)	५८३	१३४००	७८१२२००
८	आस्थापना ठेका	१०६६	१३४००	१४२८४४००
	एकूण	**२८०६**	**१०७२००**	**३७६००४००**

सन १९२०-२० मध्ये प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस २६५ असल्याने कर्मचाऱ्यांना २६५ दिवस विचारात घेऊन रु.४६/- प्रतिदिनप्रमाणे किंवा प्रति कर्मचारी रु.१२,१९०/- या दराने सानुग्रह अनुदान अदा करणेत आले होते. तथापी सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात प्रत्यक्ष कामाचे दिवस २४२ आहेत.

तथापी प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस कमी झाल्याने दिपावली सन २०२१ करीता कर्मचाऱ्यांना मागील वर्षापेक्षा अधीक यानुसार सानुग्रह अनुदान प्रतिदिन रु.५५/- याप्रमाणे मंजुर झाल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

अ.क्र.	कर्मचारी तपशिल	कर्मचारी संख्या	सानुग्रह अनुदान प्रति कर्मचारी	एकूण खर्च
१	स्थायी आस्थापना	१०३६	१३३१०	१३७८९१६०
२	२५६-ई फॉर्म व रोजंदारी कर्मचारी	२६	१३३१०	३४६०६०
३	NULM	४	१३३१०	५३२४०
४	क्षयरोग नियंत्रण	१७	१३३१०	२२६२७०
५	RCH	२४	१३३१०	३१९४४०
६	NUHM	४३	१३३१०	५७२३३०
७	महापालिकेमार्फत कंत्राटी (६महिने)	१	१३३१०	१३३१०
८	आस्थापना ठेका	१७३१	१३३१०	२३०३९६१०
	एकूण	२८८२	१०६४८०	३८३५९४२०

सन २०२०-२१ मध्ये कर्मचाऱ्यांना एका वर्षामध्ये सहा महिन्यापासून पुर्ण वर्षापर्यंत सलग सेवेच्या कालावधीसाठी यथाप्रमाणे बोनसची रक्कम अनुज्ञेय असेल. कर्मचाऱ्यांना सन २०२०-२१ ह्या वित्तलब्धीवर दिपावली सन २०२१ करीता महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी, प्रतिनियुक्ती वरील अधिकारी/कर्मचारी, प्रकल्प अधिकारी व समुह संघटक, ठोक वेतनावर कार्यरत कर्मचारी पेल्हार धरण योजनेवरील २५६ ई फॉर्मवरील व रोजंदारी कर्मचारी, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत महानगरपालिका हद्दीत कार्यरत कर्मचारी, इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत कार्यरत कर्मचारी, NUHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी, आस्थापना मार्फत घेतलेले कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचारी अश्या एकूण ३८७५ कर्मचाऱ्यांना दिपावली सन २०२१ करीतासुध्दा सानुग्रह अनुदान मंजूर करणे अपेक्षीत आहे.

महानगरपालिकेच्या विविध विभागात तांत्रिक, प्रशासकीय व विकास कामे करण्यासाठी निविदा प्रक्रियेअंतर्गत नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित पदावरील वेतनाच्या ९०% वेतन अदा करण्याचे धोरण निश्चीत केले आहे. तसेच निवीदाधारकास मासिक बिलामधून बोनसपोटी ८.३३% या दराने रक्कम अदा केली जात नाही. तरी, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिपावली सन-२०२१ करीता महानगरपालिका आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे सानुग्रह अनुदान देणे अपेक्षीत आहे. सबब कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांना दरमहा ८.३३% चे दराने वार्षिक बोनस दिल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

कामगारांची वर्गवारी	मुळवेतन	महागाई भत्ता	८.३३% मासिक बोनस	वार्षिक खर्च
कुशल	१४०००	५४९५ (६म) ५७०५ (६म)	१६२४ (६म) १६४१ (६म)	१९५९०
अर्धकुशल	१३०००	५४९५ (६म) ५७०५ (६म)	१५४१ (६म) १५५८ (६म)	१८५९४
अकुशल	११५००	५४९५ (६म) ५७०५ (६म)	१४१६ (६म) १४३३ (६म)	१७०९४
स्थायी पदाच्या ९०% वेतन	१२१५०	१७९३३	२५०६	३००७२
	१२२४०	१८०६६	२५२४	३०२८८

उपरोक्त तक्तयामध्ये नमुद नुसार कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांना बोनस अदा न करता मनपा स्थायी कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदान दिल्यास महापालिकेच्या वित्तीय खर्चातील भार कमी होणार आहे.

सन २०१९-२० या वर्षात प्रत्यक्ष कामकाजाचे २६५ दिवस होते त्यानुसार प्रतिदिन रु.४६/- नुसार कर्मचाऱ्यास रु.१२,१९०/- इतके अनुदान अदा करणेत आले होते. तथापी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात कार्यालयीन कामकाजाचे एकुण २४२ दिवस आहेत. तथापी कामकाजाचे दिवस कमी असल्याने प्रतिदिन रु.४६/- नुसार सानुग्रह अनुदान अदा केल्यास अनुदानाची रक्कम कमी होते.

सबब जगभरात पसरलेल्या कोरोना वायरस (कोव्हीड-१९) च्या काळात सर्व कर्मचाऱ्यांनी १००% उपस्थिती नियमानुसार कार्यालयात हजर राहून कामे केली आहेत. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर २०% वाढीव दराने रु.५५/- प्रतिदिन या हिशोबाने सानुग्रह अनुदान देणेबाबत शिफारस करणेत येत आहे. महानगरपालिकेने सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांकरीता "महानगरपालिका कर्मचारी वर्गास बक्षिस/ सानुग्रह अनुदान (बोनस)" या लेखाशिर्षाखाली रक्कम रु.४,००,००,०००/- ची तरतुद केली आहे.

तसेच सार्वजनिक आरोग्य विभागात विविध पदांवर कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे नियुक्ती, वेतन, रजा व बोनस बाबतची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत स्वंतत्ररित्या केली जाते, तथापी सार्वजनिक आरोग्य विभागातील कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान अदा करणेची कार्यवाही आस्थापना, मुख्यालय विभागामार्फत केली जात नाही.

तसेच वैद्यकिय आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे बाबतीतही त्यांचे नियुक्ती, वेतन, रजेशी संबंधीत कार्यवाही त्यांचे विभागामार्फत स्वतंत्ररित्या केली जाते, परंतु वैद्यकिय आरोग्य विभागामधील सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कर्मचारी, इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी (RCH) अंतर्गत कार्यरत कर्मचारी व NUHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांना दिवाळी सणानिमीत्त सानुग्रह अनुदान मंजुर करणे तसेच अदा करणेची कार्यवाही आस्थापना विभागामार्फत केली जाते. परंतु सदर कर्मचाऱ्यांचे वेतन तथा नियुक्ती संबंधीत कोणतीही कार्यवाही आस्थापनामार्फत होत नसल्याने सदर विभागाशी संबंधीत सर्व बाबींशी

संबंधीत कार्यवाहीसुध्दा वैद्यकिय आरोग्य विभागामार्फतच करणेत यावी, असे मत आहे. प्रस्तावीत प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

परंतु सद्यस्थितीत दिवाळी दि.०२/११/२१ पासून सुरु होत असल्याने कर्मचाऱ्यांना वेळेत सानुग्रह अनुदान मिळणेकरीता यावर्षीही वैद्यकिय आरोग्य विभागातील उपरोक्त नमुद कर्मचाऱ्यांना दिपावली सन २०२१ करीता सानुग्रह अनुदान मंजुर करणेची कार्यवाही आस्थापना विभागामार्फत करणेत येत आहे.

सबब, वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३, वर्ग-४, प्रकल्प अधिकारी व समुह संघटक, ठोक वेतनावर कार्यरत कर्मचारी पेल्हार धरण योजनेवरील २५६ ई फॉर्मवरील व रोजंदारी कर्मचारी, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कर्मचारी, इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी (RCH) अंतर्गत कार्यरत कर्मचारी, NUHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी, करारपध्दतीने कार्यरत कर्मचारी व आस्थापना मार्फत घेतलेले कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना दिपावली सन २०२१ करीता सानुग्रह अनुदान मंजूर करणेस प्रशासकिय व वित्तीय मंजुरीकरीता सादर करणेत आला होता.

तसेच सदर कर्मचाऱ्यांसह वैद्यकिय आरोग्य विभागातील एकूण ६९८ कर्मचाऱ्यांनाही सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे संदर्भिय पत्र प्राप्त झाले आहे. सदर ६९८ कर्मचाऱ्यांमध्ये कोव्हीड-१९ अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. तरी तातडीच्या प्रसंगी सदर कर्मचाऱ्यांनी महापालिकेकरीता उत्तम कामकाज केले असल्याने सदर कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान करणे योग्य होईल, असे वाटते. सदर कर्मचाऱ्यांचा समावेश केल्यास खालील नमुद कर्मचाऱ्यांस सानुग्रह अनुदान अदा केला जाईल.

अ.क्र.	कर्मचारी तपशिल	कर्मचारी संख्या	सानुग्रह अनुदान प्रति कर्मचारी	एकूण खर्च
१	स्थायी आस्थापना	१०३६	१२१९०	१२६२८८४०
२	२५६-ई फॉर्म व रोजंदारी कर्मचारी	२६	१२१९०	३१६९४०
३	NULM	४	१२१९०	४८७६०
४	क्षयरोग नियंत्रण	१७	१२१९०	२०७२३०
५	RCH	२४	१२१९०	२९२५६०
६	NUHM	४३	१२१९०	५२४१७०
७	महापालिकेमार्फत कंत्राटी (६महिने)	६९९	१२१९०	८५२०८१०
८	आस्थापना ठेका	१७३१	१२१९०	२११००८९०
	एकूण	३५८०	९७५२०	४३६४०२००

सबब सन २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस २४२ आहेत. त्यानुसार महानगरपालिका आस्थापनेवर किमान सहा महिन्यांचा कार्यकाल पुर्ण झालेल्या वैद्यकिय आरोग्य विभागातील ६ महिन्यांच्या कालावधीकरीता करारपध्दतीने कार्यरत ६९८ कर्मचाऱ्यांना सन २०२०-२१ करीता प्रत्यक्ष कामाकाजाचे २४२ दिवस विचारात घेऊन प्रतिदिन रु.५०.३७/- किंवा प्रती कर्मचारी रु.१२१९०/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी अदा करणेस, प्रशासकिय व वित्तीय मंजुरीकरीता सादर करणेत आला होता.

त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

ठराव/ निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सन २०१९-२० रोजी महानगरपालिका आस्थापनेवर किमान ६ महिन्यांचा कार्यकाल पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना सन २०२०-२१ करीता प्रत्यक्ष कामकाजाचे २६५ दिवस विचारात घेऊन प्रतिदिन रु.४६/- किंवा प्रति कर्मचारी रु.१२१९०/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी अदा करण्यांत आली होती.

सन २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस २४२ आहेत. त्यानुसार महानगरपालिका आस्थापनेवर किमान सहा महिन्यांचा कार्यकाल पुर्ण झालेल्या महापालिका स्थायी आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ वरील कर्मचारी, २५६-ई फॉर्म व रोजंदारीवरील कर्मचारी, प्रकल्प अधिकारी, समुह संघटक, ठोक वेतनावर कार्यरत कर्मचारी, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत कर्मचारी, इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी (RCH) अंतर्गत कर्मचारी, ६ महिन्यांच्या कालावधीकरीता करारपध्दतीने कार्यरत कर्मचारी, NUHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी व महापालिकेमार्फत ज्या अभिकर्त्यांस बोनसपोटी रक्कम अदा केली जात नाही, अशा कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांना सन २०२०-२१ करीता प्रत्यक्ष कामाकाजाचे २४२ दिवस

विचारात घेऊन प्रतिदिन रु.५०.३७/- किंवा प्रती कर्मचारी रु.१२१९०/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी अदा करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. प्रती कर्मचारी रु.१२१९०/- याप्रमाणे उपरोक्तनुसार नमुद एकूण ३५८० कर्मचाऱ्यांकरीता रक्कम रु. ४,३६,४०,२००/- इतका खर्च होणे अपेक्षीत आहे.

सबब सन २०२१ चे दिवाळी सणानिमीत्त द्यावयाचे सानुग्रह अनुदानापोटी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

२५/10/२०२१

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 710

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :-25/10/2021

प्रस्तावाचा विषय :- केंद्र शासनाच्या अमृत अभियान किंवा महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान महाअभियान अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नालासोपारा पुर्व (झोन -३) भुयारी गटार योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची वसई तालुक्यातील तत्कालीन वसई, विरार, नवघर माणिकपूर व नालासोपारा या चार नगरपालिका व सभोवतालच्या ५३ गावांचा समावेश करून शासनाने दि. ३ जूलै,२००९ रोजी स्थापना केली महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ३११ चौ. कि.मी. असून महापालिकेचा दर्जा "क-वर्ग महानगरपालिका आहे. या शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार १२,२१,७८६ असून सद्याची अंदाजे २४ लक्ष इतकी लोकसंख्या झाली आहे. सद्यस्थितीत पेल्हार, उसगांव व सुर्या टप्पा-१ व टप्पा-३ पाणी पुरवठा योजनेतून एकूण २३१ द.ल.ली. पैकी गळती वजा जाता प्रत्यक्ष १९६.३५ द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा करण्यांत येत असून याप्रमाणात सुमारे १५६.२८ द.ल.ली. इतके सांडपाणी निर्माण होत आहे. सॅटेलाईट सीटी योजनेअंतर्गत महापालिकेस यापुर्वी बोळींज, विरार पश्चिम (STP-२) करीता रू.६६ कोटी किंमतीचा ३० द.ल.ली. क्षमतेचा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून सदर प्रकल्पाची कामे सन २०१७ मध्ये पुर्ण करून प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.

पालघर जिल्हयातील वसई-विरार शहर हे मुंबई शहरास रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने जोडले असून, दळणवळणाच्या दृष्टीने सोयीस्कर असल्याने तसेच सदर शहरचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विकास क्षेत्रात समावेश असुन मुंबई क्षेत्रातील इतर भागामध्ये विकासासाठी कमी जागा उपलब्ध असल्यामुळे व या भागात विकासाचा वेग मोठ्या प्रमाणात आहे. मोठया प्रमाणावर शहरीकरण व औद्योगिक विकास होत असून शहराच्या विस्तारास हया भागात अजूनही मोकळी जागा उपलब्ध असल्याने या शहराच्या लोकसंखेत झपाटयाने वाढ होत आहे.

केंद्र शासनामार्फत या शहराला सॅटलाईट सिटी म्हणून घोषीत करण्यात आले होते. त्यानुसार तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखडयास शासनाने मान्यता दिली आहे.

सद्य:स्थिती :

केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सीटी कार्यक्रमाअंतर्गत रू. ६६.२२ कोटी च्या वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील बोळींज झोन क्र. -२ मधील ३० द.ल.ली. क्षमतेच्या मलनि:स्सारण प्रकल्पास दि.१८/०८/२०११ रोजी प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली. सदर योजनेतील पहिल्या टप्प्याचे ९९.९% काम पुर्ण झाले असून योजना कार्यान्वित करण्यांत आली आहे.

वसई विरार शहर महानरगपालिका क्षेत्रात घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करणे कामी संपुर्ण नागरी क्षेत्रासाठी ७ STP झोन करीता रू.१२३१.९६ कोटी किंमतीचा भुयारी गटार योजनेचा मास्टर प्लान तयार करण्यात आला आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल UIDSST या योनजेअंतर्गत नोडल एजन्सी MMRDA कडे सादर करण्यात आला व MMRDA ने दि. ११/०२/२०१४ च्या पत्राने महाराष्ट्र शासनास शिफारससह सादर केला असता राज्य शासनाने सदर प्रस्तावास दि.१७/०२/२०१४ अन्वये केंद्र शासनाकडे सादर करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास निर्देशीत केले. त्यानुसार MMRDA दि.१७/०२/२०१४ अन्वये सदर सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या UIDSST या योजनेअंतर्गत मान्यतेसाठी सादर केला आहे परंतू अद्याप सदर प्रकल्प अहवालास मान्यता प्राप्त झालेली नाही.

महाराष्ट्र शासनाने अमृत कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ च्या वार्षिक कृती आराखड्यात वसई विरार मलनि:स्सारण योजनेकरीता रू.१७० कोटीच्या प्रस्तावास मान्यता दिली होती. या रक्कमेच्या अधिन राहून रू.१२३१.९६ कोटी किंमतीच्या सविसतर प्रकल्प अहवालात समाविष्ठ असलेल्या प्रमुख शहरी ७ STP पैकी नालासोपारा झोन क्र.३ च्या मलनि:स्सारण योजनेचा प्रकल्प अहवाल, संकल्पने, आराखडे, नकाशे, अंदाजपत्रके बनविण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात आले परंतू सदर योजनेसाठी आवश्यक निधी महानगरपालिकेस अद्याप पर्यंत उपलब्ध झालेला नसल्याने सदर प्रकल्पाचे काम हाती घेता आले नाही.

महापालिका क्षेत्रात पुरेशी भुयारी गटार योजना व मल नि:सारण प्रकल्प नसल्याने पाणी प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण अधिनियम, १९७४ च्या कलम ३३ ए अंतर्गत मल नि:सारण प्रकल्प उभारण्याचे निर्देश मा. राष्ट्रीय हरीत लवादाने दिले आहेत. तसेच त्या प्रमाणे कार्यवाही न केल्यास महापालिकेस रू. १०.५० लक्ष प्रतिदिन प्रमाणे दंड आकारण्यात येईल असे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दि.२५/०४/२०१९ च्या पत्राने महापालिकेस कळविले आहे. त्याच प्रमाणे मा. राष्ट्रीय हरित लवादाने त्यांचे दि.१२/०७/२०२१ च्या सुनावणीत दंड आकारण्याबाबत विचारणा केली आहे. परंतू सदरचा प्रकल्प पुर्णपणे उभारण्यास वसई-विरार शहर महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने शासनाचे अनुदान प्राप्त झाल्यास सदरचा प्रकल्प राबविणे शक्य होईल.

वरील सर्व बाबींचा विचार होऊन व वसई विरार शहर महानरगपालिका क्षेत्रातील परिस्थिती लक्षात घेता अस्तित्वातील भुयारी गटार योजना अपुरी असल्याने वसई विरार वाढीव भुयारी गटार योजना टप्पा-३ मंजूरीसाठी सादर करावयाच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या Atal Mission For Rejuvenation and Urban Transformation (AMRUT) योजने मध्ये समाविष्ठ करून अनुदान उपलब्ध करून देण्यास शासनास दि.०९/०३/२०१९ च्या पत्राने कळविण्यात आले आहे. परंतू अद्याप महापालिकेच्या भूयारी गटार योजनेअनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली नाही.

प्रस्ताव :

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विकास झपाट्याने होत असून सन २०११ च्या जनगणनेनुसार या क्षेत्राची लोकसंख्या १२.२२ लक्ष असून सन २०२१ ची प्रकल्पीत लोकसंख्या २४ लक्ष असून ३२४ द.ल.ली. प्रतिदिन पाण्याची आवश्यकता असणार आहे. तसेच सन २०३१ च्या ३४ लक्ष लोकसंख्येकरीता ४५९ द.ल.ली. प्रतिदिन पाण्याची गरज भासणार आहे. अस्तित्वातील २३१ द.ल.ली प्रतिदिन पाणी वजा जाता सन २०३१ साली २२८ द.ल.ली प्रतिदिन तर २०४१ साली ३२२ द.ल.ली अतिरीक्त पाण्याची आवश्यकता भासणार आहे.

महानगरपालिका क्षेत्राचा झपाट्याने होणारा विकास व वाढत्या लोकसंख्येचा विचार करून भविष्यातील पाण्याची गरज भागविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेतून १८५ द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार असून खोलसापाडा-१ व खोलसापाडा-२ लघुपाटबंधारे योजना, ता.वसई या दोन प्रकल्पातून ७० द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे. **सद्य:स्थितीत उपलब्ध व भविष्यात उपलब्ध होणाऱ्या पाण्याच्या ८० % निहाय निर्माण होणारे सांडपाणी शास्त्रोक्त पध्दतीने विल्लेवाट लावणेसाठी महापालिकेने पहिल्या टप्प्यात ७ नागरी भागांकरीता भुयारी गटार योजना व मलनि:स्सारण केंद्र उभारणे कामाचा मास्टर प्लान तयार केला आहे. यापैकी नालासोपारा झोन क्र.३ च्या मलनि:स्सारण योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.**

नालासोपारा पुर्व (झोन-३)भागाकरीता भुयारी गटार योजना राबविण्यास महापालिकेने यापुर्वी सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७ दि. १४/०७/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली होती. सद्य:स्थितीत नालासोपारा पुर्व (झोन-३)भागाकरीता सुधारीत रू.३६५.५२ कोटी किंमतीचा तयार करण्यात आलेल्या भुयारी गटार योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवालास केंद्र शासनाच्या अमृत अभियान किंवा महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सादर करावयाचा आहे.

<u>सदर सविस्तर प्रकल्प अहवालात खालील कामांचा समावेश आहे.</u>

(क्षेत्रातील नालासोपारा पुर्व (झोन-३)) :- किंमत रु. ३६५.५२ कोटी

Sr. No.	Name of Sub Work	cost of Components in Rs.
1	Survey	8,76,828
2	Collection System (DWC-HDPE-150 to 200 mm & RCC-250 mm to 1400 mm Length =86.50 km)	55,51,51,377
	2a) Property Connection (HDPE-150 mm)	57,64,00,655
	2b. Road Restoration	15,32,20,389
3	Sewage Pumping Main (MS-1750mm DI K9-1000mm)	10,58,61,581
4	Sewage Pumping Station	16,69,10,502
5	Sewage Treatment Plant (Cap-62 MLD)	131,88,08,970
6	Treated Outfall	1,02,20,242
7	Recycle Water	13,62,61,168
8	Miscellaneous Works	1,64,57,997
9	Shifting of utilities Existion network Rehabilitation works	4,37,36,855
10	Jetting machine	1,63,31,836.36
	Net Cost	**310,02,38,399**
	Additional Cost	32,55,25,032
	Add 7% Escalation Charges of each year (2 years)	9,30,07,152
	Add 3% PDMC Charges	4,34,03,338
	Add 1.4 % Consultancy Charges	9,30,07,152
	Add 3% Contingencies Charges	365,51,81,073/-

महानगरपालिकेने सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातील भाग दोन - भांडवली खर्चामध्ये प्राथमीक वर्षात रू.४० कोटी तरतूद ठेवलेली असून या लेखाशिर्षाअंतर्गत सदर खर्चाचा प्रस्ताव घेणे शक्य आहे. सदर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे. परंतू सद्य:स्थितीत शासनाने वसई-विरार शहर महानगरपालिकेवर मा. प्रशासक म्हणून मा. आयुक्त यांची नेमणूक केली असून सदरचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांना निहीत आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा पुर्व (झोन-३) भागाकरीता तयार केलेल्या रू.३६५.५२ कोटीच्या सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव सादर तसेच केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत किंवा महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यास मान्यता मिळावी.

ठराव :-

१. महापालिका क्षेत्रातील अपुरी भुयारी गटार योजना विचारात घेऊन टप्प्या-टप्प्याने प्रमुख ७ नागरी भागात भुयारी गटार योजना व मलनि:स्सारण केंद्र उभारणे आवश्यक असल्याने यापुर्वी मा. सर्वसाधारण सभेने सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यात रू.१७० कोटीच्या प्रकल्पास शासनाने मंजूरी दिली असता नालासोपारा पुर्व (झोन-३) करीता भुयारी गटार योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात आला परंतू सदर प्रकल्पास शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करून केंद्र/राज्य शासनाच्या विविध योजना / कार्यक्रमांतर्गत मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे.

२. महानगरपालिका क्षेत्रातील नालासोपारा पुर्व (झोन -३) भुयारी गटार योजनेचा रू.३६५.५२ कोटी किंमतीचा तयार करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवालास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत / महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान महाअभियान अंतर्गत किंवा अन्या शासकीय योजनेअंतर्गत मान्यतेसाठी सादर करण्यास मंजूर देण्यात येत आहे.

३. सदर योजनेअंतर्गत स्वतंत्र बँक खाते उघडण्यास व प्राप्त होणारे अनुदान व त्या प्रमाणात महापालिकेचा हिस्सा खात्यावर जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. रू.१०० लक्षच्या वरील प्रकल्पांचे अंदाजपत्रक, आराखडे व तांत्रिक मान्यता IIT-VJTI या संस्थांकडून करून घेण्याबाबत शासन निर्देश आहेत. त्यानुसार सदर प्रकल्प अहवाल IIT मुंबई यांच्याकडे पाठविण्यास व अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२५/10/२०१

(गंगाथरन डी.)भा.प्र.से.
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 711 **विभाग : बांधकाम विभाग**

दिनांक : 25 /10/ **2021**

मुख्य प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) हद्दीतील रानळे तलाव भारतरत्न् डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिक्रमा व नौकाविहार केंद्र (मनवेलपाडा तलाव) व मोरेगाव तलाव ह्या तलावात रंगीत कारंजे बसविणे कामी प्राप्त् निविदांपैकी लघुत्म दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर

अंदाजपत्रकीय रक्कम : - रू.63,18,900/-

प्रशासकीय मंजूरी :- मा. स्थायी समिती सभा दि.14/02/2020. ठराव क्र.

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/बांध/शअ/191/2020 दि. 02/02/2021 शहर अभियंता, वसई- विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक :- दि. 27/02/2019
(जाहिर ई निविदा सुचना)

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :-
1)दै. प्रहार,
2)दै.आपलामहानगर
3)दै. मिड डे
4)दै. इंडियन एक्स्
5)दै. खबरे आजतक
6)दै. जागरूक टाईम्स्
7)दै. पूर्णविराम

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक :- दि. 03/02/2021
(प्रथम फेर ई निविदा सुचना)

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :-
1)दै.महाराष्ट्र टाईम्स्
2)दै.स्टँडर्ड पोस्ट्
3)दै.प्रात:काल
4)दै.यशोभूमी
5)दै.प्रहार
6)दै.द फ्रि प्रेस जनरल
7)दै.पूर्णविराम

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख :- दि. 03/02/2021 दु.3.00 पासून ते 17/02/2021 दु. 3.00 वाजेपर्यंत

विहित मुदतीत ऑनलाईन प्राप्त निविदा :- 06

ई-टेंडरींगद्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) दि. 18/02/2021 दु. 3.00 वाजता

ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.02 उघडण्याची तारीख :- दि.25/03/2021

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- 1. कार्यकारी अभियंता

विहित मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून उघडण्यास लखोटा क्र.02 मध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.3

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
1.	मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस	(-) 9.99 %	--	
2.	मे. साई पोमू कंन्स्ट्रक्शन	(+) 1.00 %	--	
3.	मे. पल्लवी मधुकर जाधव	(-) 14.00 %		
4.	मे. तिर्थराज कंन्स्ट्रक्शन	(-) 3.44 %	--	
5.	मे. सी. एस मोहिते	(-) 10.00 %	--	
6.	मे. ए.जी पाटील	अंदाजपत्रकीय दराने	--	

उपरोक्त् तक्याचे अवलोकन केले असता मे. पल्लवी मधुकर जाधव यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.00 % कमी दराचा देकार हा इतर निविदा दरापेक्षा कमी आहे असून सदर निविदेकरीता निविदा समितीने दि 26/8/21... रोजीच्या बैठकीत मे. पल्लवी मधुकर जाधव यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.00 % कमी दरास मंजूरीकरीता शिफारस केलेली आहे.

मे. पल्लवी मधुकर जाधव यांनी दिलेला देकार योग्य् व वाजवी असल्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) नुसार मे. पल्लवी मधुकर जाधव यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्त्व मा. आयुक्त तथा प्रशासक सो, यांच्या मंजूरीस्त्व सादर.

.....

ठराव – उपरोक्त् कामी मे. पल्लवी मधुकर जाधव यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.00% कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांची मंजूरी दिली आहे. सदर कामी महानगरपालिकेतर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करून संविदा करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांची मंजूरी असे .

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

परिमंडळ -3 कार्यालय, दिवाणमान, जि - पालघर , पिन नं. 401202

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 712

विभाग :- बांधकाम

दिनांक : 25/10/2021

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. ९६ मध्ये दिवाणमान येथे डॉ. दुबे ते किशोर सिहोर यांचे घरापर्यंत पाईप गटार बांधणे कामी अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'एच' मध्ये कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. ९६ मध्ये दिवाणमान येथे डॉ. दुबे ते किशोर सिहोर यांचे घरापर्यंत गटाराची व्यवस्था नसल्याने या परिसरांतील सांडपाणी रस्त्यावरून वाहत आहे. त्यामुळे नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदर जागी प्रत्यक्ष पहाणी करुन वॉर्ड नं. ९६ मध्ये दिवाणमान येथे डॉ. दुबे ते किशोर सिहोर यांचे घरापर्यंत पाईप गटार बांधणेचे रक्कम रु. 248138/- याकरीता वरील ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०१९-२० चे वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब उपरोक्त नमुद ठिकाणी बांधकाम विभागामार्फत वॉर्ड नं. ९६ मध्ये दिवाणमान येथे डॉ. दुबे ते किशोर सिहोर यांचे घरापर्यंत पाईप गटार बांधणे चे काम तातडीने करावयाचे आहे. जा.क्र. वविशम/ आका/ 47/2021 दि.25/06/2021 च्या आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 49 व 68(1) 69(1) व (2) अन्वये वसई विरार शहर महापालीकेचे आयुक्त म्हणून प्रदान केलेल्या अधिकारानुसार मा. उप आयुक्त (परिमंडळ 3) यांच्या मान्यतेने सदर कामी होणा-या रक्कम रू. 248138/- चे अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सादर.

ठराव :- प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं. ९६ मध्ये दिवाणमान येथे डॉ. दुबे ते किशोर सिहोर यांचे घरापर्यंत पाईप गटार बांधणे चे काम करण्यासाठी होणा-या खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांनी उप आयुक्त (परिमंडळ - 3) यांना दि.28/06/2021 रोजीच्या आदेशान्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 49 नुसार रू. 248138/- चे अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देण्यांत येत आहे. सदर कामी निवीदा मागविण्यास मंजुरी देत आहे. या कामी होणा-या इतर अनुषंगीक खर्चास मंजुरी देण्यांत येत आहे.

उप आयुक्त (परिमंडळ - 3)

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, **फॅक्स** -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५१३ **विभाग :** बांधकाम
दिनांक : २५/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत धोकादायक व वापरात नसलेले सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे पाडकाम व बांधकाम करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील धोकादायक व वापरात नसलेले सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचा अहवाल (स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व अंदाजपत्रक) सादर करणे बाबत मा उप-आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांनी सुचीत केले होते. त्या अनुषंगाने प्रभाग समिती बी,सी,डी,ई जी व आय कार्यालया मार्फत खालील प्रमाणे धोकादायक व वापरात नसलेले सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे स्टॅक्चरल ऑडीट केले असुन सदचे शौचालय निष्कसीत करणे कामी खालील प्रमाणे प्रभाग निहाय माहिती प्राप्त झालेली आहे.

अ.क्र	प्रभाग समिती	युनिट	सिटची संख्या	अंदाजपत्रकीय रक्कम
१	बी	२	१२	रु. २३,३०,७७८
२	सी	२	४४	रु. ६४,८५,१८५
३	डी	२	१२	रु. २३,४३,९३५
४	ई	३	६	रु. १२,८१,९६३
५	जी	५	३०	रु. ५८,२६,९४५
६	आय	२	१२	रु. २३,३०,७७८
एकुण		१६	११६	**रु. २,०५,९९,५८४**

तरी वरील प्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती बी, सी, डी, ई, जी व आय मधील धोकादायक व वापरात नसलेले सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे निष्कसीत करुन घेणे आवश्यक असुन मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजूरीस्तव सादर.

तसेच सामुदायीक व सार्वजनिक शौचालयाचे पाडकाम व बांधकाम करणे कामी रु. २,०५,९९,५८४/- या अंदाजपत्रकीय रक्कमेतील १०० सिटचा निधी रक्कम रु. ६५,३३,०००/- हा महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत प्राप्त झाला आहे. व उर्वरीत निधी रक्कम

रु. १,४०,६६,५८४/- हा महानगरपालिकेच्या फंडातून करावा लागेल. सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी प्रस्ताव मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती बी, सी, डी, ई ,जी व आय मधील धोकादायक व वापरात नसलेले सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे निष्कसीत करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे पाडकाम व बांधकाम करणे कामी निधी रक्कम रु. ६५,३३,०००/-हा महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत प्राप्त झाला आहे. व उर्वरीत निधी रक्कम रु. १,४०,६६,५८४/- हा महानगरपालिकेच्या फंडातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तरी एकुण रक्कम रु. २,०५,९९,५८४/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्य नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता देण्यात येत आहे.

5/10

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग : सार्व.बांधकाम

ठराव क्र. ७१४

दिनांक : / २५/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- **सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील तरतुदीच्या पुर्नविनियोजनास मंजूरी मिळणे बाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत धोकादायक व वापरात नसलेले सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे पाडकाम व बांधकाम करणे करीता सार्वजनिक शौचालय मुतारी/प्रसाधनगृह दुरुस्ती या लेखाशिर्षच्या खालील तरतुद अपुर्ण पडत असल्याने कामाची देयके अदा करणेस व नविन प्रस्तावित कामे करणेस अडचण निर्माण झालेली आहे. लेखाविभागातुन शिल्लक तरतुदीची आकडेवारी (२७ ऑगस्ट २०२१ पर्यंत) बांधकाम विभागाला दिलेली आहे.

सदरच्या शौचालयाची विविध कामे करणे करीता व प्रलंबित देयके अदा करणेसाठी सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात खालील नमुद केलेल्या विहित नमुन्यात तरतुद पुर्नविनियोजन करुन देणे आवश्यक आहे.

ह्या लेखाशिर्षातुन (रु. लाखात)						ह्या लेखाशिर्षात (रु. लाखात)				
अ.क्र	लेखाशिर्ष	मुळ तरतुद	आजच्या तारखेपर्यंतचा झालेला खर्च/प्रस्तावित खर्च	वर्ग करावयाची रक्कम	उपलब्ध शिल्लक	लेखाशिर्ष	मुळ तरतुद	आजच्या तारखेपर्यंतचा झालेला खर्च/प्रस्तावित खर्च	प्रस्तावित वाढीची रक्कम	अभिप्राय
१	फुटपाथ	रु. ५.०० कोटी	निरंक	रु.१.५० कोटी	रु ३.५० कोटी	सार्व. शौचालय मुतारी/ प्रसाधन गृह दुरुस्ती	रु. १.५० कोटी	रु. ८.०१ लक्ष	रु. १.५० लक्ष (पुर्नविनियोजन अंती तरतुद रु. ३.०० कोटी)	सदर लेखाशिर्षा अंतर्गत यापुर्वी देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार देयके अदा

										करावयाची असल्याने नव्याने प्रस्ताव तयार करणे कामी तसेच सदर लेखाशिर्षावर तरतुद करणे आवश्यक आहे.

तरि वरीलप्रमाणे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता फुटपाथ या लेखाशिर्षाकातून सार्वजनिक शौचालय मुतारी/प्रसाधनगृह दुरुस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रु. १.५० कोटी तरतुद वर्ग करुन मिळण्यास सदरचा विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रस्तावाचा मजकुर पाहता वाढीव तरतुदीची आवश्यकता असल्याने सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता **फुटपाथ** या लेखाशिर्षाकातून सार्वजनिक शौचालय मुतारी/प्रसाधनगृह दुरुस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रु.१.५० कोटी तरतुद वर्ग करुन सोबत जोडलेल्या नमुना नं. १० मधील लेखाशिर्षाच्या तरतुदीच्या पुनविनियोजनास मंजूरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय, विरार पूर्व, जि- पालघर पिन नं 401 305
दूरध्वनी – 0250 -2525101/02/03/04/05/06, फॅक्स्- 0250- 2525107.
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 715 विभाग: वृक्षप्राधिकरण व उद्यान विभाग
दिनांक: 27 / 10 / 2021

प्रस्तावाचा विषय : सन २०२१-२२ या वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वृक्षलागवडीकरिता खड्डा खोदुन वृक्ष लागवड करणे आणि तीन वर्षे संगोपन व देखभाल करणे कामाचे बी-२ निविदा प्रक्रियेद्वारे दर मागविणेस मान्यता मिळणेबाबत तसेच सदरकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मांन्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर : सादर करण्यात येते कि, शहरी भागांतील प्रदुषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत चालली असुन होणारे प्रदुषण आटोक्यात आणण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्षलागवड करणे आवश्यक आहे. त्यांकरिता स्थानिक हवामानास सुसंगत अशा वृक्षांची निवड करुन त्यांचा वृक्षलागवडीमध्ये अंतर्भाव करणे आवश्यक आहे.

शहरातील रस्ता दुतर्फा, सार्वजनिक ठिकाणे, शहरातील वन विभागाची अवनत वनक्षेत्रे तसेच इतर मोकळया उपलब्ध जागेनुसार वृक्ष लागवड करणेकरिता मा. प्रशासकीय ठराव क्र.३५९ दि. १९/०७/२०२१. अन्वये अंदाजित ६५००० वृक्ष लागवड करणेबाबत होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता घेण्यात आली होती. त्याअनुषंगाने शहरातील वनविभागाच्या अवनत वनक्षेत्रावरती मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करणेस वाव असल्याने सदर अवनत वनक्षेत्रे वृक्ष लागवडीकरिता उपलब्ध करून मिळणेबाबत वन विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला होता परंतु वनविभागाकडुन उपलब्ध जागेचा अहवाल महानगरपालिकेस अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सध्यस्थितीत शहरात ६५००० इतकी मोठया प्रमाणात वृक्ष लागवड होणे शकय नाही.

तसेच शहरातील रस्ता दुतर्फा, सार्वजनिक ठिकाणे व इतर मोकळया जागांचे प्रभाग समिती निहाय वृक्षप्राधिकरण विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षण करणेत आले असुन २८५० इतकी वृक्षलागवड करणेस जागा उपलब्ध झालेली आहे. सदर जागेचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.क्र.	प्रभाग समितीचे नाव	जागेचे नाव	जागेचा तपशिल	क्षेत्र	अपेक्षित वृक्षलागवड संख्या
१	(अे) बोळींज	उद्यान	मनु तलाव उद्यान, विरार प.	३००० चौ.मी	१५
२		रस्ता दुतर्फा	अगरवाल मेड हाऊस समोरील रोड, विरार प.	५० चौ.मी.	२५
३	(डी) आचोळे	मैदान	माता बाळ संगोपण केंद्र, सर्वोदय नगर	२०० मीटर	२५
४		मैदान	वसंत नगरी मैदान	५००० चौ.मीटर	३५
५		रस्ता दुतर्फा	वसंत नगरी गेट	१५० मीटर	२०

६		रस्ता दुतर्फा	ड्रिमलँड हॉटेल ते विनायक हॉस्पिटल	९०० मीटर	२००
७		रस्ता दुतर्फा	जूने डंपिंग रोड, नवघर पूर्व	२०० मीटर	८०
८		रस्ता दुतर्फा	मराठा दरबार हॉटेल ते पाण्याची टाकी, आचोळे तलाव मागे.	५०० मीटर	१५०
९		रस्ता दुतर्फा	वसई विकासिनी दृककला, विद्याविकासीन शाळे समोरील रोड नवघर पूर्व.	७०० मीटर	३२५
१०		स्मशान भूमी	तुळींज स्मशान भूमी	६०० चौ. मीटर	१०
११	(ई) नालासोपारा (प.)	रस्ता दुतर्फा	छेडा नगर रोड	४०० मीटर	२५
१२		मैदान	शुर्पारक मैदान	७००० चौ मीटर	४०
१३		रस्ता दुतर्फा	न्यु कोविड हॉस्पीटल रोड	२५० मीटर	५०
१४		रस्ता दुतर्फा	चार रस्ता स्काय हाईट्स बिल्डींग रोड	१०० मीटर	२५
१५		रस्ता दुतर्फा	चार रस्ता श्रीप्रस्था	१५० मीटर	५०
१६		रस्ता दुतर्फा	अलकापूरी रोड	१०० मीटर	२०
१७		रस्ता दुतर्फा	हनूमान नगर रोड	१०० मीटर	३०
१८			यशवंत नगर ते यशवंत गौरव	५१५ मीटर	१५०
१९	(एफ) धानिव/पेल्हार	उद्यान	सर्वे नं. २८२ वसई फाटा	१०००चौ.मी.	४५
२०		उद्यान	धानिव तलाव उद्यान	१००००चौ.मी.	३५
२१		रस्ता दुतर्फा	पेल्हार डॅम रोड, पेल्हार	५०मी.	३५
२२	(जी) वालीव	स्मशानभूमी	कामण स्मशानभूमी	३०००चौ.मी.	७०
२३		रस्ता दुतर्फा	कामण वेलकडीवाडी रोड	१५०.मी.	५०
२४		मैदान	चिंचोटी, जि.प. शाळा	६०.मी.	२०
२५		रस्ता दुतर्फा	बापाणे ते नायगाव स्टेश रोड	2 कि.मी.	१५०
२६		रस्ता दुतर्फा	परेरा नगर रोड	600 मिटर	१५०
२७		मैदान	सातिवली बस डेपो		२५
२८	(एच) नवघर-माणिकपूर	रस्ता दुतर्फा	तुळजाभवानी उद्यान ते चुळणे तलाव	८०० मीटर	४००
२९		रस्ता दुतर्फा	मिठागर रोड, ओमनगर नवघर	२५०.मी.	५०
३०		रस्ता दुतर्फा	कृष्णा टाऊनशिप	५०.मी.	१०

			रोड		
३१		रस्ता दुतर्फा	ओमनगर ते १०० फुट रोड	२०० मी	७०
३२		रस्ता दुतर्फा	चुळणे सांडोर रोड	७०० मीटर	२००
३३	(आय) वसई गांव	रस्ता दुतर्फा	पापडी ते नायगांव स्टेशन रोड	१६०० मीटर	२५०
३४		मैदान	अमोल नगर मैदान	१०० मीटर	२०
३५		मैदान	विजय पार्क मैदान	१५० मीटर	२५
			एकूण		**२८८०**

वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेस उपलब्ध जागेवर शहरात सन २०२१-२२ या वर्षात अंदाजित ३००० वृक्षलागवड करणे अपेक्षित आहे.

सदरकामी खड्डा खोदुन वृक्ष लागवड करणे आणि ३ वर्षे संगोपन व देखभाल करणे कामाचे दर मागविणे आवश्यक आहे. सदर कामी निविदा प्रक्रिया करुन कामाच्या व्याप्तीनूसार खालील नमुद बाबींचे बी-२ निविदा प्रक्रियेद्वारे दर मागविता येतील. प्राप्त होणाऱ्या दरांनुसार अंदाजपत्रकास सक्षम मंजुरी घेऊन कार्यादेश देणेत येईल.

तक्ता क्र.१

अ.क्र	तपशिल	युनिट	संख्या	अंदाजित दर	एकुण अंदाजित रक्कम
१	**Road site tree plantation / Mix plantation :-:**Digging pit with size ०.९ m x ०.९ m x ०.९ m, removing and conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling the pit with approved excavated material upto a height of ०.३० m and remaining height of ०.६० m with fresh garden soil and manure in ३:१ proportion. Mixing soil and manure thoroughly well, leveling, as directed, watering previous night, planting minimum १ Mtr/१.५ Mtr/२ Mtr height, healthy trees sapling as per specifications. Maintaining till ३ years by	**NOS नग**	**२०००**	**२१३७.०१**	**४२,७४,०२०**

	watering, weeding, stirring of soil, replacing of casualities etc. complete. टिप:- सदर कामामध्ये रोपांचा खर्च वगळता कामाच्या तपशिलानुसार अंतर्भुत केलेल्या सर्व बाबींसह दर मागवायचा आहे.				
२	**Small ornamental / flowering trees plantation :** Digging pit with size ०.६ m x ०.६ m x ०.६ m, removing and conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling the pit with approved excavated material upto a height of ०.३० m and remaining height of ०.३० m with fresh garden soil and manure in ३:१ proportion. Mixing soil and manure thoroughly well, leveling, as directed, watering previous night, planting १ /१.५ Mtr height, healthy trees sapling as per specifications. Maintaining till ३ years by watering, Application of FYM twice in a year, weeding, stirring of soil, replacing of casualities etc. Complete. टिप:- सदर कामामध्ये रोपांचा खर्च वगळता कामाच्या तपशिलानुसार अंतर्भुत केलेल्या सर्व बाबींसह दर मागवायचा आहे.	**NOS नग**	१०००	१५८८.९५	१५,८८,९५०
				एकुण	**५८,६२,९७०**

सदर वरील नमुद केल्याप्रमाणे कामाच्या व्यप्तीनुसार अंदाजित ३००० वृक्ष लागवडीकामी खड्डा खोदुन वृक्ष लागवड करणे आणि ३ वर्षे संगोपन व देखभाल करणेकरिता पार्क अँड गार्डन डी. एस. आर २०१५-१६ नुसार तयार करण्यात आलेल्या दरपृथ्थकरणानुसार अंदाजित रक्कम रु. ५८,६२,९७० /- (रक्कम रु. अठठावन्न लक्ष बासष्ट हजार नऊशे सत्तर मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त कामी प्रथम वर्षी होणारा खर्च सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखासांकेतांक क्र. ५६७ -४१३०-२ **"नागरी वनीकरण भांडवली कामे"** मधील

तरतुद रक्कम रू. १० कोटी या लेखाशिर्षकाखाली भागविण्यात येईल. पुढील २ वर्षांकरिता होणाऱ्या खर्चाची तरतुद त्या-त्या वित्तिय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये करण्यात येईल. तरी सदर कामी वरील नमुद बाबींचे बी-२ निविदा प्रक्रियेद्वारे दर मागविणेकामी तसेच सदरकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मांन्यता मिळणेंस सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांसकडे मंजुरीस्तव व पुढील आदेशास्तव सादर.

ठराव निर्णय :

सन २०२१-२२ या वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वृक्षलागवडीकरिता खड्डा खोदुन वृक्ष लागवड करणे आणि तीन वर्षे संगोपन व देखभाल करणे कामाचे बी-२ निविदा प्रक्रियेद्वारे दर मागविणेस तसेच सदरकामी होणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ५८,६२,९७० /- (रक्कम रु. अठठावन्न लक्ष बासष्ट हजार नऊशे सत्तर मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

P/667

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 716 **विभाग : बांधकाम विभाग**

दिनांक : 27/10/2021

मुख्य प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) प्रभाग क्र. 94 मधील भुईगाव फादरवाडी येथील फिलीप डाबरे यांचे घर ते राजेश डाबरे यांचे घरापर्यंत आर.सी.सी पाईप गटार बांधणे कामी प्राप्त् निविदांपैकी लघुत्म दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर

अंदाजपत्रकीय रक्कम : - रू.11,07,762/- (पाईप वगळून)

प्रशासकीय मंजूरी :- मा. स्थायी समिती सभा दि.21/01/2020 ठराव क्र. 521

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/बांध/शअ/357/2021 दि. 25/02/2021 कार्यकारी अभियंता, वसई- विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- (जाहिर ई निविदा)
1)दै. आपला महानगर
2)दै. मिड्डे
3)दै. पूर्णविराम

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- (जाहिर फेर ई निविदा)
1)दै. आपला महानगर
2)दै. स्टँडर्ड पोस
3)दै. सिद्धंत समाचार

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक (जाहिर निविदा) :- दि. 03/02/2020

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक (जाहिर फेर ई निविदा) :- दि. 26/02/2021

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख :- दि. 02/03/2021दु.3.00 पासून ते 16/03/2021 दु. 3.00 वाजेपर्यंत

विहित मुदतीत ऑनलाईन प्राप्त निविदा :- 10

ई-टेंडरींगद्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) दि. 22/03/2021 दु. 3.00 वाजता

ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.02 उघडण्याची तारीख :- दि.09/06/2021

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- 1. कार्यकारी अभियंता

विहित मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून उघडण्यास लखोटा क्र.02 मध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

P/669

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
1.	मे. विवेक पवार	(-) 10.01 %		
2.	मे. वज्राई एंटरप्रायजेस	(-) 7.00 %		
3.	मे. श्री.चिरंजीवी एंटरप्रायजेस	(-) 13.00 %		
4.	मे. एस.एस एंटरप्रायजेस	(+) 1.00 %		
5.	मे. रोहन मोहिते	(-) 15.00 %		
6.	मे. राजभर कंन्स्ट्रक्शन	(+) 2.00 %		
7.	मे. महेश सातपुते	अंदाजपत्रकीय दराने		
8.	मे. कल्पतरू एंटरप्रायजेस	(+) 3.33 %		
9.	मे. जतिन नाईक	(-) 15.01 %		
10.	मे. ऐकता कंन्स्ट्रक्शन	(+) 5.00 %		

उपरोक्त् तक्याचे अवलोकन केले असता मे. जतिन नाईक यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.01 % कमी दराचा देकार हा इतर निविदा दरापेक्षा कमी आहे असून सदर निविदेकरीता निविदा समितीने दि 22/7/21. रोजीच्या बैठकीत मे. जतिन नाईक यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.01 % कमी दरास मंजूरीकरीता शिफारस केलेली आहे.

मे. जतिन नाईक यांनी दिलेला देकार योग्य् व वाजवी असल्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) नुसार मे. जतिन नाईक यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्त्व मा. आयुक्त तथा प्रशासक सो, यांच्या मंजूरीस्त्व सादर.

.....

ठराव – उपरोक्त् कामी मे. जतिन नाईक यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.01% कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांची मंजूरी दिली आहे. सदर कामी महानगरपालिकेतर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करून संविदा करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांची मंजूरी असे .

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७१७ विभाग: भांडार विभाग
दिनांक :२७/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय:- बांधाकाम विभाग अंतर्गत देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये गणेश विसर्जन सोहळा मोठया प्रमाणात साजरा करण्यात येतो. शहरामध्ये घरगुती गणेशमुर्ती व सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन मोठया प्रमाणावर करण्यात येते. वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सन २०२१ चे गणेश विसर्जनाकरीता १० नग HDPE फायबर तराफे मुळ उत्पादक कंपनीकडून विना निविदा थेट खरेदी करण्यात आले आहे.

त्यानूसार महानगरपालिका सन २०२०/२१ च्या सुधारीत अर्थसकंल्पात सन २०२१/२२ च्या सुधारीत अर्थसंकल्पात सन २०२१/२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती या लेखार्शिर्ष अंतर्गत रक्कम रु. ३८,२०,००० तरतुद करण्यात आलेली आहे. त्यापैकी आतापर्यत रक्कम रु. ३८,१९,६८०/- इतका खर्च झालेला असून रक्कम रु. ३२०/- इतकी शिल्लक आहे.

त्याप्रमाणे भांडार विभागामार्फत सन २०२१ गणवेश विसर्जनाकरिता HDPE फायबर तराफे खरेदी करण्यात आले असून सदर तराफे खरेदी कामी रक्कम रु. १६,९३,७१८/- इतका कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानूसार लेखाशिर्षामध्ये रक्कम रु. ३२०/- शिल्लक आहे. सदर निविदाधारकास कार्यादेशानूसार देयक अदा करावयाचे असून रक्कम रु. २,४८,७१८/- इतकी आवश्यकता आहे.

सन २०२०/२१ च्या सुधारित अर्थसंकल्पात सन २०२१/२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सामान्य प्रशासन नविन झेरॉक्स मशिन (खरेदी) दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत २९ लक्ष इतकी तरतुद असून आतापर्यंत रक्कम रु. ३६,७७७/- इतका खर्च झालेला असून रक्कम रु. २८,६३,२२३/- इतकी शिल्लक आहे.

तरी सामान्य प्रशासन नविन झेरॉक्स मशिन (दुरुस्ती) खरेदी या लेखाशिर्षातून ४ लक्ष इतकी रक्कम देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती या लेखाशिर्षकामध्ये पुन:विनियोजन करण्यास मंजुरीस्तव व पुढील आदेशास्तव सादर.

कमी पडणाऱ्या तरतुदीचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे सादर.

अ.क्र.	लेखाशिर्ष	मंजूर तरतुद	आवश्यक तरतुद (वाढीव तरतुद)
१.	देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती	रु. ३८,२०,०००	रु. ४,००,०००/-

ठराव:- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये गणेश विसर्जन सोहळा मोठया प्रमाणात साजरा करण्यात येतो. शहरामध्ये घरगुती व सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन मोठया प्रमाणावर करण्यात येते. वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सन २०२१ चे गणेश विसर्जनाकरीता सार्वजनिक तलावामध्ये गणेश मूर्तीचे विसर्जनाकरीता १० नग HDPE हाय डेन्सीटी पॉली ईथेनॉल मटेरिअल पासून तयार केलेले तराफे मुळ उत्पादक मे. लिटमस मरिन इनोव्हेशन प्रा.लि. या कंपनीकडून विना निविदा थेट खरेदी करण्यात आले आहे. सदर लेखाशिर्षामध्ये तरतुद रक्कम रु. ३२०/- इतकीच शिल्लक असल्याने सामान्य प्रशासन नविन झेरॉक्स मशिन (खरेदी) दुरुस्ती या लेखाशिर्षामधुन रक्कम रु. ४ लक्ष महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ च्या नियम ३०(३) नमुना १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७१८

विभाग: भांडार विभाग

दिनांक :२७/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ रुग्णांकरिता जेवणाचे डीश, नाश्ता, कंटनेर व पॅकींग पिशव्या खरेदी केलेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये सध्या कोवीड-१९ पॉझिटीव्ह रुग्ण वाढत आहेत. या रूग्णांवर उपचार करण्यांस महानगरपालिकेचे चंदनसार येथील श्री. जीवदानी देवी रूग्णालय येथे दाखल करण्यांत येतात. तसेच म्हाडा इमारत क्र. १० बोळींज व वालीव येथील वरूण इंडस्ट्रीज येथे तयार केलेल्या विलगीकरण केंद्रामध्ये उपचार केले जातात.

विलगीकरण केंद्र म्हाडा इमारत क्र. १० बोळींज व वरुण इंडस्ट्रीज वालीव व चंदनसार येथील श्री जीवदानी देवी रुग्णालयात दाखल रूग्णांना सकाळचा नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण मोफत स्वरूपात श्री जीवदानी मंदीर ट्रस्ट व महानगरपालिका यांचे मार्फत दररोज देण्यात येते. ही सुविधा दि. १५/०६/२०२० पासून सुरू आहे. यामध्ये नाश्ता कंटेनर, प्लास्टीक पिशव्या, चमचे व जेवणाचे कंटेनर तसेच वाटप वाहन, वाटप कर्मचारी इत्यादीची व्यवस्था महानगरपालिकेकडून करण्यांत येते व जेवण, नाश्ता हे शहरामधील श्री. जीवदानी देवी संस्थान यांचे मार्फत मोफत पूरविले जात आहे.

सध्या शहरामध्ये कोवीड रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. नाश्ता कंटेनर व जेवणाचे पॅकींगसह असलेले कंटनेटर संपले आले असून मे. श्रीजी सेल्स हयांच्याकडून दि. ०३/०८/२०२१ ते दि. ०२/०९/२०२१ पर्यंत साहित्याचा पुरवठा केलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	पुरवठादाराचे नाव	साहित्याचा तपशील	साहित्य वापर केलेले ठिकाण	साहित्य पुरवलेले दिनांक	खरेदी केलेले नग	मुळ किंमत	जी. एस .टी	एकुण रक्कम
१)	मे. श्रीजी सेल्स्	नाश्ता कंटेनर (फॉईल कंटेनर २५० ग्रॅम)	कोविड-१९ उपचार केंद्र, विलगीकरण केंद्र	०३/०८/२०२१	२०००	१.७०	१८ %	४०१२
२)		ब्ल्यू एच एम बॅग ५१ मायक्रो २७ x ३० इंच		०३/०८/२०२१	२५०	९.५०	१८ %	२८०२.५
३)		नाश्ता प्लास्टिक चमचा		०३/०८/२०२१	४० पॅकेट	३०	१८ %	१४१६
४)		पाच खणी जेवणाचा कंटेनर		२१/०८/२०२१	१६००	१५	१८ %	२८३२०
५)		नाश्ता कंटेनर (फॉईल कंटेनर २५० ग्रॅम)		२९/०८/२०२१	१०००	१.७०	१८ %	२००६

६)		पाच खणी जेवणाचा कंटेनर		०२/०९/ २०२१	१६००	१५	१८ %	२८३२०
							एकुण	**६६,८७७/-**

तरी कोविड उपचार केंद्रावर विलगीकरण, अलगीकरण केंद्र ठिकाणी दैनंदिन अल्पोपहार व भोजन पुरवठा करण्यास लागणारे कंटेनर व उपरोक्त इतर साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. सदर साहित्य कोविड-१९ उपचार केंद्रावर अत्यावश्यक असल्याने वरिल साहित्य तातडीने खरेदी करण्यात आलेले आहे व त्याकामी होणारे देयकाची रक्कम रु ६६,८७७/- ची मागणी मे. श्री.जी. सेल्स हयांनी केलेली आहे.

तरी उपरोक्त जेवणाचे डीश, नाश्ता, कंटेनर व पॅकींग पिशव्या थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ६६,८७७/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस व विना निविदा अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) अन्वये मे. श्री. जी सेल्स, वसई यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ६६,८७७/- अदा करणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त प्रस्तावामधील उपचार केंद्र, विलगीकरण, अलगीकरण केंद्र ठिकाणी दैनंदिन अल्पोहार व भोजन पुरवठा करणेकामी झालेल्या रक्कम रु. ६६,८७७/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरी व विना निविदा अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) अन्वये मे. श्री. जी सेल्स, वसई यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ६६,८७७/- (अक्षरी रुपये सहासष्ट हजार आठशे सत्त्याहत्तर मात्र) चे देयक अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

27/10.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७१९ | विभाग : आस्थापना
दिनांक : २९ / १० /२०२१

प्रस्तावाचा विषय :- निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करारपद्धतीने वैद्यकीय अधिकारी या संवर्गातील डॉ. रमेश प्रजापती व इतर आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांना महानगरपालिकेत नियमित आस्थापनेवर सामावून घेणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई येथील सर डी.एम.पेटीट रुग्णालयात मोठया प्रमाणावर आंतररुग्ण व बाहयरुग्ण सेवेसाठी दाखल होत असल्याने या रुग्णालयात रुग्णांना सेवा देणे कामी तसेच ८ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाने असून या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये शासनाने जाहीर केलेले सर्व राष्ट्रीय कार्यक्रम, नियमित लसीकरण वा बाहयरुग्ण विभाग इत्यादी कामकाजासाठी एम.बी.बी.एस. व बी.ए.एम.एस. आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी यांची आवश्यकता असल्याने याकामी महानगरपलिकेने मंजूर केलेल्या निविदाधारकाकडून मंजुर दरावर सदरचे कामकाज करणेसाठी एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध होत नसल्याने व बी.ए.एम.एस. आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी हे काही काळ काम करुन सोडून जात असल्याने आवश्यकतेप्रमाणे वैद्यकीय अधिकारी मानधनावर उपलब्ध होणेकामी मा. सर्वसाधारण सभा यांनी ठराव क्र.१०, दि.२०.०४.२०१३ अन्वये आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावर महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या कलम ५३ (३) मधील तरतुदीनुसार थेट मुलाखतीव्दारे (Walk In Interview) भरण्यास मा. महासभेची मंजूरी दिलेनुसार आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या संवर्गामधील पदे ठोक मानधनावर भरण्यासाठी दि.२०.०५.२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात क्र. वविशम/वैआवि/२२७ दि. २०.०५.२०१३ अन्वये थेट मुलाखतीनूसार अर्ज मागविण्यात आले होते.

सदर जाहिरातीव्दारे प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या अर्जांची छाननी करुन सदर उमेदवारांच्या मुलाखती दि.०५.०६.२०१३ व दि. १०.०२.२०१४ व वेळोवेळी घेणेत आलेनुसार मुलाखत समितीने डॉ. रमेश प्रजापती व इतर आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची निवड केली.

माहे ऑगस्ट,२०१३ चा दर ६ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आलेवर आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांना वेळोवेळी १ दिवसाचा खंड देऊन त्यांना मा. महासभेची वेळोवेळी मंजूरी घेऊन वेळोवेळी वर्तमान पत्रात प्रसिद्धी देऊन वेळोवेळी थेट मुलाखती घेऊन यानुसार निवड करुन वेळोवेळी नियुक्ती आदेश दिलेले आहेत.

डॉ. रमेश प्रजापती व इतर आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची निवड समितीव्दारे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करारपद्धतीने ठोक मानधनावर ६ महिन्यासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.

तरी उक्त आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांनी कोव्हिड-१९ च्या काळात जीवाची पर्वा न करता रुग्णसेवा दिली असून त्यांच्या महानगरपालिकेतील सेवा व अनुभवाचा फायदा महानगरपालिकेस होणार आहे. सदर आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांच्या नेमणूका कंत्राटी पद्धतीने ६ महिन्याच्या कालावधीसाठी वृत्त पत्रात जाहीरात देवून निवड समिती मार्फत मुलाखती घेवून झाल्याने त्यांच्या नियुक्तीबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वरील वैद्यकीय आरोग्य विभागाकडील प्रस्तावाचे अवलोकन केले असता वसई विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागात कामाच्या दृष्टीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) नुसार सहा महिन्याचे कंत्राटी पद्धतीने आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका सन २०१३ पासुन घेण्यात येत आहेत.

सदर नेमणूका हया वृत्तपत्रात जाहीरात देवून व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४ मध्ये विहीत केल्यानुसार निवड समिती गठीत करुन निवड समिती मार्फत आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत.

वसई विरार शहर महानगपालिकेचा सुधारित आकृतीबंध दि.०९ सप्टेंबर,२०१४ रोजी मंजूर आहे. त्यात आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी या संवर्गाची २७ पदे मंजूर आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील पिटीशन क्र.१३२३/२०२० च्या अनुषंगाने दि. ०६ जुलै, २०२१ च्या शासन निर्णयानुसार २७ आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी यांचे आरक्षण खालीलप्रमाणे होत आहे.

एकूण मंजूर पदे-२७ भरलेली पदे-० रिक्त पदे -२७

पदाचे नाव	मंजूर पद संख्या	अ.जा	अ.ज	वि.जा.अ	भ.ज.ब	भ.ज.क	भ.ज.ड	विमाप्र	इमाव	इडब्ल्युएस	खुला
आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी	२७	४	२	१	१	१	-	-	५	३	१०

हया २७ आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची निवड समितीव्दारे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने सहा महिन्यासाठी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

सदर नेमणूकांना एक दिवसांचा तांत्रिक खंड देऊन वेळोवेळी मुदतवाढी अथवा फेर मुलाखती घेवून निवड केल्याचे दिसून येते.

१. डॉ. रमेश छबिनाथ प्रजापती, डॉ.आशुतोष विठ्ठलराव येजरे, डॉ.आप्पासाहेब गोपीनाथ सालपूरे, डॉ. मिनाक्षी रामचंद्र पवार, डॉ. सुधीर यशवंतराव पांढरे,डॉ. पृथ्वीनाथ रामलोचन भगत, डॉ.पुजा विशाल गुप्ता, डॉ. गायत्री धर्मेंद्र गोरख, डॉ. सोनल गोपीनाथ संखे यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ८ वर्षे,२ महिने इतका व डॉ. राजेश गणेशसिंग चौहान यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे,११ महिने इतका असून त्या खुल्या या प्रवर्गातील आहेत.

२. डॉ. वैभव विठ्ठल गायकवाड, डॉ.अश्विनी उमेश नाईकनवरे, डॉ.श्रीनिवास महादेव दूधमल यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ८ वर्षे,२ महिने व डॉ. स्मिता अरुण वाघमारे आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे,१ महिने इतका असून त्या अनूसुचित जाती या प्रवर्गातील आहेत.

३. डॉ. शरद फत्तेसिंग गावित यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे,११ महिने व डॉ.सारिका गोपजी ठाकरे यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे, १ महिने इतका असून त्या अनुसूचित जमाती या प्रवर्गातील आहेत.

४. डॉ. क्रिष्णा युवराज गोसावी यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे,११ महिने इतका असून त्या भटक्या जमाती ब या प्रवर्गातील आहेत.

५. डॉ. बालाजी शेषराव पाटील यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ८ वर्षे,२ महिने इतका असून त्या भ.ज.क. या प्रवर्गातील आहेत.

६. डॉ. वसंत माधवराव पाटील यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ८ वर्षे, २ महिने इतका असून त्या भ.ज.क. या प्रवर्गातील आहेत. (वि.जा.(अ.) या बिंदुवर आळीपाळीने)

७. डॉ.जगदीश रघुनाथ महाजन, डॉ. कृपाली वसंत फर्डे, डॉ. उमेश सारंगधर घाटे, डॉ. मोतीलाल बाबुराम कुशवाह व डॉ. अनिरुद्ध गंगाधरराव भेले यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ८ वर्षे, २ महिने इतका असून त्या इतर मागास वर्गीय या प्रवर्गातील आहेत.

८. डॉ.स्वाती शेखर चिंचोळकर यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ८ वर्षे,२ महिने,डॉ. रुचिता किशोर पाटील यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे,११ महिने व डॉ. प्राजंली सुरेश पिंपळे यांचा आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे,७ महिने इतका असून त्या इ.डब्ल्यु.एस. या प्रवर्गातील आहेत.

तरी उक्त २७ आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची निवड सहा महिन्यासाठी सन २०१३ पासुन करार पद्धतीने केलेली आहे. महानगरपालिकेच्या दिनांक ०९ सप्टेंबर,२०१४ चा आकृती बंध मंजुर असून त्यात आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकाऱ्यांची २७ पदे मंजूर आहेत.

नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. नमुंम-१२२१/प्र.क्र.०७/नवि-२८ दि.२७ जुलै,२०२१ अन्वये नवि मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर करार पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावयाचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्याच धर्तीत उक्त वसई विरार शहर महानगरपालिकेतील २७ आयुर्वेदीक वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना महानगरपालिकेत सामावून घेणेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

ग्रंथालय विभाग

प्रशासकीय ठराव क्र. ७२० दि.२९/१०/२०२१.

विषय :- डॉ.के.ब.हेडगेवार सार्वजनिक वाचनालयाचा नियमितपणे लाभ घेत नसलेल्या सभासदांची अनामत रक्कम जप्त करुन सभासदत्व रद्द करणे किंवा अनामत रक्कम मनपा फंडात तशीच जमा ठेवून त्यांचे सभासदत्व रद्द करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहरमहानगरपालिकेचे एकूण ४ ग्रंथालय (वाचनालय) असून त्यापैकी प्रभाग समिती " एच " (नवघर) येथे डॉ.के.ब.हेडगेवार सार्वजनिक वाचनालय आहे. सदर ग्रंथालय (वाचनालयाची) स्थापना सन १९८९ मध्ये झालेली आहे.

सन १९८९ पासून ते आजमितीस **एकूण सभासद**	**३३८७**	
त्यापैकी सन २००७ पासून आजपर्यंत **आजीवन सभासद**	**३५९**	(प्रपत्र – १)
सभासदत्व कायम स्वरुपी **रद्द केलेले सभासद**	**२९८**	(प्रपत्र – २)
वाचनालयाचा **लाभ घेणारे सभासद**	**२७४**	(प्रपत्र – ३)
वाचनालयाचा **लाभ न घेणारे एकूण सभासद**	**२४५६**	**त्यापैकी**
वाचनालयाचा **लाभ न घेणारे सभासद** (पुस्तक जमा न केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.)	**२६३**	(प्रपत्र -५)
वाचनालयाचा **लाभ न घेणारे सभासद** (पुस्तक जमा केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.)	**२१९३**	(प्रपत्र -४)

त्यापैकी -

१०३३ सभासदांची प्रत्येकी रु. ३०/- याप्रमाणे अनामत रक्कम रु. ३०,९९०/-

३०७ सभासदांची प्रत्येकी रु. १००/- याप्रमाणे अनामत रक्कम रु. ३०,७००/-

८३६ सभासदांची प्रत्येकी रु. ३००/- याप्रमाणे अनामत रक्कम रु. २,५०,८००/-

२१७६ एकूण रु. ३,१२,४९०/-

१७ सभासद मनपाचे कर्मचारी असल्याने त्यांच्याकडून अनामत रक्कम घेण्यात आलेली नाही.

२१९३

वाचनालयाचा **लाभ न घेणा-या** (**पुस्तक जमा केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.**) २१७६ सभासदांपैकी केवळ **४** सभासदांची रु. ३००/- अनामत रक्कमेपैकी (सभासद क्र. ५५८, १०३५, १२०६) हया **३** सभासदांची प्रत्येकी **रु. २७०/-** अनामत रक्कम परत करण्यात आलेली असून त्यांची रु. ३०/- याप्रमाणे एकूण अनामत रक्कम **रु. ९०/- अनामत जमा** आहे. (**प्रपत्र - ४**)
तसेच उर्वरीत **१** सभासदाची रु. ३००/- अनामत रक्कमेपैकी (सभासद क्र. १८८७) **रु. २००/-** अनामत परत करण्यात आली असून **रु. १००/- अनामत जमा** आहे. (**प्रपत्र -४**)

कृपया सन १९८९ ते सन २०१७ या कालावधीतील वाचनालयाचा लाभ न घेणारे सभासदांची (पुस्तक जमा न केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही) संख्या (**प्रपत्र-५**) **२६३** असून

(रु. ३०/- सभासद ८१, रु. १००/- सभासद ३३ व रु. ३००/- सभासद १४९) त्यांची अनामत रक्कम **रु.५०,४३०/-** जमा असून त्यांनी नेलेल्या व परत न केलेल्या पुस्तकांची किंमत **रु. ३०,५०८.८०/-** होत असल्याने उर्वरीत अनामत रक्कम **रु. २१,५९१/-** आजतागायत मनपा फंडात जमा आहे. सदर यादीतील १६ सभासदांनी जी पुस्तके नेलेली आहेत त्यांच्या किंमतीची नोंद दाखल नोंदवहीमध्ये आढळून येत नाही.

वाचनालयाचा लाभ न घेणा-या सभासदांची (पुस्तक जमा केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.) संख्या **(प्रपत्र-४) २१९३** असून (रु. ३०/- सभासद १०३३, रु. १००/- सभासद ३०७ व रु. ३००/- सभासद ८३६ तसेच १७ सभासद मनपाचे कर्मचारी असल्याने त्यांच्याकडून अनामत रक्कम घेण्यात आलेली नाही.) त्यांची अनामत रक्कम **रु. ३,१२,४९०/-** आजतागायत मनपा फंडात जमा आहे.

सबब **उक्त नमूद प्रपत्र -४ मधील नमूद सभासदांची अनामत रक्कम रु. ३,१२,४९०/-** तसेच **प्रपत्र ५** मधील सभासदांची उर्वरीत अनामत रक्कम **रु.२१,५९१/- जप्त करुन त्यांचे सभासदत्व कायमचे रद्द करावे**

किंवा

प्रपत्र-४ मधील नमूद सभासदांची अनामत रक्कम **रु. ३,१२,४९०/-** तसेच **प्रपत्र—५** मधील सभासदांची उर्वरीत अनामत रक्कम **रु.५०,४३०/- मनपा फंडात तशीच जमा ठेवून त्यांचे फक्त सभासदत्व कायमचे रद्द करावे** याबाबतच्या निर्णयार्थ सविनय सादर.

प्रस्तावाचा निर्णय — उपरोक्त विषयावर मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेशी सविस्तर चर्चा करण्यात आली सदर वाचनालयाच्या आजमितीस असलेले एकूण सभासद ३३८७ इतके असून त्यापैकी पुस्तके परत केलेली परंतू अनामत रक्कम परत न घेतलेले वाचनालयाचा नियमित लाभ न घेणारे सभासद २१७६ सभासदांची अनामत रक्कम रु.३,१२,४९०/- तसेच पुस्तके परत न केलेली आणि अनामत रक्कम परत न घतलेले वाचनालयाचा नियमित लाभ न घेणारे सभासद २६३ सभासदांची अनामत रक्कम रु. ५०,४३०/- इतकी आहे. परत न केलेल्या पुस्तकांची किंमत रु. ३०,५०८.८० इतकी होत असून ती अनामत रक्कमेपेक्षा रु. २१,५९१/- इतक्या रुपयांनी कमी आहे. उपरोक्त २१७६ सभासदांची अनामत रक्कम रु. ३,१२,४९०/- व २६३ सभासदांची अनामत रक्कम रु. ५०,४३०/- अशी एकूण अनामत रक्कम रु.३,६२,९२०/- महानगरपालिका फंडात जमा करुन सदर सभासदांजवळ असलेली पुस्तके व त्यांचे सभासदत्व कायमस्वरुपी रद्द करण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच भविष्यात सार्वजनिक वाचनालयात येणा-या कोणत्याही वाचकाने ३ वर्षापेक्षा अधिक कालावधित ग्रंथालयाचा लाभ न घेतल्यास सदर वाचकाचे सभासदत्व रद्द करण्यात यावे. तसेच त्याने भरलेली अनामत रक्कम जप्त करून मनपा फंडात जमा करण्यात यावी.

29/10

गंगाथरन डी.
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर, पिन नं ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल -vasaivirarcorporation @yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७८१

विभाग : आस्थापना (मु.)

दिनांक : २९/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदावर कार्यरत असलेले श्री. हर्षल पाटील यांना पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ अन्वये दि. १६/०१/२०१६ रोजी कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदासाठी मुलाखती घेऊन दि. ११/०२/२०१६ पासून सहा महिन्यांचे कालावधीसाठी श्री. हर्षल पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

मा. महासभा, ठराव क्र. ४, दि. १९/०८/२०१६ अन्वये त्यांची सेवा खंडीत करून दि. २०/०८/२०१६ रोजी पुन्हा नियुक्ती करण्यात आली. तद्नंतर पुन्हा मा. महासभा, ठराव क्र. १५, दि. ६/०३/२०१७ अन्वये त्यांची सेवा खंडीत करून त्यांची दि. १७/०२/२०१७ पासून पुनर्नियुक्ती करण्यात आली. तसेच मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. १९१,दि. ३१/०७/२०१८ अन्वये श्री. पाटील यांना पुन:श्च मुदतवोढ देण्यात आली होती. तसेच संदर्भ ४ नुसार मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. २९९, दि. २३/१०/२०१८ रोजी पुन्हा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. व संदर्भ ५ नुसार मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

श्री. हर्षल पाटील यांची दि. २५/१०/२०१९ रोजी मुदतवाढ संपलेली होती. दि. २६/१०/२०१९ ते दि. २५/०४/२०२० पर्यंत त्यांनी काम केले असल्याने संदर्भ क्र. ७ नुसार त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनास कार्योत्तर मान्यता देवून व दि. २७/०४/२०२० पासुन ते दि. २६/१०/२०२० पर्यंत सहा महिन्या करिता मुदतवाढ देण्यात आलेली होती.

दि. २५/१०/२०२० पासून श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदतवाढ संपलेली होती . संदर्भ क्र. ९ नुसार श्री. पाटील यांनी पुन:श्च मुदतवाढ देणेकामी मागणी केल्यानुसार व संगणक विभागातील कामाची निकड पाहता सदर पदास सहा महिन्यांचा कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ठोक वेतनावर अस्थायी स्वरूपात दि. २७/१०/२०२० रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन प्रशासकीय ठराव क्र. ३३३, दि. ६/०१/२०२१ नुसार दि. २८/१०/२०२० पासुन ते दि. २७/०४/२०२१ पर्यंत पुन:श्च मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची दि. २७/०४/२०२१ रोजी सहा महिन्याची मुदतवाढ संपणार असल्याने श्री. पाटील यांनी संदर्भ क्र. १२ च्या विनंतीनुसार पुढील सहा महिन्याची मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञ (I. T.) विभागात कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) संगणक विभागातील कामाची निकड पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३ (३) अन्वये या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत - यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणूकांच्या बाबतीत असा अधिकारी कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या, त्या अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल.

आयुक्तास मा. स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार आहे. तथापि सद्या प्रशासकीय कालावधी असल्याने मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

दि. २७/०४/२०२१ पासून श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदतवाढ संपलेली आहे. दि. ३०/०३/२०२१ च्या अर्जान्वये श्री. पाटील यांनी पुन:श्च मुदतवाढ देणेकामी मागणी केल्यानुसार व संगणक विभागातील कामाकची निकड पाहता सदर पदास सहा महिन्यांचा कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ठोक वेतनावर अस्थायी स्वरूपात दि.२८/०४/२०२१ रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन दि. २९/०४/२०२१ पासून दि. २८/१०/२०२१ पर्यंत पुन:श्च सहा महिन्याचे कालावधीसाठी ठराव क्र. ६५, दि. २२/०४/२०२१ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांचा दि. २८/१०/२०२१ रोजी मुदतवाढ संपली असून त्यांनी मागणी केल्यानुसार तसेच संगणक विभागातील कामाची निकड पाहता सदर पदास सहा महिन्यांचा कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ठोक वेतनावर अस्थायी स्वरूपात दि. २९/१०/२०२१ रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन व शनिवार तसेच दि. ३१/१०/२०२१ रोजी सार्वजनिक सुट्टी चा दिवस असुन त्याना दि. १/११/२०२१ पासुन पुढील सहा महिन्यांचा कालावधीसाठी ठोक वेतनावर पुन:श्च मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर विचार विनीमय करून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>ठराव/ निर्णय</u> :- संगणक विभागातील ठोक वेतनावरील श्री. हर्षल रघूनाथ पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदत दि. २८/१०/२०२१ रोजी संपली आहे. श्री. हर्षल पाटील यांचा कामाचा अनुभव बघता व संगणक विभागातील कामाची निकड लक्षात घेता एक दिवसाचा (दि. २९/१०/२०२१) तांत्रिक खंड देऊन शनिवार, रविवार हे सार्वजनिक सुट्टीचे असून त्यांना दि. १/११/२०२१ पासून दि. ३०/०४/२०२२ पर्यंत सहा महिन्याच्या कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ५३ (३) अन्वये नेमणूक करण्यास तसेच ठोक वेतनावरील खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सदरचा खर्च महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स) या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७२२

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग
दिनांक : २९/१०/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ए' कार्यक्षेत्रातील विरार (प.) प्रभाग क्र.२९ मध्ये स्वर्ग अपार्ट समोरील नाल्यावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२) प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.२९ मध्ये विरार (प.) विराटनगर नाला अस्तित्वात आहे. त्याभांगात स्वर्ग अपार्ट समोरील नाल्यावर स्लॅब अस्तित्वात नाही. सदर ठिकाणी स्लॅब टाकल्यास नागरिकांना यशवंत नगर च्या बाजूला जाण्यास फायदा होणार आहे. याकामाची मागणी स्थानिक नगरसेवक श्री.हार्दिक राऊत व स्थानिक नागरिकांनी केलेली आहे. सदर कामी रु.३९,९३,१४७/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

तरी सदर ठिकाणी कॉलमकरिता फुटिंग, कॉलम, बीम व स्लॅबचे कामे करणे आवश्यक आहे. याकरिता बांधकाम संबधीत कामाचे सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दर सुची नुसार अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे.

सदर कामी जिल्हा दरसुची सन २०१९-२० नुसार पुढीलप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

अंतर्भूत बाब	अंदाजित खर्च
फुटिंग, कॉलम, बीम व स्लॅबचे कामे करणे	रु.३९,९३,१४७/-

३) ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ए' कार्यक्षेत्रातील विरार (प.) प्रभाग क्र.२९ मध्ये स्वर्ग अपार्ट समोरील नाल्यावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे कामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्यानुसार होणाऱ्या रक्कम रु.३९,९३,१४७/- अंदाजित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५

दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७२३ विभाग : बांधकाम

दिनांक : २९/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय : प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील वर्तक विहार अपा. ते यशवंत प्राईड पर्यंत आर. सी. सी. पाईप गटार बांधणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. २,०४,२११/-
प्रशासकीय मान्यता	:-	प्रभाग समिती ठ.क्र. ६० दि. २६/०७/२०१८
तांत्रिक मंजुरी	:-	मा. कार्यकारी अभियंता पा.क्र. ५० अ.क्र. २५४ दि. ०५/११/२०१८
निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	:-	वविशम/५१०/२०१९ दि. ०८/०१/२०१९
निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा)	:-	दि. ०६/०३/२०१९
एकुण निविदा	:-	०४

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१.	मे. साई गणेश इंटरप्रायजेस	५.००% जास्त दराने	-
२.	मे. सहारा इंटरप्रायजेस	०.००% जास्त दराने	
३.	मे. गुंजाळकर असोशिएट	१०.५०% कमी दराने	-
४.	मे. आर कॉन इंजिनिअर्स	३.००% जास्त दराने	-

उपरोक्त निविदेची तुलना केली असता **मे. गुंजाळकर असोशिएट** यांची अंदाजपत्रकीय दराची/अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५०% कमी दराची निविदा प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराची आहे. परंतु **मे. गुंजाळकर असोशिएट** यांनी शा.नि.क्र. इमा-२ सीपटी/२०१७/प्र.क्र. ०८ दि. २६/११/२०१८ नुसार परफॉर्मन्स डी.डी. ८ (आठ) दिवसाच्या आत सादर केलेला नाही. तथापि सदर कामाची निकड लक्षात घेऊन द्वितीय निविदाधारकास दि. २९/०६/२०१९ च्या पत्रान्वये प्रथम निविदा धारकाच्या दराने काम करणेस कळविले होते. या अनुषंगाने **मे. सहारा इंटरप्रायजेस** यांनी १०.५०% कमी दराने काम करणेस दि. ०१/०७/२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांची १०.५०% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर निविदांची तुलना केली असता **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील १०.५०% कमी दराने हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचीत निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता **मे. सहारा एंटरप्रायजेस** हयांची १०.५०% कमी दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२१ दि. २८/०६/२०२१ रोजीने मा. उपायुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

(तानाजी नरळे)
उपायुक्त परिमंडळ-३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७२४ विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २९/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील लेखा विभागाकरीता ६० मिनिट बॅकअप असलेले ऑनलाईन यु.पी.एस (UPS) खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्य लेखा विभागाचे दैनंदिन कामकाज संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर) मध्ये होत आहे. तसेच द्विनोंद लेखा पध्दतीच्या कामकाजासह एकूण ३४ संगणकावर काम होत असून सतत खंडीत होणारा विद्युत पुरवठा या शिवाय विद्युत जनित्र वेळेवर सुरु न होणे किंवा इतर तांत्रिक अडचणीमुळे त्यास विलंब होतो या कारणास्तव संगणकासोबत असलेले यु.पी.एस (UPS) चा बॅकअप मिळत नाही.

याकरीता लेखा विभागाद्वारे किमान ६०मिनिट बॅकअप असलेला एकत्रित यु.पी.एस (Online UPS) ची मागणी जा.क्र.वविशम/लेखा/०३/२१-२२ दि.१६/०४/२०२१ रोजीच्या पत्राद्वारे केली आहे. लेखा विभागाकरीता ६० मिनिट बॅकअप असलेला UPS खरेदी करणे आवश्यक असून सदरकामीचा तपशिल खालील प्रमाणे.

अनु.क्र	साहित्य	प्रती नग रक्कम रु.	नग	एकूण रक्कम रु
१	१५KVA Online UPS	१५९३००/-	१	१५९३००/-
२	१२V-४२AH SMF Battery	४३४६/-	३०	१३०३८०/-
३	Rack Link Cables	७८००/-	१	७८००/-
		एकूण		२९७४८०/-

वरील प्रमाणे यु.पी.एस (Online UPS) खरेदी करणकामी अंदाजित रक्कम रु. २,९७४८०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र. ०४१-४१७२-१ 'संगणकीय साहित्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत भागविता येईल.

तरी लेखा विभागास ६० मिनिट बॅकअप असलेला एकत्रित यु.पी.एस (Online UPS) दरपत्रके मागवून खरेदी करणेस व होणा-या खर्चास मंजुरीस्तव सादर.

ठराव/ निर्णय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील लेखा विभागाकरीता ६० मिनिट बॅकअप असलेले ऑनलाईन यु.पी.एस (UPS) खरेदी करणेकामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७२५

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:-२९/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत गणेश विसर्जनाकरीता भाडेतत्त्वावर सी.सी.टिव्ही यंत्रणा बसविणेकामी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील लघुत्तम दर मंजुर करुन L१ दरपत्रकधारका सोबत करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत गणेश विसर्जनाकरीता भाडेतत्त्वावर सी.सी.टिव्ही यंत्रणा बसविणेकामी मा. उपायुक्त, माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्या मंजुरीनुसार जाहीर दरपत्रक सुचना दि. ०७/०९/२०२१ पासून ते दि. ०९/०९/२०२१ रोजी ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (सी), चंदनसार, दुसरा मजला, माहिती तंत्राज्ञान विभागात मागवले असता, सदर कामाबाबत ३ दरपत्रके प्राप्त झाली असून त्यांच्या दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	साहित्य	नग	मे. गोयल एटरप्रायझेस		मे. पुजा एटरप्रायझेस		मे.स्वरा बायो मॅट्रीक्स	
			प्रति नग रक्कम (सर्व करांसहित)	एकुण रक्कम (सर्व करांसहित)	प्रति नग रक्कम (सर्व करांसहित)	एकुण रक्कम (सर्व करांसहित)	प्रति नग रक्कम (सर्व करांसहित)	एकुण रक्कम (सर्व करांसहित)
१	४ चॅनेल डिव्हीआर हार्डडिस्क सह	२५	३४००/-	८५०००/-	३७००/-	९२५००/-	३५००/-	३५०००/-
२	नाईट व्हिजन बुलेट आय आर कॅमेरा	२५*४ =१००	३७०/-	३७०००/-	३२०/-	३२०००/-	१२/-	८७५००/-
३	सी.सी.टिव्ही कॅमेरा केबल	२५* २०० mtr= ५००० mtr	१५/-	७५०००/-	१५/-	७५०००/-	३००/-	६००००/-
४	वीएनसी कनेक्टर	२००	१८/-	३६००/-	२२/-	४४००/-	३०००/-	३००००/-
५	पॉवर सप्लाय कनेक्टर	१००	३२०/-	३२०००/-	३१०/-	३१०००/-	२०/-	७५०००/-
६	स्क्रीन, केबल मेन पॉवर देखभाल, मनुष्यबळासह कार्यान्वित करणे	२५	३२००/-	८००००/-	३१००/-	७७५००/-	३५००/-	४०००/-
	एकुण			३१२६००/--		३१२४००/-		२९१५००/-

वरील प्राप्त दरपत्रकांची तुलनात्मक तक्त्याप्रमाणे दरांशी तुलना केली असता **में.स्वरा बायो मॅट्रीक्स** यांच्या दरपत्रकातील दर सर्वात कमी व वाजवी असून सदरचे दर मंजूर करुन मंजूर दरानुसार वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत गणेश विसर्जनाकरीता भाडेतत्त्वावर सी.सी.टिव्ही यंत्रणा खरेदी करुन बसविणेकामी, त्यांचे सोबत करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरीस्तव सादर.

ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत गणेश विसर्जनाकरीता भाडेतत्त्वावर सी.सी.टिव्ही यंत्रणा खरेदी करुन बसविणेकामी लघुत्तम निविदाकार **में.स्वरा बायो मॅट्रीक्स** यांचे दर मंजूर करुन, संविदा करणेस व कार्यादेश देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व

ठराव क्र. 726 दिनांक 29/10/2021

प्रस्तावाचा विषय :- नोंव्हेंबर 2021 मध्ये मतदार जागृती अभियान राबविणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- मा. राज्य निवडणूक ओयोगाने नोव्हेंबर, 2021 मध्ये मतदार जागृती अभियान राबविणेबाबत निर्देश दिले आहेत. सदर आदेशानुसार शहरात कार्यक्रमाचे नियोजन करावयाचे असल्याने त्यानुसार शहरातील 1) विद्यापिठ/महाविद्यालय कॅम्पसमध्ये पोस्टर्स/ बॅनर्स लावणे, 2) नागरिकांचे लक्ष वेधु शकणाऱ्या मोक्याच्या ठिकाणी पोस्टर्स/बॅनर्स लावणे, 3) वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व हॉस्पिटल ठिकाणी बॅनर्स लावणे, 4) रेल्वे स्टेशन परिसर, चिमाजी अप्पा मैदान, वसई किल्ला, सातिवली हाईवे फाटा, शहरातील स्कायवॉक, बजारपेठा, तलाव, उद्याने, चित्रपटगृह ठिकाणी बॅनर्स लावून मा. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार जनजागृजी अभियान राबविणेसाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	साईज (इंच/फुट)	नग
1	भिंत पत्रक (120GSM) आर्ट पेपर सिंगल कलर (स्टिकर)	15 x 20 इंच	25000
2	160 जी.एस.एम. डिजीटल पी.व्ही.सी. ग्लॉसी फ्लेक्स बोर्ड (चारही बाजू लाकडी फ्रेम 1 x 1 इंच लाकडी पट्टी वापरून)	4 x 6	150
3	160 जी.एस.एम. डिजीटल पी.व्ही.सी. ग्लॉसी फ्लेक्स बोर्ड (चारही बाजू लाकडी फ्रेम 1 x 1 इंच लाकडी पट्टी वापरून)	8 x 10 चौ.फुट	25
4	160 जी.एस.एम. डिजीटल पी.व्ही.सी. ग्लॉसी फ्लेक्स बोर्ड (होर्डिंग बॅनर्स)	10 x 15 चौ.फुट	25
5	160 जी.एस.एम. डिजीटल पी.व्ही.सी. ग्लॉसी फ्लेक्स बोर्ड (होर्डिंग बॅनर्स)	10 x 12 चौ.फुट	25
6	स्टिकर120 जी.एस.एम. (पेपर फोर कलर छपाई)	20 x 30 इंच	300
7	हॅन्डबिल (दोन्ही बाजूस सफेद)	13 x 8.5 इंच	25000

तसेच स्थानिक केबल वाहिन्या, डिजिटल मिडिया, मोबाईल एस.एम.एस सोशल मिडिया, व्हिडिओ सोशिल मिडिया, महाविद्यालये, विद्यापिठे, गृहनिर्माण सोसायटी ऑनलाईन पध्दतीने मिडियाच्या माध्यमातून मतदार नोंदणी जन जागृती करणे, विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पध्दतीने निबंध, वकृत्व, वादविवाद, कथाकथन इत्यादी स्पर्धांचे आयोजन करणे, वृत्तपत्र व साप्ताहिक यांमध्ये प्रसिध्दी देण व इतर अनुषंगाने अंदाजे रुपये 9 लाख इतका खर्च अपेक्षित असून सदर होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील अंदाजपत्रकातील लेखाशिर्षक निवडणूक खर्च रक्कम रु. 15 कोटी या तरतूदीमधून भागविला जाईल. येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव/निर्णय :- मा. राज्य निवडणूक आयोग यांचे दि. 07 सप्टेंबर, 2021 रोजीचे पत्र व दि. 28 सप्टेंबर, 2021 रोजीच्या व्हिडिओ कॉन्फरन्स बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार मतदार जन जागृती अभियान राबविणेबाबतचा कार्यक्रम दि. 01 नोव्हेंबर, 2021 ते दि. 30 नोव्हेंबर, 2021 चे नियोजन करावयाचे असल्याने शहरातील विद्यापिठ/महाविद्यालय कॅम्पसमध्ये पोस्टर्स/ बॅनर्स लावणे/नागरिकांचे लक्ष वेधु शकणाऱ्या मोक्याच्या ठिकाणी पोस्टर्स/बॅनर्स लावणे/वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व हॉस्पिटल ठिकाणी बॅनर्स लावणे/ रेल्वे स्टेशन परिसर, चिमाजी अप्पा मैदान, वसई किल्ला, सातिवली हाईवे फाटा, शहरातील स्कायवॉक, बजारपेठा, तलाव, उद्याने, चित्रपटगृह ठिकाणी बॅनर्स लावून, स्थानिक केबल वाहिन्या, डिजिटल मिडिया, मोबाईल एस.एम.एस सोशल मिडिया, व्हिडिओ सोशिल मिडिया, महाविद्यालये, विद्यापिठे, गृहनिर्माण सोसायटी ऑनलाईन पध्दतीने मिडियाच्या माध्यमातून मतदार नोंदणी जन जागृती करणे, विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पध्दतीने निबंध, वकृत्व, वादविवाद, कथाकथन इत्यादी स्पर्धांचे आयोजन करणे वृत्तपत्रात व साप्ताहिक यांमध्ये प्रसिध्दी करणे इत्यादी कामास खर्च करणे आवश्यक असल्याने सन 2021-22 या वित्तीय वर्षासाठी निवडणूक शिर्षकाखाली 15 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. स्टिकर पोस्टर, बॅनर्स, हॅन्डबिल इत्यादी छपाईची कामे वार्षिक मंजूर निविदाधारकांकडून करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे. सदरील कामी रुपये 9 लाख (नऊ लाख मात्र) खर्च भागविणेकामी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

c/21

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 727 **विभाग : बांधकाम विभाग**

दिनांक : 29 / 10 / **2021**

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) प्रभाग क्र. 54 मधील ओसवाल नगरी येथील कुंभ अपा. इमारतीच्या बाजूला आर.सी.सी गटार बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) प्रभाग क्र. 54 मधील ओसवाल नगरी येथील इमारतीलगत उघडे गटार असून तेथे मोठ्या प्रमाणात पाण्याचा निचरा होत असल्यामुळे इमारतीलगत असलेली कंम्पाउंड भिंत कोसळण्याची शक्यता आहे. तसेच तेथे मोठ्या प्रमाणात रहदारी असल्यामुळे तेथिल गटार पक्के बांधून बंदिस्त करणे गरजेचे आहे. सदर कामाचे सन 2019/20 ह्या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हादरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. उपरोक्त नमुद केलेल्या कामाकरिता रक्कम रु. 2,90,363/- इतका खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1.	वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) प्रभाग क्र. 54 मधील ओसवाल नगरी येथील कुंभ अपा. इमारतीच्या बाजूला आर.सी.सी गटार बांधणे.	रू. 2,90,363/-

ठराव :- उपरोक्त् नमुद कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत येत असून सदर कामाची कार्यवाही करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

29/10/21

उप आयुक्त (परिमंडळ-1)
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर,पिन नं ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७२८ विभाग : आस्थापना (मु.)
दिनांक : २९/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक व जणगणना २०२२ चे कामकाज पाहण्यासाठी एक सेवा निवृत्त कर्मचाऱ्याची सहा महिन्यासाठी कंत्राटी पद्धतीने सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक व जणगणना सन २०२० मध्ये होणार होती. तथापि कोव्हीड-१९ व्या महामारी मुळे सदर निवडणुका मा. राज्य निवडणुक आयोगाने पुढे ढकळलेल्या होत्या . शासनाने नविन अधि सुचना काढुन बृहमुंबई महानगरपालिका वगळता इतर सर्व त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेचे बहुसदस्य पद्धतीने प्रभाग रचना होवुन आरक्षण निश्चत असुन सन २०२२ मध्ये निवडणुका घेण्याचे शासनाचे संकेत आहेत.

त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक व जणगणना २०२२ ची पुर्व तयारी करण्यासाठी खालील कामकाज करुन घेणेसाठी एक महानगरपालिकेडील निवडणुक विभागातील कामकाजाचा अनुभव असलेले सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने नेमणुक आवश्यक आहे. व त्यांनी खालील कामे करावी लागतील.

१) प्रभाग रचनेच्या कामी आवश्यक ती मदत करावी.
२) प्रारुप मतदार याद्या छपाई करुन घेणे.
३) अंतिम मतदार याद्या छपाई करुन घेणे.
४) आवश्यक कामाच्या निविदा प्रक्रिया मदत राबविणे.
५) मतदार केंद्रावर आवश्यक स्टेशनरी व इतर अनुषंगीकसाठी ची माहिती सादर करणे.
६) निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात आवश्यक ते नमुने स्टेशनरी पुरविणे.
७) जनगणने संबंधिचा पत्रव्यवहार पाहणे .
८) जणगणने संबंधित प्रगणकांच्या नेमणुका व इतर अनुषांगिक कामे करणे.

अटी व शर्ती

१) कंत्राटी पध्दतीवर नेमलेल्या कर्मचाऱ्यांचा नियमित आस्थापनेशी संबंध असणार नाही.
२) त्यांनी फक्त उक्त कामात मार्गदर्शन मदत व इतर कामकाज करण्याचे आहे.
३) त्यांनी रु. ५०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणेचा आहे.

उक्त कामी महानगरपालिकेतील श्री. प्रेमसिंग जाधव हे दि. ३०/०६/२०२१ रोजी उप.अधिक्षक तथा सहा.आयुक्त पदावरुन सेवा निवृत्त झालेले असुन यांनी महानगरपालिकेच्या निवडणुकीचे काम केलेले आहे. त्यामुळे त्यांनी केलेल्या निवडणुकीच्या कामाचा अनुभव लक्षात घेता निवडणुकीच्या कामासाठी त्यांची नियुक्ती मानधनावर करणेस विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) अन्वये ६ महिन्याचे कालवधी करीता करार पद्धतीने सेवा उपलब्ध करुन घेता येईल.

निर्णय :-श्री. प्रेमसिंग जाधव सेवा निवृत्त उपअधिक्षक यांना वसई विरार शहर महानगरपालिकेत मानधनावर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याच्या प्रस्तावानुसार महापालिकेच्या कामाची निकड पाहता महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक व जनगणनेच्या कामकाज पाहण्यासाठी महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) अन्वये ६ महिन्याचे कालवधी करिता श्री. प्रेमसिंग जाधव यांना शासन निर्णय क्र. : संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या अटी व शर्तीनुसार व शासन निर्णय मुद्दा क्र.(ड) मधील मासिक पारिश्रमिका नुसार मानधनावर ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने वसई विरार शहर महानगरपालिकेत नियुक्ती करण्यात येत आहे.

तसेच याकामी होण्याऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ७२९ दिनांक : २९/१०/२०२१

मुख्य प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.३२ मध्ये बोळींज येथील विरार गार्डन्स -बोळींज रस्ता ते ॲबरॉल कॉम्प्लेक्स पर्यंत विकास आराखड्यातील २० मी. रुंद रस्ता विकसीत करणे व अपंग पुनर्वसन केंद्राजवळ नाल्यावर आर.सी.सी. पूलाचे बांधकाम करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.५,६४,१५,१२७/-

२) प्रशासकीय मंजूरी :- मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.३३ दि.२०/०२/२०२०

३) तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता दि.२५/०२/२०२०

४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु. :- रु. ५,६४,१५,१२७/-

५) ई- टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/श.म./बांध/११२४/२०२० दि.१७/०३/२०२० शहर अभियंता, व.वि.श.म.

६) जाहिर निविदा सुचना :- १) दै.नवाकाळ
२) दै.फ्रि प्रेस जर्नल
३) दै.वृत्तमानस
४) दै.आपलं राज्य - राष्ट्रीय
५) दै.मिड- डे
६) दै.प्रातःकाल
} दि.२३/३/२०२०

७) ई- टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/श.म./बांध/२१४/२०२१ दि.७/६/२०२१ शहर अभियंता, व.वि.श.म.

८) जाहिर निविदा सुचना (प्रथम फेर निविदा) :- १) दै.सकाळ
२) दै.आपल महानगर
३) दै.प्रहार
४) दै.मुंबई केसरी टाईम्स
५) दै.प्रातःकाल
६) दै.इकॉनॉमिक टाईम्स
७) दै.फ्रि प्रेस जर्नल
} दि.२७/१२/२०१९

९) ई-निविदा प्राप्त :- ३

१०) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.६/७/२०२१

११) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.६/१०/२०२१

१२) प्राप्त निविदांची संख्या :- २

१३) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	शेरा
१.	मे.कृतिका कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा १.००% जास्त दराने	पात्र
२.	मे.मेघना इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकीय दराने	पात्र

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेले दर **मे.मेघना इंटरप्रायजेस** यांच्या **अंदाजपत्रकीय दराने** निविदा ही कमी असून योग्य व वाजवी आहे.

सदर निविदा दर अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी व वाजवी आहेत. सदर निविदा दर दि.४/१०/२०२१ रोजी निविदा समितीने मंजूर केले आहेत.

तरी **अंदाजपत्रकीय दराने** मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

ठराव / निर्णय :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा विषय़ क्र.३३ दि.२०/०२/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.मेघना इंटरप्रायजेस** ह्यांचे (**अंदाजपत्रकीय दराने**) हे दर कमी व योग्य आहेत. तरी **मे.मेघना इंटरप्रायजेस** ह्यांचे प्राप्त दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक मे.मेघना इंटरप्रायजेस ह्यांना अंदाजपत्रकीय दराने संविदा करणेस व कार्यादेश देण्यास,मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई – विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७३०

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : २९/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मध्ये फादरवडी येथील बहुउद्देशीय इमरतीसाठी आरक्षीत जागेस पत्र्याचे कुंपण बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ येथील फादरवाडी येथे म.न.पा मार्फत बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदरच्या ईमारतीचे बांधकाम हे मुख्य रस्त्यालगत असलेल्या म.न.पा आरक्षी जागेत चालू आहे. जागेलगतच्या रस्त्यावर सतत रहदारी असल्याने ईमारत बांधकाम चालू असताना बांधकामात वापरण्यात येणारे साहीत्य अथवा मटेरीयल रस्त्यावर पडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदरबाब लक्ष्यात घेता ईमारतीच्या जागेस पत्र्याचे कुंपण बांधणे आवश्यक आहे. या करीता जागेची पाहणी करून सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार पुढीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	कामाचा अंदाजित खर्च
१	वॉर्ड क्र.८८ मध्ये फादरवडी येथील बहुउद्देशीय इमरतीसाठी आरक्षीत जागेस पत्र्याचे कुंपण बांधणे.	रू.२,८६,३५४/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन २०१९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्याअनुषंगीक होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त सो.ह्यांचे कडील दि.२८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र. व.वि.श.म/आका/४८/२०२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ - ०३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७३१

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : २९/१०/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८ मध्ये फादरवडी येथील आरक्षीत जागेस पत्र्याचे कुंपण बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८ येथील फादरवाडी येथील स.न. ११३ ही जागा वसई विरार शहर महानगरपालिका आरक्षीत जागा आहे. सदर जागेभोवती मोठ्या प्रमाणात लोकवस्ती असून आरक्षीत जागेच्या काही भागावर अतिक्रमण झाले होते. सदरील अतिक्रणे ही वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी अतिक्रमण विभागा मार्फत हटवण्यात आलेली आहेत. तरी सदर जागेभोवती वाढती लोकवस्ती पाहता, भविष्यात सदर जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊनये ह्या दृष्टीने सदरची जागा ही कुंपण बांधुन सुरक्षीत करणे आवश्यक आहे. त्या करीता जागेची पाहणी करून सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार पुढीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	कामाचा अंदाजित खर्च
१	वॉर्ड क्र. ८८ मध्ये फादरवडी येथील आरक्षीत जागेस पत्र्याचे कुंपण बांधणे.	रू. २,७७,०३५/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन २०१९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्याअनुषंगीक होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त सो.ह्यांचे कडील दि.२८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र. व.वि.श.म/आका/४८/२०२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ - ०३
वसई विरार शहर महानगरपालिका